
मराठी

# अक्षरभारती

इयत्ता नववी



# भारताचे संविधान

### भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दि. ३.३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.



## मराठी

# अक्षरभारती

## इयत्ता नववी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४.

GEFIHY

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA APP द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q. R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q. R. Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन अध्यापनासाठी उपयुक्त दृकश्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१७
चौथे पुनर्मुद्रण : २०२१

© **महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे – ४११ ००४.**

या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**मराठी भाषा तज्ज्ञ समिती :**

श्री. नामदेव चं. कांबळे (अध्यक्ष)
फादर फ्रान्सिस दिब्रिटो (सदस्य)
डॉ. स्नेहा जोशी (सदस्य)
डॉ. रोहिणी गायकवाड (सदस्य)
डॉ. माधुरी जोशी (सदस्य)
श्री. अमर हबीब (सदस्य)
श्रीमती अर्चना नरसापूर (सदस्य)
श्रीमती सविता अनिल वायळ (सदस्य-सचिव)

**मराठी भाषा अभ्यासगट सदस्य**

| | |
|---|---|
| श्री. समाधान शिकेतोड | डॉ. सुभाष राठोड |
| श्री. बापू शिरसाठ | श्री. मोहन शिरसाट |
| श्रीमती प्रांजली जोशी | श्री. नाना लहाने |
| श्रीमती वैदेही तारे | डॉ. शारदा निवाते |
| श्री. मयुर लहाने | श्रीमती अनुजा चव्हाण |
| प्रा. विजय राठोड | श्री. प्रवीण खैरे |
| डॉ. माधव बसवंते | श्रीमती प्रतिभा लोखंडे |
| श्री. देविदास तारू | डॉ. मंजूषा सावरकर |
| श्री. संदीप रोकडे | श्रीमती जयमाला मुळीक |
| श्रीमती स्मिता गालफाडे | श्रीमती स्वाती ताडफळे |
| डॉ. प्रमोद गारोडे | डॉ. नंदा भोर |
| श्री. प्रमोद डोंबे | डॉ. कमलादेवी आवटे |
| श्री. शिवा कांबळे | श्री. हेमंत गव्हाणे |

**प्रकाशक**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई – २५.

**निमंत्रित तज्ज्ञ**
श्री. शिवाजी तांबे
डॉ. सुजाता महाजन

**संयोजन** : श्रीमती सविता अनिल वायळ
विशेषाधिकारी, मराठी

**चित्रकार** : फारुख नदाफ, यशवंत देशमुख

**मुखपृष्ठ** : फारुख नदाफ

**अक्षरजुळणी** : भाषा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती** : सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी
राजेंद्र चिंदरकर, निर्मिती अधिकारी
राजेंद्र पांडलोसकर, सहायक निर्मिती अधिकारी

**कागद** : ७० जी.एस.एम. क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश** :

**मुद्रक** :

# भारताचे संविधान

**उद्देशिका**

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा

व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी **बंधुता**

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

प्रिय विद्यार्थ्यांनो,

तुम्हां सर्वांचे इयत्ता नववीच्या वर्गात स्वागत आहे. 'अक्षरभारती' मराठी इयत्ता नववीचे हे पाठ्यपुस्तक तुमच्या हातात देताना अतिशय आनंद होत आहे.

मित्रांनो, आपण एकमेकांशी संवाद साधण्यासाठी मराठी भाषेचा वापर करतो. मराठी ही आपल्या राज्याची राजभाषा आहे. आपले विचार, कल्पना, भावभावना समोरील व्यक्तीसमोर योग्यप्रकारे आणि प्रभावीपणे मांडायच्या असतील तर भाषेवर प्रभुत्व हवे. या पुस्तकाचा अभ्यास केल्यामुळे तुमचे भाषेवरील प्रभुत्व वाढावे, भाषेचा विविध प्रकारे वापर करणे तुम्हांला सहज जमावे असे आम्हांला वाटते.

या पाठ्यपुस्तकातून विविध साहित्यप्रकारांची ओळख तुम्हांला करून दिली आहे, ते वाचून तुम्हांला मराठी भाषेचे शब्दवैभव विविधांगी आहे, हे लक्षात येईल. भाषा हे नवनिर्मितीचे साधन आहे. तुम्हांला नवनिर्मितीचा आनंद मिळावा, म्हणून या पुस्तकात अनेक भाषिक कृती दिल्या आहेत.

पाठ्यपुस्तकात तुमच्या विचारशक्ती, कल्पनाशक्ती व सृजनशीलतेला संधी देण्यासाठी अनेक कृती दिल्या आहेत, त्या कृती तुम्ही जरूर करा. भाषाभ्यासाच्या कृतींतून भाषेचे घटक, त्यांचे उपयोग समजावून घ्या. त्याचबरोबर लेखनक्षमता व अभिव्यक्ती विकास यांसाठी विविध कृती व नमुने दिले आहेत, त्यांचा तुम्ही अभ्यास करा. या कृतींतून तुमच्यातील लेखनकौशल्य व वाङ्‌मयीन अभिरूची नक्कीच वाढणार आहे. दैनंदिन व्यवहारामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरही तुम्हांला करावयाचा आहे व त्याचे फायदेही समजून घ्यायचे आहेत. पाठ्यघटकाशी संबंधित पूरक माहितीसाठी पाठ्यपुस्तकामध्ये दिलेल्या संदर्भग्रंथ सूचीचा व संकेतस्थळांचा अभ्यासासाठी वापर करावा असे आम्हांला वाटते.

तुमच्या कल्पकतेला आणि विचारांना चालना देणाऱ्या या पाठ्यपुस्तकाबाबतचे तुमचे मत आम्हांला नक्की कळवा.

तुम्हां सर्वांना शुभेच्छा !

पुणे
दिनांक : २८ एप्रिल, २०१७, अक्षय्यतृतीया
भारतीय सौर : ८ वैशाख १९३९

**(डॉ. सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

# भाषाविषयक क्षमता : द्‌वितीय भाषा मराठी

**इयत्ता नववीच्या अखेरीस विद्यार्थ्यांमध्ये भाषाविषयक पुढील क्षमता विकसित व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.**

| क्षेत्र | क्षमता |
|---|---|
| श्रवण | १. विविध प्रसारमाध्यमांद्‌वारे प्रसारित होणाऱ्या बातम्या, चर्चा व संवाद समजपूर्वक ऐकता येणे.<br>२. सार्वजनिक ठिकाणांवरील सूचना समजपूर्वक ऐकता येणे.<br>३. घर व परिसरातील अनौपचारिक विषयांवरील संवाद ऐकता येणे.<br>४. विनोद, गाणी, कविता, कथा व संवाद ऐकून आनंद घेता येणे.<br>५. गीते, समूहगीते, कविता, वक्त्यांची भाषणे व विविध साहित्यप्रकारांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकता येणे.<br>६. विविध बोलीभाषा लक्षपूर्वक व समजपूर्वक ऐकता येणे. |
| भाषण संभाषण | १. गाणी, कविता, समूहगीते तालबद्‌ध रीतीने म्हणता येणे.<br>२. विविध साहित्यप्रकारांचे योग्य प्रकारे सादरीकरण करता येणे.<br>३. स्वत:चे विचार सुस्पष्टपणे मांडता येणे.<br>४. विविध उपक्रमांच्या नियोजनाच्या चर्चेत सहभाग घेता येणे.<br>५. भाषण संभाषणाच्या कौशल्यांचा प्रत्यक्ष उपयोग करता येणे. |
| वाचन | १. पाठ्यपुस्तक व पाठ्येतर इतर साहित्याचे समजपूर्वक प्रकटवाचन करता येणे.<br>२. विरामचिन्हांची दखल घेऊन अर्थपूर्ण प्रकटवाचन करता येणे.<br>३. दिलेल्या उताऱ्याच्या आशयाची मध्यवर्ती कल्पना, सारांश, विचार समजून घेऊन लेखन करता येणे.<br>४. विविध साहित्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचा आस्वाद घेता येणे.<br>५. आंतरजालावर उपलब्ध असणाऱ्या आवश्यक त्या माहितीचे वाचन करता येणे.<br>६. सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचून त्याबाबत योग्य विचार करता येणे. |
| लेखन | १. श्रुतलेखन करताना शुद्‌धलेखनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करता येणे.<br>२. ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्याच्या आशयावरील काढलेल्या मुद्द्यांचा विस्तार करता येणे.<br>३. दिलेल्या विषयामध्ये स्वत:च्या विचारांची भर घालून पुनर्लेखन करता येणे.<br>४. योग्य म्हणी, वाक्प्रचार, शब्द व शब्दसमूह यांचा उपयोग करून परिच्छेद लिहिता येणे.<br>५. दिलेल्या विषयावर मुद्द्यांच्या आधारे स्वतंत्र लेखन करता येणे.<br>६. घटना, प्रसंग यावर आधारित सुसंगत विचार करून त्याबाबत लेखन करता येणे.<br>७. घडलेले प्रसंग, कार्यक्रम, घटना यांचे वृत्तान्त लेखन करता येणे.<br>८. पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेल्या उपयोजित लेखनातील घटकांवर लेखन करता येणे. |

अध्ययन कौशल्य

१. शब्दकोश संदर्भासाठी पाहता येणे.
२. मराठी भाषेतील म्हणी, वाक्प्रचार यांची यादी करता येणे.
३. ऑनलाइन अर्ज भरणे, बिले भरणे यांसारख्या सुविधांचा वापर करता येणे.
४. सोशल मिडियाच्या योग्य व जबाबदार वापराबाबत जाणीव जागृती होणे.
५. संगणकावरील साहित्याचा वापर करताना संबंधितांच्या हक्कांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घेणे.
६. प्रसारमाध्यमे/संगणक इत्यादींवरून उपलब्ध होणाऱ्या कलाकृतींचा आस्वाद घेता येणे, चिकित्सक विचार करता येणे.
७. संगणक/इंटरनेटच्या साहाय्याने भाषांतर/लिप्यंतरण करता येणे.
८. भाषेच्या विकासासाठी उपलब्ध असणाऱ्या ॲप्लिकेशनचा वापर करता येणे.
९. विविध सामाजिक समस्या सोडवण्यासंदर्भात उपाय सुचवणे.

भाषाभ्यास

१. उपमा व उत्प्रेक्षा अलंकार ओळखता येणे व त्यांचा लेखनात उपयोग करता येणे.
२. अव्ययीभाव समास व द्‌वंद्‌व समास ओळखता येणे व त्यांचा लेखनात उपयोग करता येणे.
३. वाक्यातील सामान्यरूप ओळखता येणे.
४. शुद्‌धलेखनाच्या नियमांचा लेखनामध्ये उपयोग करता येणे.

## शिक्षकांसाठी

मराठी अक्षरभारती इयत्ता नववी हे पाठ्यपुस्तक अध्यापनासाठी आपणांस देताना अतिशय आनंद होत आहे. विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्ये अधिकाधिक विकसित होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकामध्ये विद्यार्थ्यांच्या भावविश्वातील पाठ, कविता, गीते, कृती, स्वाध्याय यांसारख्या अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. तसेच व्याकरण घटकांची मनोरंजक, सोप्या व कार्यात्मक पद्‌धतीने मांडणी केली आहे. उपयोजित लेखन या विभागामध्ये विद्यार्थ्यांच्या लेखन कौशल्य विकासासाठी विविध कृती व त्यांचे नमुने दिलेले आहेत. या वैविध्यपूर्ण कृतींतून विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्यांचा विकास होणार आहे. त्याचबरोबर त्यांच्यातील निरीक्षणक्षमता, विचारक्षमता व कृतिशीलता यांसही संधी मिळणार आहे.

शिक्षकांनी स्वत:च्या सृजनशीलतेने, कल्पकतेने विविध भाषिक कृतींची रचना करावी. त्याचबरोबर या विविध कृती तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरित करावे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमांचा वापर करून अध्यापनात अधिकाधिक संदर्भ देणे अपेक्षित आहे. पाठ्यपुस्तकातील गद्य व पद्य पाठांमधील कठीण शब्दांचा अर्थ लक्षात घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करावा व त्यासाठी विद्यार्थ्यांनाही प्रेरणा द्यावी.

मराठी अक्षरभारती इयत्ता नववी हे पाठ्यपुस्तक तुम्हांला आवडेल, अशी आशा आहे.

# अनुक्रमणिका

## भाग – १


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | सर्वात्मका शिवसुंदरा (प्रार्थना)<br>– कुसुमाग्रज | १ |
| २. | संतवाणी–<br>(अ) भेटीलागी जीवा – संत तुकाराम<br>(आ) संतकृपा झाली – संत बहिणाबाई | <br>२<br>४ |
| ३. | 'बेटा, मी ऐकतो आहे!'<br>– व. पु. काळे | ६ |
| ४. | जी. आय. पी. रेल्वे<br>– प्रबोधनकार ठाकरे | १२ |
| ✿ | काझीरंगा (स्थूलवाचन)<br>– वसंत अवसरे | १५ |


## भाग – २


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ५. | व्यायामाचे महत्त्व (कविता)<br>– राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज | १८ |
| ६. | ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ<br>– बाळ ज. पंडित | २० |
| ७. | दिव्याच्या शोधामागचे दिव्य<br>– डॉ. अनिल गोडबोले | २३ |
| ८. | सखू आजी<br>– राजन गवस | २७ |
| ✿ | हास्यचित्रांतली मुलं (स्थूलवाचन)<br>– मधुकर धर्मापुरीकर | ३१ |


## भाग –३


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ९. | उजाड उघडे माळरानही (कविता)<br>– ललिता गादगे | ३५ |
| १०. | कुलूप<br>– श्री. कृ. कोल्हटकर | ३७ |
| ११. | आभाळातल्या पाऊलवाटा | ४० |
| १२. | पुन्हा एकदा (कविता)<br>– प्रतिमा इंगोले | ४३ |
| ✿ | व्हेनिस (स्थूलवाचन)<br>– रमेश मंत्री | ४५ |


## भाग –४


| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १३. | तिफन (कविता)<br>– विठ्ठल वाघ | ४७ |
| १४. | ते जीवनदायी झाड<br>– भारत सासणे | ४९ |
| १५. | माझे शिक्षक व संस्कार<br>– शंकरराव खरात | ५२ |
| १६. | शब्दांचा खेळ<br>– हेलन केलर | ५५ |
| ✿ | विश्वकोश (स्थूलवाचन) | ५८ |
| ✿ | उपयोजित लेखन | ६३ |

भाग – १

# १. सर्वात्मका शिवसुंदरा

**कुसुमाग्रज –**विष्णु वामन शिरवाडकर (१९१२–१९९९) : ज्ञानपीठ पारितोषिक विजेते प्रसिद्ध लेखक, कवी, नाटककार. ‘जीवनलहरी’, ‘विशाखा’, ‘समिधा’, ‘स्वगत’, ‘हिमरेषा’, ‘वादळवेल’, ‘मारवा’, ‘किनारा’ इत्यादी काव्यसंग्रह; ‘वैजयंती’, ‘राजमुकुट’, ‘कौंतेय’, ‘नटसम्राट’, ‘वीज म्हणाली धरतीला’, ‘विदूषक’ इत्यादी नाटके प्रसिद्ध.

परमेश्वरास वंदन करून अंधारातून उजेडाकडे नेण्याची, संकटाशी सामना करण्याची शक्ती, कवी प्रस्तुत गीतातून मागत आहेत.



**सर्वात्मका शिवसुंदरा स्वीकार या अभिवादना।**
**तिमिरातुनी तेजाकडे प्रभु आमुच्या ने जीवना।।**

**सुमनांत तू गगनात तू**
**ताऱ्यांमध्ये फुलतोस तू**
**सद्‌धर्म जे जगतामधे**
**सर्वांत त्या वसतोस तू**
**चोहीकडे रूपे तुझी जाणीव ही माझ्या मना।।**

**श्रमतोस तू शेतामधे**
**तू राबसी श्रमिकांसवे**
**जे रंजले वा गांजले**
**पुसतोस त्यांची आसवे**
**स्वार्थाविना सेवा जिथे तिथे तुझे पद पावना।।**

**न्यायार्थ जे लढती रणी**
**तलवार तू त्यांच्या करी**
**ध्येयार्थ जे तमि चालती**
**तू दीप त्यांच्या अंतरी**
**ज्ञानार्थ जे तपती मुनी होतोस त्यांची साधना।।**

**करुणाकरा करुणा तुझी**
**असता मला भय कोठले**
**मार्गावरी पुढती सदा**
**पाहीन मी तव पाउले**
**सृजनत्व या हृदयामध्ये नित जागवी भीतीविना।।**

प्रस्तुत गीत हे काव्यानंदासाठी घेतले असून, ते विद्यार्थ्यांकडून तालासुरात म्हणवून घ्यावे.

# २. संतवाणी

## (अ) भेटीलागी जीवा

**संत तुकाराम –** तुकाराम बोल्होबा अंबिले (मोरे) (१६०८ ते १६५०): व्यवहार आणि अध्यात्म यांची सुयोग्य सांगड घालणारे वारकरी संप्रदायातील संतकवी. दांभिकता, दैववाद, अहंकारी वृत्ती, दुराचार इत्यादींचा परखड समाचार त्यांनी आपल्या अभंगांमधून घेतलेला आहे. प्रेम, नैतिकता, करुणा व सर्वांभूती ईश्वर या मूल्यांना प्रमाणभूत मानून आपल्या प्रापंचिक जीवनाचा आदर्श ते अभंगातून मांडतात.

प्रस्तुत अभंगातून संत तुकाराम महाराज यांनी आपल्या मनातील विठ्ठलाच्या भेटीची ओढ समर्पक दृष्टान्तातून व्यक्त केली आहे.

**भेटीलागीं जीवा लागलीसे आस ।**
**पाहे रात्रंदिवस वाट तुझी ।।१।।**

**पूर्णिमेचा चंद्रमा चकोराजीवन ।**
**तैसें माझें मन वाट पाहे ।।२।।**

**दिवाळीच्या मुळा लेंकीं आसावली ।**
**पाहातसे वाटुली पंढरीची ।।३।।**

**भुकेलिवा बाळ अति शोक करी ।**
**वाट पाहे उरि माउलीची ।।४।।**

**तुका म्हणे मज लागलीसे भूक ।**
**धांवूनि श्रीमुख दांवी देवा ।।५।।**

सकलसंतगाथा खंड दुसरा : श्री तुकाराममहाराजांची अभंगगाथा , अभंग क्रमांक ११३६
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी.

## स्वाध्याय

**प्र. १. तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | वाट बघणारा | कोणाची वाट बघतो | वाट बघण्याचे कारण |
|---|---|---|---|
| (१) | चकोर | | चंद्रकिरण हेच त्याचे जीवन |
| (२) | | माहेरचे बोलावणे येणे | |
| (३) | भुकेलेले बाळ | | |
| (४) | | पांडुरंगाची | |

**प्र. २. योग्य अर्थ शोधा.**

(अ) आस लागणे म्हणजे ..............

(१) ध्यास लागणे (२) उत्कंठा वाढणे (३) घाई होणे (४) तहान लागणे

(आ) वाटुली म्हणजे ..............

(१) धाटुली (२) वाट (३) वळण (४) वाट पाहणे

**प्र. ३. भावार्थाधारित.**

(अ) संत तुकारामांनी पांडुरंगाच्या भेटीबाबत दिलेल्या दृष्टान्तातील तुम्हांला आवडलेला दृष्टान्त स्पष्ट करा.

(आ) चकोराच्या दृष्टान्तातून संत तुकाराम काय सिद्ध करू इच्छितात, ते तुमच्या शब्दांत लिहा.

**उपक्रम :**

(१) संत बहिणाबाईंचा 'जलाविण मासा' हा अभंग मिळवून वर्गात त्याचे वाचन करा.

(२) संत कान्होपात्रा यांचा 'नको देवराया अंत आता पाहू' हा अभंग मिळवून वाचा.

## भाषाभ्यास

### अलंकार

आपण जेव्हा कथा, कादंबरी, कविता, नाटक वगैरे साहित्य वाचतो. तेव्हा दैनंदिन जगण्यातील भाषेपेक्षा थोडी वेगळी भाषा आपल्याला वाचायला मिळते. आपल्याला साहित्य वाचताना आनंद मिळवून देण्यात त्या भाषेचा मोठा वाटा असतो. दैनंदिन व्यवहारातील भाषेपेक्षा साहित्याची भाषा ज्या घटकांमुळे वेगळी ठरते, त्यातील एक घटक म्हणजे 'अलंकार'. अलंकार भाषेचे सौंदर्य कसे खुलवतात, हे आपल्याला आणखी काही उदाहरणे घेऊन पाहायचे आहे.

**अलंकाराचे मुख्य दोन प्रकार**

**१) शब्दालंकार**
यमक, अनुप्रास आणि इतर

**२) अर्थालंकार**
उपमा, उत्प्रेक्षा, रूपक आणि इतर

## (आ) संतकृपा झाली

**संत बहिणाबाई** ( १६६८-१७०० ) : वारकरी संप्रदायातील संत कवयित्री. संत तुकाराम यांच्या शिष्या. ओव्या, श्लोक, आरत्या इत्यादी रचना प्रसिद्ध. संत तुकाराम यांच्या काव्यरचनेचा आणि व्यक्तिमत्त्वाचा बहिणाबाई यांच्या काव्यरचनेवर प्रभाव जाणवतो. भक्तिभावनेचा उत्कट आविष्कार हा त्यांच्या अभंगरचनेचा विशेष.

प्रस्तुत अभंगात संत बहिणाबाई यांनी महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायरूपी इमारत उभारणीमध्ये संतांचा मोलाचा वाटा कसा आहे, याचे वर्णन केलेले आहे.

**संतकृपा झाली ।**
**इमारत फळा आली ।।१।।**

**ज्ञानदेवें रचिला पाया ।**
**उभारिलें देवालया ।।२।।**

**नामा तयाचा किंकर ।**
**तेणें रचिलें तें आवार ।।३।।**

**जनार्दन एकनाथ ।**
**खांब दिधला भागवत ।।४।।**

**तुका झालासे कळस ।**
**भजन करा सावकाश ।।५।।**

**बहिणी म्हणे फडकती ध्वजा ।**
**निरूपणा केलें बोजा ।।६।।**


सकलसंतगाथा खंड दुसरा : संत बहिणाबाईंचे अभंग , अभंग क्रमांक ३२
संपादक : प्रा. डॉ. र. रा. गोसावी.

## स्वाध्याय

**प्र. १. चौकटी पूर्ण करा.**




**प्र. २. कंसातील उत्तरांच्या आधाराने संकल्पना स्पष्ट करा.**




(परिसर प्रचाराने व्यापक केला, वैभवापर्यंत पोहोचवला, वारकरी संप्रदायाची स्थापना, संप्रदायाला गुरुकृपेने बळकट केले.)

**प्र. ३. भावार्थाधारित.**

(१) ‘तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।’ या ओळीचा भावार्थ स्पष्ट करा.

(२) ‘ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ।।’ या ओळीचा अर्थ स्पष्ट करा.

**प्र. ४. अभिव्यक्ती.**

(१) संतांचे कार्य समाजाला नेहमीच मार्गदर्शक ठरते, याविषयी तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.

**उपक्रम :**

डॉ. हे. वि. इनामदार यांच्या ‘भक्तिगंगेच्या वाटेवर’ या पुस्तकाचे वर्गात सामूहिक वाचन करा.

## भाषाभ्यास

*** अलंकाराच्या संदर्भातील महत्वाचे शब्द पुढीलप्रमाणे असतात.**

(१) **उपमेय** – ज्याची तुलना करायची ते उपमेय.
उदा., आंबा साखरेसारखा गोड आहे. या उदाहरणात आंबा हे उपमेय आहे.

(२) **उपमान** – ज्याच्याबरोबर तुलना करावयाची ते उपमान. उदा., इथे साखर हे उपमान.

(३) **समान धर्म** – दोन वस्तूंत असलेला सारखेपणा किंवा दोन वस्तूतील समान गुणधर्म. उदा., गोडपणा.

(४) **साम्यवाचक शब्द** – वरील सारखेपणा दाखवण्यासाठी वापरलेला शब्द. उदा., सारखा.

*** खालील उदाहरणातील उपमेय, उपमान, साधर्म्यदर्शक शब्द व समान गुण ओळखा.**

(अ) आईचे प्रेम सागरासारखे असते.

(आ) आमच्या गावचे सरपंच कर्णासारखे दानशूर आहेत.

(इ) राधाचा आवाज कोकिळेसारखा मधुर आहे.

# ३. 'बेटा, मी ऐकतो आहे!'

**व. पु. काळे** – वसंत पुरुषोत्तम काळे (१९३२–२००१): कथालेखक, निबंधकार, नाटककार, कादंबरीकार. 'लोंबकळणारी माणसं', 'पण माझ्या हातांनी', 'पेन सलामत तो', 'गुलमोहर', 'कर्मचारी', 'का रे भुललासी', 'ऐक सखे', 'वन फॉर द रोड', 'मायाबाजार', 'स्वर', 'संवादिनी', 'वलय' इत्यादी कथासंग्रह; 'ही वाट एकटीची', 'पार्टनर' इत्यादी कादंबरीलेखन प्रसिद्ध. आकर्षक कथानके, ओघवती निवेदनशैली आणि चटपटीत संवाद यांमुळे त्यांच्या कथा वाचकप्रिय आहेत.

संगीत कलेवर जिवापाड प्रेम करणारे वडील व त्यांच्या अपघातामुळे संगीतसेवेपासून अंतरलेल्या वडिलांच्या सौख्यासाठी धडपडणारा मुलगा यांचे भावस्पर्शी वर्णन प्रस्तुत पाठात लेखकांनी केले आहे.

तिसरी घंटा घणघणली व बाहेरचा संमिश्र कोलाहल बंद पडला. उगीचच इकडून तिकडे वळणाऱ्या माना स्टेजच्या दिशेकडे स्थिर झाल्या. लोकांचे लक्ष आता आपल्याकडे आहे, याची खात्री वाटताच मी गंभीर आवाजात बोलायला सुरुवात केली, ''सभ्य स्त्री–पुरुषहो, माझ्या वादनविद्यालयाचा हा पहिलाच जाहीर कार्यक्रम आहे. आपल्या चरणी ही कला सादर करताना मला अतिशय आनंद वाटत आहे. आपण शांतपणाने या सर्व कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा, अशी आपल्याला नम्र विनंती करून, मी कार्यक्रमाला सुरुवात करतो. आजच्या कार्यक्रमाची सुरुवात 'शिरीष भागवत' याच्या फिड्लवादनाने होईल. हा विद्यार्थी माझ्या विद्यालयात नुकताच शिकायला आला आहे. कलेच्या प्रांतातील हा नवखा मुसाफिर आहे, हे लक्षात घेऊन आपण त्याच्या हुशारीचे कौतुक करावे, ही विनंती!'' एवढे बोलून मी शिरीषकडे पाहिले. मला या मुलाची अतिशय भीती वाटत होती. खरे सांगायचे म्हणजे, माझ्या मनातून मला शिरीषला कार्यक्रम द्यायचाच नव्हता, कारण नुकताच शिकायला लागलेला हा विद्यार्थी माझ्या विद्यालयाचे नाव खराब करील याची मला खात्री होती, म्हणूनच मी त्याला कार्यक्रम देण्याचे टाळत होतो!

मी शिरीषकडे पाहिले. त्याच्या चेहऱ्यावर धीटपणा व आत्मविश्वास पुरेपूर प्रतिबिंबित झाला होता; पण त्याचे हे अवसान फार वेळ राहणार नाही, हे मी ओळखून होतो. पडदा वर जाऊन बाहेरचा श्रोतृवृंद नजरेला पडताच त्याचा हा धीर सुटेल याची मला खात्री होती. शिरीषने खूण करताच मी पडदेवाल्याला इशारा केला आणि पडदा झरझर वर गेला. फूटलाइटचा झगझगीत प्रकाश डोळ्यांवर पडताच शिरीषने डोळे मिटून घेतले. त्या प्रकाशाची डोळ्यांना जराशी सवय झाल्यावर शिरीषला सबंध श्रोतृवृंद दिसला आणि त्याच क्षणी त्याच्या मनाची झालेली चलबिचल त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसू लागली. तो गडबडून गेला आहे, हे मी ओळखले. त्याला आता सावरून धरणे, शिक्षक या नात्याने माझे कर्तव्य होते. मी तंबोरेवाल्याला व तबलेवाल्याला खूण केली. तंबोऱ्याचा धीरगंभीर आवाज घुमू लागला. शिरीषने डोळे मिटून कुणाचे तरी ध्यान केल्यासारखे दिसले व पुन्हा त्याचा चेहरा पूर्वीच्या आत्मविश्वासाने न्हाऊन निघाला व हलकेच त्याने 'षड्ज' लावला. एका दहा ते बारा वर्षांच्या मुलाने शांतपणे वाजवायला सुरुवात केलेली पाहून लोक शांत बसले. धीमेपणाने शिरीषने भूप रागातली गत् वाजवायला सुरुवात केली. तेच ते सूर! मात्रेचाही फरक नाही. तो शांतपणे वाजवू लागला आणि... आजपर्यंत बसला नव्हता एवढा धक्का मला बसला! कानांवर विश्वास बसेना, नजरेवरही बसेना!

पंचेंद्रिये दगा तर देत नाहीत ना, अशी शंका मनाला चाटून गेली. माझ्या जागी तुम्ही असता किंवा आणखी कोणीही असता, तरी त्याच्या मनातही तशी शंका आली असती. तुम्हीच सांगा, सुमारे सहा महिन्यांपूर्वी शिरीष माझ्या विद्यालयात आला. धीटपणे त्याने विचारले, ''आपणच का पी. जनार्दन?'' मी सुहास्य मुद्रेने 'होय' म्हणताच तो म्हणाला, ''माझे नाव शिरीष भागवत, घरी 'श्री'च म्हणतात. मला गाण्याची फार आवड आहे.''

''तुला गाण्याची आवड आहे तर!''

''माझ्यापेक्षा माझ्या वडिलांना, मी शिकलेले फार आवडेल.'' त्याच्या चमत्कारिक उत्तराचे मला नवल वाटू लागले व थोडासा रागही येऊ लागला. तो थोडा वेळ थांबून पुढे म्हणाला, ''मी आपल्याकडे शिकायला येईन; पण माझी एक अट आहे. मी शिकायला आलो, की रोज माझ्याबरोबर माझे वडील पण येतील व शिकवणी चालू असताना वर्गातच बसतील.'' आता मात्र मला राग आला. मी जाणीवपूर्वक हसत म्हणालो, ''मान्य! तुझ्या अटी एकदम मान्य; पण त्यासाठी तुला महिना पन्नास रुपये फी द्यावी लागेल!''

''कबूल! उद्यापासून मी येतो. माझ्याबरोबर वडील पण येतील बरं का!'', असं म्हणून माझ्या आश्चर्यचकित चेहऱ्याकडे न बघता शिरीष चटकन निघून गेला. दुसरे दिवशी तो अगदी वेळेवर आला. त्याच्याबरोबर एक वयस्कर आणि भारदस्त गृहस्थ आले होते. शिरीष म्हणाला, ''हे माझे वडील, नाना.'' आमचे नमस्कार झाले. एक अक्षर न बोलता नाना खुर्चीवर बसले. मी पण न बोलता व्हायोलिन काढले व शिरीषच्या हातात दिले. त्याने बरोबर वही वगैरे आणलेली पाहताच माझा त्यांच्याबद्‌दलचा ग्रह चांगला झाला. पहिल्या दिवशी प्राथमिक माहिती व पहिला धडा दिल्यावर मी हातात व्हायोलिन घेतले. माझ्या विद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी स्वत:च वाजवून दाखवायचे अशी माझी प्रथा होती. त्यामागील हेतू एवढाच, की मला त्यांना सुचवायचे असते, की नेटाने नीट टिकलात तर इतपत वाजवू शकाल. त्याप्रमाणे सुमारे वीसएक मिनिटे मी पिलू रागातली एक गत वाजवून दाखवली. जिवाचे कान करून नाना ऐकत होते व शिरीष माझ्याकडे व नानांकडे आळीपाळीने बघत होता. मी व्हायोलिन खाली ठेवले व नानांकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर तृप्तीचे समाधान स्पष्टपणे दिसत होते.

''आपण जाऊया आता'', शिरीष म्हणाला व पितापुत्र उठले. मीच आपण होऊन विचारले, ''काय कसं काय वाटलं एकंदरीत?'' ''वा उत्कृष्ट! त्याबद्‌दल प्रश्नच नाही.'' शिरीषनेच मध्ये उत्तर दिले. मला त्याच्या आगाऊ स्वभावाचा राग आला.

''आपण कुठं असता कामाला?'' भोचकपणे शिरीषच पुन: म्हणाला.

मला वाटले, की मध्येमध्ये बोलल्याबद्‌दल नाना शिरीषला दम भरतील; पण त्याउलट ते कौतुकाच्या नजरेनेच त्याच्याकडे पाहत होते. नियमितपणे रोज पितापुत्राची जोडी येऊ लागली. शिरीषची प्रगती पाहून मात्र प्रसंगी मी पण आश्चर्यचकित होत होतो. त्याचा हात वाजवायला अतिशय हलका होता आणि माझ्या सर्व विद्यार्थ्यांत त्याची आकलनशक्ती फारच दांडगी होती. नाना रोज त्याच्याबरोबर येत व एक अक्षरही न बोलता शांत बसून राहात. मी पण त्यांच्याशी बोलत नसे.

हां हां म्हणता तीन महिने निघून गेले! आणखीन तीन महिन्यांनी होणाऱ्या माझ्या विद्यालयाच्या प्रथम कार्यक्रमात आपण शिरीषला कार्यक्रम द्यायचा, असा मी निश्चय करून टाकला आणि त्यानुसार मी शिरीषला म्हणालो, ''शिरीष, अशीच प्रगती कायम राहू दे. आपल्या विद्यालयाच्या कार्यक्रमात मी तुझा कार्यक्रम ठेवणार आहे.'' हे ऐकल्यावर शिरीषला अत्यानंद होईल अशी कल्पना होती; पण त्याच्या चेहऱ्यावर आनंदाच्या काहीही भावना दिसल्या नाहीत. इतकेच नव्हे, तर त्याचा चेहरा काहीसा उतरला! मी विचारले, ''काय, तुला हे ऐकून काहीच आनंद वाटत नाही का?'' गंभीर आवाजात ठाशीव स्वरूपाचे

उत्तर आले, ''माझ्यापेक्षा नानांना त्याचा आनंद जास्त होईल.''

पितापुत्र गेले आणि प्रत्येक वेळी मिळणाऱ्या शिरीषच्या तऱ्हेवाईक उत्तराचे आश्चर्य करीत मी बसलो. प्रत्येक वेळी तो नानांचे नाव का घेतो व नाना अगदी रोज त्याच्याबरोबर येतात, याचे रहस्य काय असावे या प्रश्नाचे उत्तर मला सापडेना. याशिवाय आणखीन एक शंका माझ्या मनात वरचेवर येत असे. ती म्हणजे, नाना जवळ असताना शिरीष मोकळ्या मनाने व्हायोलिन वाजवत नसावा ही. दुसरेच दिवशी शिरीष आला नाही. त्याचा हा पहिला खाडा. नसेल एखादवेळेस जमले, असे मी समाधान करून घेतले; पण त्याच्या दुसऱ्या दिवशीसुद्धा शिरीष आला नाही. चौथा दिवस गेला. पाचवा गेला आणि तसेच पंधरा दिवस गेले! शिरीषचा पत्ता नव्हता. सोळाव्या दिवशी एक मनुष्य निरोप व फीचे पैसे घेऊन आला. ''नाना आजारी असल्यामुळे शिरीष येऊ शकणार नाही'', असे तो म्हणाला. थोड्याशा त्राग्यानं मी म्हणालो, ''नानांशी त्याला काय करायचे आहे! इकडे कार्यक्रम जवळ येत चालला आहे, त्याचे काय?'' शिरीष आला नाही, त्याची वाट पाहून मी त्याचा कार्यक्रम रद्द केला. त्याचे नाव पण काढायचे नाही, असे ठरवून मी बाकीचे विद्यार्थी तयार केले. समारंभाचा दिवस उगवला आणि सकाळपासून शिरीषच्या आठवणीने मी उगाचच बेचैन झालो होतो. सकाळची इतर कामे आटोपून मी जरा स्वस्थ बसतो न बसतो तोच दारात शिरीष उभा! मी ताडकन उभा राहिलो व त्याच्या जवळ गेलो.

''अरे, तुझा पत्ता तरी काय? आणि आज एकटाच कसा काय? नाना कसे नाहीत बरोबर? इकडची दुनिया तिकडे होईल ना?''

''इकडची दुनिया तिकडेच झाली आहे सर. यापुढे मी एकटाच दिसेन! माझे नाना...नाना...माझे नाना कायमचे गेले हो सर!''

बऱ्याच सांत्वनानंतर त्याने विचारले, ''आज आपल्या विद्यालयाचा कार्यक्रम ना?'' मी खिन्नपणे 'हो' म्हणालो!

''मग मला आज कार्यक्रम द्या. नाही म्हणू नका सर. एवढीच इच्छा पुरवा.'' तो असे म्हणाल्यावर मात्र माझ्यातला शिक्षक जागा झाला. मी सौम्य आवाजात म्हणालो, ''शिरीष, मी तुझ्या भावना ओळखतो; पण आज माझा नाइलाज आहे. आजच्या या पहिल्या कार्यक्रमावरच आपल्या विद्यालयाची इभ्रत अवलंबून आहे. त्यातून तुझी दोन महिने गैरहजेरी लागलेली. तूच सांग, मी तुला कार्यक्रम कसा काय देऊ?''

अगतिक होऊन शिरीष म्हणाला, ''सर, माझी एवढी एकच विनंती मान्य करा. मला आज वाजवू दे. नंतर जन्मात हात लावणार नाही व्हायोलिनला!'' ''तू पुढे जन्मभर वाजव; पण आज वाजवू नको. तुझी मन:स्थितीही आज बरोबर नाही.''

''मला परवानगी दिलीत, तर माझी मन:स्थिती आपोआपच सुधारेल!''

शेवटी त्याचे दु:खित मन पुन: आणखी कशाला दुखवा, असा विचार करून मी त्याला परवानगी दिली, मात्र पहिलाच कार्यक्रम त्याचा ठेवावा असेच मी ठरवले.

त्याप्रमाणे मी परवानगी दिली आणि शिरीष वाजवू लागला. शिरीष कार्यक्रम करण्यात मुरलेल्या एखाद्या वादकाप्रमाणे वाजवत होता. इतके शिकला तरी कुठे याचाच मी विचार करत होतो आणि त्याहीपेक्षा मला मुख्य प्रश्न असा पडला होता, की नवीनच शिकायला लागलेला मुलगा इतके उत्कृष्ट वाजवतो, तर जुने मुरलेले विद्यार्थी किती छान वाजवत असतील, असेच बाहेरचे लोक म्हणत असणार, तेव्हा याच्यानंतर वाजवायला कुणाला बसवावे? टाळ्यांच्या कडकडाटाने मी भानावर आलो. शिरीष आत आला व त्याने माझ्या पायांवर डोके ठेवले. मी त्याला उठवत विचारले, ''शिरीष,

हा काय प्रकार आहे? तू माझ्याकडे न येता आणखीन कुठे शिकत होतास?'' डोळे पुशीत शिरीष म्हणाला, ''सर, काय ही भलतीच शंका! मी तुम्हांला सर्व सविस्तर सांगतो–

ज्या दिवशी मी तुमच्याकडे फी व चिठ्ठी पाठवली, त्याच रात्री नाना वारले. मला धक्काच बसला. ज्यांच्यासाठी शिकत होतो तेच गेल्यावर कशाला आता शिका म्हणून मी व्हायोलिनला हात लावायचा नाही असे ठरवले''

''तुम्हांला कदाचित माहीत असेल किंवा नसेलही! माझे नाना एकेकाळी उत्कृष्ट गवई होते; पण त्यांना एकदा कसलासा जबर अपघात झाला व त्या अपघातात ते ठार बहिरे झाले. त्यांना काहीही ऐकू येत नसे. ओठांच्या हालचालींवरून त्यांना काही काही शब्द समजत. बहिरेपणाच्या इतर गैरसोईंपेक्षा संगीतसेवा अंतरली याचाच नानांना धक्का बसला. शेवटी त्यांनी मला काही तरी वाद्य शिकण्यासाठी उद्युक्त केले. कोणीतरी संगीतशास्त्रासाठी सतत धडपड करत असल्याचे पाहाण्यातच त्यांना अमाप सौख्य मिळत होते, म्हणूनच ते रोज माझ्याबरोबर इथे येत होते; पण त्यांना ऐकू काहीच येत नव्हते. त्यामुळे मला वारंवार खेद व्हायचा, की मी वाजवण्यात कितीही प्रगती व कौशल्य दाखवले तरी माझे नाना काही ते ऐकू शकत नाहीत, या विचाराने मला नानांसमोर मोकळेपणा वाटत नव्हता!''

''ज्या दिवशी नाना गेले त्याच दिवशी मी ठरवले, की संगीत बंद! पण दुसऱ्याच क्षणी मनात विचार आला, की माझे नाना तेव्हा माझे वादन ऐकू शकत नव्हते; पण आता माझ्याच शेजारी बसून नक्की ऐकत आहेत. या विचारासरशी, लोकांच्या निंदेकडे लक्ष न देता मी त्याच दिवसापासून व्हायोलिन वाजवायला सुरुवात केली. आज सकाळपर्यंत मी कुठे बाहेर पडलो नव्हतो. चोवीस तास एकच उद्योग, एकच ध्यास! मी सराव करू लागलो, म्हणजे मला भास व्हायचा, की पुढच्या ताना व सूर मला नानाच सांगत आहेत, तबल्याचा ठेका त्यांनीच धरला आहे व तंबोऱ्याच्या तारांवरून पण त्यांचीच बोटे फिरत आहेत. आज कार्यक्रमाच्या सुरुवातीला, एवढे लोक पाहून मी गडबडून गेलो होतो; पण डोळे मिटून घेताच नानांची मूर्ती डोळ्यांसमोर आली. ते म्हणाले, 'बेटा वाजव, मी ऐकतो आहे.' मला जोर चढला. माझ्या डोळ्यांसमोर प्रेक्षक नव्हते, थिएटर नव्हते, कोणी नव्हते. होते फक्त माझे नाना, मी आणि सूर!''

शिरीष गप्प बसला आणि मी काहीच बोलू शकत नव्हतो.

❖❖❖

## स्वाध्याय

**प्र. १. योग्य पर्याय ओळखून वाक्य पूर्ण करा.**


(अ) लेखकांना शिरीषला कार्यक्रम द्यायचा नव्हता, कारण.....

(१) तो नुकताच शिकायला आला होता.
(२) त्याला वाद्य वाजवता येत नव्हते.
(३) नुकताच शिकायला आल्याने विद्यालयाचे नाव बदनाम होण्याची शक्यता होती.
(४) तो कलेच्या प्रांतातला नवखा मुसाफिर होता.

(आ) लेखकांना आजपर्यंत बसला नव्हता तेवढा धक्का बसला, कारण....

(१) बारा वर्षांचा मुलगा शांतपणे वाजवत होता.
(२) ऐनवेळी कार्यक्रमाला हजर राहूनही शिरीष एवढे सुंदर वाजवत होता.
(३) शिरीषचा चेहरा पूर्वीच्या आत्मविश्वासाने न्हाऊन निघाला.
(४) मात्रेचाही फरक न करता शिरीष गात होता.

**प्र. २. आकृतिबंध पूर्ण करा.**




**प्र. ३. जोड्या जुळवा.**

पुढील दोन चौकटीतील शब्दांचा सहसंबंध ओळखून जोड्या लावा.

धीट, हजर, सुंदर, स्तुती

भित्रा, गैरहजर, कुरूप, निंदा

| | अ | ब |
|---|---|---|
| (१) | | |
| (२) | | |
| (३) | | |
| (४) | | |

**प्र. ४. खालील परिणामाबाबतच्या घटना लिहा.**

| परिणाम | घटना |
|---|---|
| (१) वडिलांच्या चेहऱ्यावर तृप्तीचे समाधान होते. | (१) |
| (२) शिरीषला वारंवार खेद वाटायचा. | (२) |

**प्र. ५. खालील वाक्यांत अधोरेखित शब्दांऐवजी पाठात आलेले योग्य वाक्प्रचार शोधून वाक्य पुन्हा लिहा.**

(१) वर्गातील विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे शिकवणे लक्षपूर्वक ऐकले पाहिजे.

(२) आपल्या शाळेचे नाव वाईट होऊ नये, म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने काळजी घ्यायला हवी.

(३) उत्तम वादनाने लेखकाचे शिरीषबाबतचे मत चांगले झाले.

**प्र. ६. खालील शब्द व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) कोलाहल | (अ) प्रवासी |
| (२) तऱ्हेवाईक | (आ) विचित्र |
| (३) मुसाफिर | (इ) प्रेरित |
| (४) उद्युक्त | (ई) गोंधळ |

**प्र. ७. स्वमत.**

(अ) शिरीषमधील तुम्हांला समजलेली गुणवैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

(आ) शिरीषची भूमिका तुम्हांला कोणता संदेश देते, ते तुमच्या शब्दांत लिहा.

**प्र. ८. अभिव्यक्ती.**

(अ) पाठातील तुम्हांला सर्वांत आवडलेला प्रसंग सांगून तो सकारण स्पष्ट करा.

(आ) प्रस्तुत कथेचे संवादरूपाने लेखन करा.

## भाषाभ्यास

**यावर्षी आपण उपमा व उत्प्रेक्षा या अलंकारांचा अभ्यास करू.**

### (१) उपमा अलंकार

**✻ खालील उदाहरण वाचून कृती करा.**

उदा., सावळाच रंग तुझा पावसाळि नभापरी !

**✻ चौकटी पूर्ण करा.**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) उपमेय | ☐ | (२) उपमान | ☐ |
| (३) समान धर्म | ☐ | (४) साधर्म्यवाचक शब्द | ☐ |

प्रस्तुत उदाहरणात 'तुझा रंग' याला पावसाळ्यातल्या नभाची उपमा दिल्यामुळे इथे 'उपमा अलंकार' झाला आहे.

उदा., कमलापरि मिटती दिवस उमलुनी तळ्यात.
प्रस्तुत उदाहरणात दिवस उगवणे, मावळणे या क्रियेला कमळाचे उमलणे, मिटणे याची उपमा दिली आहे.

**दोन वस्तूंतील किंवा कृतींतील साम्य चमत्कृतिपूर्ण रीतीने वर्णन केलेले असते, तिथे 'उपमा' हा अलंकार होतो.** या अलंकारात सम, समान, सारखे, वाणी, जैसे, तैसे, प्रमाण, सदृश, परी यांसारखे साम्यवाचक शब्द येतात.

**✻ खालील वाक्यांतील उपमेय, उपमान, साधर्म्यवाचक शब्द, साधर्म्य ओळखा.**

(१) आभाळागत माया तुझी आम्हांवरी राहू दे!
(२) त्याचे अक्षर मोत्यासारखे सुंदर आहे.

### (२) उत्प्रेक्षा अलंकार

**✻ खालील कृती करा.**

(१) हा आंबा जणू काय साखर वाटेल तुम्हाला.
वरील उदाहरणांतील उपमेय, उपमान, साधर्म्यवाचक शब्द, साधर्म्य शोधा.

**वरील उदाहरणांमधील उपमेय हे जणू उपमानच आहे, असे वर्णन केलेले असल्यामुळे इथे 'उत्प्रेक्षा' अलंकार झालेला आहे.**

**✻ खालील कृती करा.**

उदा., गरगर फिरे विमान हलवुनि
पंख उडत नभी हे पक्षीच जणू महान

उदा., तारांगणही स्पष्ट बिंबले
स्नाना जणुं हे मुनि अवतरले ।

वरील उदाहरणातील – उपमेय, उपमान, साम्यदर्शक शब्द, समान गुणधर्म व अलंकार ओळखा.

**उपमेय हे जणू उपमानच आहे अशी कल्पना केलेली असते तेव्हा 'उत्प्रेक्षा' अलंकार होतो.**
या अलंकारात जणू, काय, जेवि, गमे, भासे, वाटे, की, जसे, तसे हे साम्यवाचक शब्द येतात.

**✻ खालील ओळींमधील उपमेय, उपमान, साधर्म्यदर्शक शब्द व साधर्म्यदर्शक गुण ओळखा व अलंकाराचे नाव द्या.**

(१) आईचे प्रेम म्हणजे जणू सागरच!
(२) तिचे डोळे कमळाच्या पाकळ्यांसारखे सुंदर आहेत.


# ४. जी. आय. पी. रेल्वे

**प्रबोधनकार ठाकरे** – केशव सीताराम ठाकरे : (१८८५–१९७३) इतिहासकार, नाटककार, वृत्तपत्रकार, व्यंगचित्रकार, समाजसुधारक, फर्डे वक्ते. 'कुमारिकांचे शाप', 'भिक्षुकशाहीचे बंड' हे वैचारिक ग्रंथ; 'टाकलेले पोर' हे नाटक; 'ग्रामण्यांचा साद्यंत इतिहास', 'हिंदवी स्वराज्याचा खून', 'कोंदडाचा टणत्कार' इत्यादी इतिहासविषयक पुस्तके; 'संत रामदास', 'पंडिता रमाबाई', 'संत गाडगेमहाराज' इत्यादी चरित्रात्मक लेखन; 'माझी जीवनगाथा' हे आत्मचरित्र प्रसिद्ध.

सन १८५३ मध्ये इंग्रजांनी मुंबई ते ठाणे असा एकेरी रेल्वेमार्ग तयार केला. लोखंडी रूळावरून वाफेच्या जोरावर धावणारी रेल्वे पाहून लोकांना वाटणारे नवल, रेल्वेविषयी पसरलेल्या अफवा व त्यातून मार्ग काढत सुरू झालेला रेल्वे प्रवास, याचे अतिशय सुंदर, मार्मिक व ओघवत्या शैलीत वर्णन प्रस्तुत पाठातून लेखकांनी केले आहे.

मुंबई प्रांतात रेल्वे असावी असा उठाव मुंबईला प्रथम सर जमशेटजी जिजीभाई आणि जगन्नाथ नाना शंकरशेट यांनी केला. मूळजी जेठा मोरारजी गोकुळदास, आदमजी पीरभाई, डेविड ससून वगैरे अनेक नामांकित नगरशेटजींचे अर्थात त्यांना पाठबळ होतेच. सन १८५३ मध्ये ग्रेट इंडियन पेनिनशुला रेल्वेचा पहिला छोटा फाटा मुंबई ते ठाणेपर्यंत एकेरी रस्त्याचा तयार झाला. लोखंडी रूळावरून इंग्रज आगीनगाडी चालवणार, ही कल्पनाच लोकांना मोठी अचंब्याची वाटली.

अखेर मुहूर्ताचा दिवस जाहीर झाला. दिनांक १८ एप्रिल सन १८५३, सोमवार रोजी सायंकाळी ५ वाजता पहिली आगगाडी मुंबईहून निघाली. पाना–फुलांचे हार, तोरणे, निशाणे लावून १० मोठे खोलीवजा डबे शृंगारलेले. इंजिनावर अंग्रेजांचे मोठे निशाण फडकत आहे. डब्यांत गादीच्या खुर्च्या, कोच यांवर रेल्वेचे सगळे डायरेक्टर, सर जमशेटजी जीजीभाई, नाना शंकरशेट आणि अनेक इतर नगरशेट जामानिमा करून बसलेले. बरोबर पाच वाजता आगगाडीने कूऽक शिटीचा कर्णा फुंकून आपल्या भकभक,



फकफक प्रवासाला सुरुवात केली. मुंबई ते ठाणे दुतर्फा लाखांवर लोक कलियुगातला हा विंग्रेजी चमत्कार पाहायला आ वासून उभे होते. ना बैल, ना रेडा, ना घोडा आणि वाफेच्या जोरावर एक नाही, दोन नाही, दहा डब्यांची माळका खुशाल चालली आहे झुकझुक करत लोखंडी रूळांवरून! कमाल आहे बुवा या विंग्रेजांची! आता तर काय? विस्तव आणि पाणी यांची सांगड घालून विंग्रेजांनी वाफेलाच गाडी ओढायला लावले!

मुहूर्तावर निघालेली पहिली आगगाडी ठाण्याला जाऊन मुंबईला सुखरूप परत आली; पण त्या वाफेच्या गाडीत बसायचा लोकांना धीरच होईना. दुसऱ्या दिवसापासून लोकांना मोफत ठाणे ते मुंबई आणि परत नेण्या–आणण्याची दवंडी पिटण्यात आली. आगगाडीत बसणे धोक्याचे नाही, प्रवास लवकर नि सुखाचा होतो, हे लोकांना पटवण्याची रेल्वेच्या कारभाऱ्यांनी खूप आटापीटा केला; पण लोकांत

भलत्याच कंड्या नि अफवांचे पीक पिकले होते. वाफेची गाडी ही विंग्रेजांची विलायती भुताटकी आहे, मुंबईला नव्या इमारती नि पूल बांधताहेत, त्यांच्या पायांत जिवंत गाडायला फूस लावून माणसे नेण्याचा हा साळसूद डाव आहे, असल्या अफवांपुढे शहाणे प्रचारक काय करणार? एक दोन दिवस सरकारी कचेरीतले कारकून, व्यापाऱ्यांच्या पेढीवरचे गुमास्ते यांना मुंबई ते ठाण्याला नेऊन परत आलेले लोकांना दाखवले. त्यांनी आपले अनुभवही सांगितले. तेवढ्यानेही कोणाचे समाधान होईना.

अखेर दर माणशी एक रुपया इनाम आणि मोफत प्रवासाचा डंका वाजवला. पैशाच्या लालुचीने ठाण्याच्या घंटाळीवरचे आणि मुंबईचे लोक आगगाडीने जाऊ लागले का त्यांच्या घरची माणसे आजूबाजूला उभी राहून ठणाण धाय मोकलायची. त्यांची समजूत काढता काढता रेल्वेचे अधिकारी अगदी टेकीला यायचे. एकदा ते प्रवासी ठाणे-मुंबईची सफर करून सुखरूप परत आले, म्हणजे मग मात्र चौकशी करणाऱ्यांचे घोळकेच्या घोळके त्यांच्याभोवती जमायचे. रुपयांचे इनाम पुढे आठ आण्यांवर आले. नंतर चार आणे झाले. लोकांचा धीर चेपलासे पाहून, इनामे बंद झाली नि सर्रास तिकिटे चालू केली. एरवीचा ठाणे-मुंबईच्या बैलांच्या खटारगाडीचा प्रवास म्हणजे तब्बल एक दिवस खायचा; पण आता काय, अवघ्या सव्वा तासात ठाण्याचा असामी मुंबईला येऊ जाऊ लागला. मग मात्र लोकांची झुंबड लागली.

इकडे इंजनेर लोक कर्जत पळसधरीपासून बोरघाट पोखरण्याची योजना ठरवत असतानाच, खंडाळ्याहून पुण्यापर्यंतचा सपाटीचा रेल्वे-रस्ता सन १८५८ च्या फेब्रुवारीत पुरा झाला. त्याचाही मोठ्या थाटामाटाने 'ओपणिंग शिरोमणि' करण्यात आला. खंडाळा-पुण्याच्या दरम्यान खडकी आणि तळेगाव अशी दोनच स्टेशने ठेवण्यात आली. रस्ता एकेरीच होता.

बोरघाटाचे काम चालले असतानाच मुंबई-पुण्याचा रेल्वेप्रवास ज्यारीने चालू झाला. कसा ती मौज ऐका आता. पुण्याची गाडी खंडाळ्याला आली का सगळ्या पासिंजरांना तेथून पालख्या, डोल्या, खुर्च्या नि बैलगाड्यांत बसवून घाटाखाली खोपवलीला आणायचे. सगळा काफिल्ला खोपवलीला आला का तेथे पुन्हा आगगाडीत बसून झुकझुक करीत खुशाल मुंबईला रवाना व्हायचे. प्रवाशांची ही घाट-उतरणीची सुखसोय नि सरबराई पाहण्याचे कंत्राट मुंबईच्या करशेटजी जमशेटजी नावाच्या एका व्यापाऱ्याने घेतलेले होते. घाट-उतरणीचे चार तास धरून, पुणे ते मुंबईचा रेल्वे प्रवास अवघ्या अठरा तासांत व्हायचा, याचेच ज्याला त्याला मोठे नवल वाटायचे.

❖❖❖


## स्वाध्याय

**प्र. १. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहून वाक्य पूर्ण करा.**

(१) भारतात सर्वांत पहिली रेल्वे ............. येथून सुटली.
(ठाणे/मुंबई/कर्जत/पुणे)

(२) रेल्वेकडे लोकांना आकर्षित करण्यासाठी ............. ठेवले.
(तिकीट/बक्षीस/इनाम/प्रलोभन)

**प्र. २. आकृतिबंध पूर्ण करा.**



**प्र. ३. आकृती पूर्ण करा.**

(अ) रेल्वे असावी म्हणून उठाव करणारे ______ ______

(आ) इंडियन पेनिनशुला रेल्वे धावलेली ठिकाणे ______ ते ______

(इ) रेल्वे धावण्याच्या मुहूर्ताचा दिवस व साल ______ ______

(ई) घाट उतरणीची सुखसोय नि सरबराई पाहण्याचे कंत्राट घेणारे ______

**प्र. ४. खालील शब्दांसाठी पाठात आलेले पर्यायी शब्द शोधून लिहा.**

| | |
|---|---|
| मुनीम | |
| सरळमार्गी | |
| आश्चर्य | |
| नावाजलेले | |
| फुकट | |
| गंमत | |

**प्र. ५. कारणे लिहा.**

(अ) रेल्वेचा प्रवास धोक्याचा नाही हे पटवण्यासाठी रेल्वेच्या कारभाऱ्यांनी खूप आटापिटा केला.

(आ) इंग्रजांनी देऊ केलेली मुंबई-ठाणे रेल्वे प्रवासाची इनामे काही दिवसांनी बंद करण्यात आली.

**प्र. ६. स्वमत.**

(अ) 'रेल्वेचा शोध देशाच्या आर्थिक विकासाला गती देणारा ठरला', तुमचे मत लिहा.

(आ) स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतीयांवर असलेल्या अंधश्रद्धांच्या प्रभावांसंबंधी तुमचे विचार स्पष्ट करा.

(इ) तुमच्या मते रेल्वेप्रवासाचे असलेले फायदे व तोटे सविस्तर लिहा.

**उपक्रम :**

टेलिफोन, स्वयंपाकासाठीचा गॅस, संगणक यांसारख्या आधुनिक साधनांपैकी कोणत्याही एका साधनाचा पूर्व इतिहास जाणून घ्या व तो रंजक पद्धतीने लिहा.

GRLF4G

## भाषाभ्यास

### समास

**✼ खालील वाक्ये वाचा व अभ्यासा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) सूर्याचा उदय झाला. | सूर्योदय झाला. |
| (२) प्रत्येक दिवशी त्याची प्रतिष्ठा वाढत गेली. | दिवसेंदिवस त्याची प्रतिष्ठा वाढत गेली |

**✼ खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

(१) दोन्ही गटातील वाक्यांचा अर्थ एकच आहे का? ☐

(२) दोन गटातील शब्द सारखे आहेत का? ☐

(३) अधोरेखित शब्दांमध्ये 'अ' गट आणि 'ब' गटातील शब्दांमध्ये कोणता फरक आहे?

बोलण्याच्या ओघात आपण शब्दातील परस्परसंबंध दाखवणारे विभक्ती प्रत्यय गाळून सुटसुटीत असे जोडशब्द बनवतो. शब्दांच्या अशा एकत्रीकरणाला 'समास' असे म्हणतात. शब्दांच्या अशा एकत्रीकरणाने जो जोडशब्द तयार होतो त्याला 'सामासिक' शब्द म्हणतात.

**✼ समास विग्रह** – सामासिक शब्द कोणत्या शब्दांपासून तयार झाला हे स्पष्ट करण्यासाठी आपण त्याची फोड करतो. या फोड करून दाखविण्याच्या पद्धतीला **विग्रह** म्हणतात. वर 'ब' गटात सामासिक शब्द आहेत, तर 'अ' गटात विग्रह आहेत.

# काझीरंगा (स्थूलवाचन)

**वसंत अवसरे** – (१९०७–१९७६) : कवी, प्रवासवर्णनकार. 'यात्री' हा स्फुट कवितांचा संग्रह. 'भिक्षूंच्या प्रदेशातून', 'लाल नदी निळे डोंगर' ही प्रवासवर्णने प्रसिद्ध. प्रवासवर्णनांत निसर्गाच्या देखण्या रूपांसोबत त्या प्रदेशांतील लोकजीवनाचे सूक्ष्म अवलोकन, चिंतन व समाजवादी भूमिकेतून केलेले विश्लेषण आढळते.

प्रस्तुत पाठात लेखकांनी 'काझीरंगा' अभयारण्याच्या जंगलसफारीचे वर्णन केले आहे.

सुमारे दोनशे पासष्ट चौरस किलोमीटर विस्तार असलेली 'काझीरंगा' पशुस्थळी अथवा अभयारण्य साऱ्या भारताचे एक भूषण आहे. एक आफ्रिका सोडल्यास इतके विविध आणि असंख्य पशुपक्षी आसामशिवाय जगाच्या पाठीवर इतरत्र कुठेच आढळत नाहीत. इतकेच नव्हे, तर आसाममध्ये वावरणारे काही काही प्राणी जगाच्या पाठीवर दुसरीकडे कुठेही आढळत नाहीत. हुलॉक नावाचा एक पुच्छविहीन वानर फक्त आसामातच आढळतो. भारताच्या इतर कुठल्याही प्रांतात त्याची वस्ती नाही. त्याचे हुलॉक हे नावसुद्धा त्याच्या आवाजावरून पडले आहे.

आसामचे वैशिष्ट्य दाखवणारा दुसरा प्राणी म्हणजे एकशिंगी गेंडा. राज्याचे प्रतीक म्हणून आसामात ठिकठिकाणी त्याचे पुतळे उभारलेले आढळतात. कुणी म्हणेल हा अगदी निर्बुद्ध प्राणी एखाद्या राज्याचे प्रतीक म्हणून का पसंत केला जावा? पण प्रथमदर्शनी वाटतो तितका हा प्राणी टाकाऊ नाही. कोणातरी इंग्रज कवीने गेंड्यावर एक लहानशी कविता करून तो माणसांपेक्षा कसा श्रेष्ठ आहे ते दाखवले आहे.



एखाद्याचा पुतळा पाहणे आणि त्याला प्रत्यक्ष पाहणे यांत फार फरक असतो. मी तर गेंडा व त्याच्याबरोबर आसामातले इतर पशुपक्षीही प्रत्यक्ष व जवळून पाहण्याची संधी मिळावी म्हणून काझीरंगाला आलो होतो. अशा ठिकाणी वन्य पशू बहुधा सकाळी लवकर अथवा सूर्यास्ताच्या वेळी पाहायला मिळतात.

आदल्या रात्री खूप पाऊस पडला होता. तेव्हा सकाळी जर पावसाची बुरबुर चालू राहिली, तर जंगलात जाणे कठीण हे मी जाणून होतो; पण माझे नशीब जोरदार होते. दुसऱ्या दिवशी सकाळी आकाश पूर्णपणे निरभ्र होते. पूर्वेचा वारा पण इतका शांत होता, की जंगलात फिरणाऱ्या जनावरांना आमचा वासही येणे कठीण होते. काझीरंगाची भूमी ही कर्दमभूमी आहे. इथल्या कमरेइतक्या चिखलातून फिरणे माणसाला अशक्यच. शिवाय इथे सर्वत्र इतके उंच गवत वाढलेले असते, की त्यात हत्तीवर बसलेला माणूसही लपून जातो.

प्रवाशांना या जंगलात फिरवून आणण्यासाठी आसाम सरकारने पंधरा-वीस हत्ती खास शिकवून तयार ठेवलेले आहेत. हे हत्ती वन्य पशूंना घाबरत नाहीत व दाट गवतातूनही ते मार्ग काढू शकतात. साधारणत: असा समज आहे, की गेंडा हत्तीच्या अंगावर चालून जातो; पण शेजाऱ्याला निष्कारण त्रास देणे वन्यपशूंच्या रक्तातच नसते. गेंडादेखील या नियमाला अपवाद नाही. क्वचित केव्हातरी एकटा असलेला गेंडा समोर येणाऱ्या पशूवर धडक मारायला निघतो; पण एकलकोंडेपणाचे पर्यवसान तिरसटपणात झाले

नाही तरच नवल. जगातील प्रचंडकाय प्राण्यांत भारतातील एकशिंगी गेंड्याचा चौथा नंबर लागतो म्हणतात. पहिल्या तिघांत आफ्रिकी हत्ती, भारतीय हत्ती व आफ्रिकेतला सफेद गेंडा यांचा समावेश होतो.

जंगलात फिरण्यासाठी मला एक हत्तीण मिळाली होती. तिचे नाव वैजयंती असे होते. मोठी देखणी, इंद्राच्या ऐरावताची मुलगी शोभेल अशी होती ती आणि चालत पण होती अशी ऐटीत, की गवतातून चालताना जणू रेशमी साडी सळसळते आहे असे वाटावे. निघाल्यापासून थोड्याच वेळात ती एका जराशा उघड्या ठिकाणी आली आणि माहुताने खूण केल्याबरोबर उभी राहिली. समोरच आमच्याजवळ एक गेंडा अगदी निश्चल उभा होता. चिलखत घालून पहाऱ्यावर उभ्या असलेल्या एखाद्या विशालकाय योद्ध्यासारखा. जराशी मान हालवून त्याने आमच्याकडे पाहिले व मनात नक्की केले, की आपली जागा सोडून पुढे-मागे होण्याची जरुरी नाही. त्याचा फोटो घेण्याची माझी मनीषा जाणून माहुताने हत्तिणीला चुचकारत चुचकारत उभी केली. मी गेंड्याचे मनसोक्त फोटो घेतले.

त्या माहुताकडून दोन गोष्टींची माहिती मिळाली. बाजारात गेंड्याच्या नाकावरील शिंगाची किंमत जवळजवळ दोन हजार रुपये इतकी असते ही एक व दुसरी अशी, की शरीर थंड राखण्यासाठी चिखलाने अंग माखून घेणारा गेंडा हा सामाजिक आरोग्याचा भोक्ता असतो. सबंध मोठ्या जंगलात फक्त एकाच ठिकाणी जाऊन तो आपली विष्ठा टाकतो. कित्येक मैल दूर असला तरी त्याच एका जागेवर तो नेहमी परतून येतो. घाण वाटेल तेथे टाकू नये, शेजाऱ्या-पाजाऱ्यांना त्रास होईल असे वागू नये हे समजणारा गेंडा नि:संशय शहाणाच म्हटला पाहिजे.



माहुताने खूण केली व गर्रकन वळसा घेऊन वैजयंती दुसरीकडे निघाली. त्याच वेळी एक पांढराशुभ्र गायबगळा डोक्यावरून पंख हालवत उडाला. मी लगेच मनात नक्की केले, की जवळपास कुठेतरी रानम्हशींचा कळप असला पाहिजे. माझा तर्क खरा ठरला. गिरकी घेऊन बगळा जिथे उतरला, त्या दिशेने माहुताने वैजयंतीला हाकारले आणि पाच-पंधरा म्हशींचा एक कळप शांतपणे चरताना आमच्या दृष्टीस पडला. म्हशी गवतातून चालतात, त्या वेळी गवतातले अनेक लहान कीटक घाबरून हवेत उडतात. त्यांना खाण्यासाठी बगळे नेहमीच म्हशींच्या जवळ अथवा त्यांच्या पाठीवरही येऊन बसतात. विशाल शिंगांच्या दहा-पंधरा म्हशींच्या मधून वावरणारे बगळे पाहून मनात आले, की निसर्गाची ही काळ्यावरची पांढरी लिपी केव्हातरी कागदावर चित्रित केली पाहिजे. आसामी जंगलातल्या या रानम्हशींची शिंगे दिसायला मोठी सुंदर आणि विशाल अर्धचंद्राकृती असतात.

हत्तीपेक्षाही उंच असलेल्या 'एलिफंट ग्रास' (हत्ती गवत) मधून चिखल तुडवत माहुताने वैजयंतीला पुढे काढली. थोडे अंतर चालून गेल्यावर मध्येच थांबून तिने सोंड वर केली आणि तुतारीसारखी दीर्घ किंकाळी फोडली. मला वाटले काहीतरी संकट आहे. माहुताने इकडे तिकडे नजर फिरवली आणि हत्तिणीला पुढे चालण्याची सूचना केली. सावधपणे पावले टाकत, गवतातून चालत ती एका डबक्यापाशी आली. डबक्याच्या काठावर एक हरीण मरून पडले होते. हत्तिणीने पुन्हा एक किंकाळी फोडली आणि तोंड हवेत फिरवून चारी दिशांचा वास घेतला. जणू काय मृत्यूची पावले

आजूबाजूला कुठे रेंगाळत आहेत की काय याचा मागोवा ती घेत होती. माहुताने वैजयंतीला जरा खाली वाकायला लावले आणि आपल्या सोबत्याला खाली उडी मारायला सांगितले. त्या सोबत्याने खाली उतरून हरणाच्या प्रेताचे नीट निरीक्षण केले. कुठल्या तरी प्राण्याने छातीत शिंग खुपसून त्याची हत्या केली होती. किती नाजूक, सुंदर जीव; पण जनावराच्या एका आंधळ्या, वेड्या लहरीबरोबर चक्काचूर झाला त्याचा! माझे मन क्षणभर बधिर झाले.

काझीरंगाचा विस्तीर्ण वनप्रदेश तुडवत आणि भिजलेल्या वाऱ्यावर मंद मंद गतीने तरंगत गिरक्या घेणारा जमिनीचा व गवताचा वास हुंगत वैजयंती प्रवासी बंगल्याच्या दिशेने चालू लागली. का कोण जाणे; पण वाटेत पुन्हा ती थबकली आणि त्याच वेळी समोरून हरणांचा एक कळप उड्या मारत पळत पळत निघून गेला. त्या हरणांकडे पाहून एका विलक्षण समाधानाने माझे मन भरून आले. त्यांचा तो कळप सारंगांचा आहे असे मनाला वाटू लागले. किंचित काळसर अंगावर अस्पष्ट पांढुरके ठिपके असलेल्या हरणांना संस्कृत भाषेत सारंग म्हणतात. या हरणांचा कळप वेगाने जातो, त्या वेळी एखादा काळा-पांढरा ढग वाऱ्यावर तरंगतो आहे असे वाटते. ढगालाही संस्कृत भाषेत सारंग हे नाव आहे.

वैशाखातल्या पांढुरक्या ढगासारखे क्षणाक्षणाला वेगळे रूप घेणारे मन तिथे घोटाळत असताना वैजयंती काझीरंगाच्या कडेला येऊन उभी राहिली. प्रवासी बंगला तेथून जवळच होता.

❖❖❖

## स्वाध्याय

**प्र. १. काझीरंगा अभयारण्याची वैशिष्ट्ये खालील मुद्द्यांना अनुसरून लिहा.**

(अ) भौगोलिक वैशिष्ट्ये (आ) प्राणिजीवन

**प्र. २. 'प्राण्यांचे गंधज्ञान' या संकल्पनेबाबत तुमचे मत लिहा.**

**प्र. ३. 'काझीरंगा ही कर्दमभूमी आहे', हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.**

**प्र. ४. टीपा लिहा.**

(१) वैजयंती (२) एकशिंगी गेंडा (३) गेंड्याच्या सवयी (४) गायबगळे

**प्र. ५. 'तुम्ही केलेला जंगल प्रवास', याविषयी थोडक्यात माहिती लिहा.**

## भाषाभ्यास


**✻ खालील शब्दसमूहापासून सामासिक शब्द तयार करा.**

| शब्दसमूह | सामासिक शब्द |
|---|---|
| (१) ज्ञानरूपी अमृत | -------- |
| (२) पाच आरत्यांचा समूह | -------- |
| (३) प्रत्येक घरी | --------- |
| (४) लंब आहे उदर ज्याचे असा तो | --------- |
| (५) गुरू आणि शिष्य | --------- |

# ५. व्यायामाचे महत्त्व

**राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज – माणिक बंडोजी ठाकूर** (१९०९-१९६८) : संतकवी, समाजसुधारक. अंधश्रद्‌धा, जातिभेद, धर्मभेद यांसारख्या समाजविघातक गोष्टींवर हल्ले चढवून त्यांनी देशभक्ती, अहिंसा व आत्मसंयम यांचे पाठ दिले. गावागावातून 'गुरुदेव सेवा मंडळे' स्थापन केली. या कार्याबद्‌दल भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना 'राष्ट्रसंत' ही उपाधी देऊन त्यांचा गौरव केला. त्यांची 'अनुभवसागर भजनावली', 'सेवास्वधर्म', 'राष्ट्रीय भजनावली' इत्यादी पुस्तके प्रकाशित आहेत. शिक्षण, भेदाभेद व अस्पृश्यता निर्मूलन, अंधश्रद्‌धा निर्मूलन, स्वच्छता, सर्वधर्मसमभाव यांविषयी कळकळीचे आवाहन करणारा व अज्ञानी जनतेला वात्सल्ययुक्त भूमिकेतून लोकशिक्षण देणारा त्यांचा 'ग्रामगीता' हा ग्रंथ सर्वत्र आदराने वाचला जातो.

मानवी जीवनातील व्यायामाचे महत्त्व प्रस्तुत रचनेतून कवींनी स्पष्ट केले आहे.



व्यायाम आरोग्यदायी मित्र । हे ध्यानी ठेवावे सूत्र ।
आळस वैरी मानिला सर्वत्र । सर्वतोपरी ।।

व्यायामाविण सात्त्विक भोजन । तेहि मारी विकारी होऊन ।
व्यायामे होय अग्निदीपन । अन्नपचन सहजचि ।।

व्यायामे जडत्व जाई दूरी । व्यायामे अंगी राहे तरतरी ।
रक्तव्यवस्था उत्तम शरीरी । वाढे विचारी सजीवपण ।।

व्यायामाने सशक्त स्नायु । व्यायामे मानव होय दीर्घायु ।
व्यायामहीना पित्त, कफ, वायु । जर्जर करिती अत्यंत ।।

व्यायामे वाढे प्रतिकार शक्ति । स्वावलंबनाची प्रवृत्ति ।
व्यायामे अंगी वाढे स्फूर्ति । कार्य करण्याची ।।

## स्वाध्याय

**प्र. १. व्यायामाचे फायदे दर्शवणारा आकृतिबंध पूर्ण करा.**





**प्र. २. चूक की बरोबर ते लिहा.**

(अ) व्यायाम सर्वांकरता उपयुक्त असतो.
(आ) व्यायामाने जडत्व वाढते.
(इ) व्यायामाने स्नायू अशक्त होतात.
(ई) व्यायामाने प्रतिकारशक्ती वाढते.

**प्र. ३. शब्दसमूहांबद्दल एक शब्द चौकटींत लिहा.**

(अ) आरोग्य देणारी – ☐
(आ) विरोध करण्याची क्षमता असलेली शक्ती – ☐
(इ) स्वतःची कामे स्वतः करणारा – ☐

**प्र. ४. व्यायाम न करण्याचे तोटे लिहून आकृती पूर्ण करा.**




**प्र. ५. भावार्थाधारित.**

(अ) व्यायामाचे महत्व तुमच्या शब्दांत लिहा.
(आ) ‘व्यायामे अंगी वाढे स्फूर्ति। कार्य करण्याची ।।’ या पंक्तीतील तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.
(इ) ‘आरोग्यम् धनसंपदा’ या उक्तीतील विचाराचा विस्तार करा.

## भाषाभ्यास

समासात कमीत कमी दोन शब्द असावे लागतात. त्याला ‘पद’ असे म्हणतात. त्या दोन पदांपैकी कोणत्या पदाला प्राधान्य आहे यावरून समासाचे प्रकार ठरतात.

| पद | प्रधान / गौण (कमी महत्वाची) | समासाचे नाव |
|---|---|---|
| (१) पहिले पद | प्रधान | अव्ययीभाव |
| (२) दुसरे पद | प्रधान | तत्पुरुष |
| (३) दोन्ही पदे | प्रधान | द्वंद्व |
| (४) दोन्ही पद | गौण | बहुव्रीही |

यावर्षी आपल्याला ‘अव्ययीभाव’ आणि ‘द्वंद्व’ हे दोन समास समजून घ्यायचे आहेत.

GRVB64

# ६. ऑलिंपिक वर्तुळांचा गोफ

**बाळ ज. पंडित** (१९२९-२०१५) : प्रसिद्ध लेखक. क्रिकेट सामन्यांचे समालोचक. 'पहिले शतक', 'कुमारांचे खेळ', 'क्रिकेटमधील नवलकथा' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध.

ऑलिंपिक सामन्यांची सुरुवात का व कशी झाली? हे सामने भरवण्यामागील उद्दिष्टे कोणती? ऑलिंपिक वर्तुळांचा अर्थ काय? या सर्वांचा आढावा प्रस्तुत पाठातून लेखकांनी घेतला आहे. प्रस्तुत पाठातून जागतिक ऑलिंपिक क्रीडास्पर्धांविषयीची माहिती दिली आहे.

मनुष्याच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासात क्रीडेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सर्व स्तरांवर खेळले जाणारे क्रीडासामने हे जगभरातील क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधून घेणारे ठरतात.

संपूर्ण जगभरातील क्रीडासामन्यांत 'ऑलिंपिक क्रीडासामन्यांना' एक मानाचे स्थान आहे. विजयाचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून, आपल्याला आवडणाऱ्या खेळावर लक्ष केंद्रित करून, त्यांत पारंगत होऊन आपल्या देशाला 'ऑलिंपिक विजयाचे मानकरी' होण्यासाठी अधिकाधिक प्रयत्नशील राहूया.



ऑलिंपिक गावाकडे आमची मोटार भरधाव वेगाने जात होती. गर्दी प्रचंड असली तरी रहदारीला अडचण मुळीच नव्हती. येण्याजाण्यासाठी वेगवेगळे रस्ते होते. खेळांचे मैदान जवळ येऊ लागले, तसे आमचे डोळे समोरील क्षितिजाकडे लागले. खूपच उंच अशा स्तंभावर एक भलामोठा ध्वज फडफडत असलेला आम्हांला दिसला. ऑलिंपिक सामन्यांचे ते स्वतंत्र निशाण होते. ध्वजावरील पांढऱ्याशुभ्र पार्श्वभूमीवर लाल, पिवळ्या, निळ्या, हिरव्या व काळ्या रंगांची वर्तुळे एकमेकांत गुंफलेली होती. जणू पाच मित्रच हातांत हात घालून आपल्या मैत्रीची साक्ष जगाला देत होते! ही पाच वर्तुळे म्हणजे जगातील पाच खंड आणि त्यांची शुभ्रधवल पार्श्वभूमी म्हणजे विशाल अंतराळ. या ध्वजावर ऑलिंपिकचे ब्रीदवाक्य लिहिलेले आहे- 'सिटियस, ऑल्टियस, फॉर्टियस.' म्हणजे गतिमानता, उच्चता, तेजस्विता. प्रत्येक खेळाडूने जास्तीत जास्त गतिमान होण्याचा प्रयत्न केला पाहिजे; अधिकाधिक उंची गाठण्याची शिकस्त केली पाहिजे आणि बलसंवर्धनासाठी जास्तीत जास्त श्रम केले पाहिजेत, असा संदेश हा ध्वज खेळाडूंना देत असतो. या ध्वजस्तंभाजवळ एक स्फूर्तिदायक मशाल सतत तेवत असते. ऑलिंपिक सामने म्हणजे क्रीडापटूंसाठी आणि क्रीडाशौकिनांसाठी एक पर्वणीच असते. पृथ्वीच्या पाठीवरील सर्व राष्ट्रांतील सुमारे पाच ते सहा हजार खेळाडू या सामन्यांमध्ये भाग घेतात. स्त्री-खेळाडूंचीही संख्या दोन हजारांच्या आसपास असते. प्रेक्षागारात सुमारे सत्तर ते ऐंशी हजार प्रेक्षक बसण्याची सोय असते. याशिवाय सुमारे पंचवीस हजार लोकांना हे सामने उभे राहून पाहता येतात. पोहण्याच्या शर्यतीसाठी चार-पाच तलावही बांधलेले असतात.

खेळांचे विशाल मैदान, त्याभोवतालचे प्रचंड प्रेक्षागार, रहदारीसाठी मुद्दाम बांधलेल्या अनेक सडका, लोहमार्ग, पुरुष व स्त्री-खेळाडू यांच्या निवासासाठी बांधलेल्या असंख्य खोल्या असलेल्या इमारती, वसतिगृहे, प्रेक्षकांच्या श्रमपरिहारासाठी सुसज्ज अशी विशाल उपाहारगृहे-असे हे एक मोठे गावच असते! याला 'ऑलिंपिक व्हिलेज' असे म्हणतात. 'ऑलिंपिक व्हिलेज' वसवण्याची कल्पना इ. स. १९५६ मध्ये मेलबोर्न येथे मांडण्यात आली. पहिले 'ऑलिंपिक व्हिलेज' तिथलेच. ऑलिंपिक

सामने दर चार वर्षांनी होतात. हे सामने पाच दिवस चालत. इ. स. पूर्व ७७६ मध्ये हे सामने झाल्याची पहिली नोंद ग्रीस देशाच्या इतिहासात सापडते. त्या वेळी स्पर्धेत यशस्वी होणाऱ्या खेळाडूंचा, ऑलिव्ह वृक्षाच्या फांदीची माळ घालून, गौरव करण्यात येत असे. ग्रीस देशातील अनेक शहरे परस्परांतील भेदभाव विसरून या यशस्वी स्पर्धकांचे प्रचंड स्वागत करत. या सामन्यांतील खेळाडूंना राष्ट्रीय सणसमारंभाच्या वेळी मानाचे स्थान मिळत असे. पुढे ग्रीक सत्तेचा ऱ्हास झाला आणि त्याबरोबर इ. स. पूर्व ३९४ मध्ये हे सामने बंद पडले.

मैत्रीचा मंत्र सांगणाऱ्या या ऑलिंपिक सामन्यांची त्यानंतर इ. स. १८९४ साली आधुनिक जगाला आठवण झाली. त्या वर्षी फ्रान्स देशात एक 'ऑलिंपिक काँग्रेस' भरवण्यात आली होती. त्या काँग्रेसला अनेक राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. कुबर टीन नावाच्या फ्रेंच क्रीडातज्ज्ञाने या काँग्रेसमध्ये ऑलिंपिक सामन्यांचे पुनरुज्जीवन केले. शरीरसंपदा वाढवण्यासाठी, बलसंवर्धन करण्यासाठी आणि प्रामुख्याने देशादेशांतील मैत्री वाढून त्यांच्यात मित्रत्वाची स्पर्धा व्हावी यासाठी प्राचीन ऑलिंपिक सामन्यांप्रमाणेच यापुढे आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धा भरवाव्यात असे ठरले. १८९६ पासून ऑलिंपिक सामने दर चार वर्षांनी वेगवेगळ्या देशांत भरवले जातात. त्या निमित्ताने जगात सद्‌भावना, समता, मैत्री, विश्वबंधुत्व, शिस्त व ऐक्य या भावना वाढीस लागतात.

या सामन्यांत निरनिराळ्या एकवीस खेळांची तरतूद आहे. पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी वेगवेगळे सामने होतात. या सामन्यांच्या व्यवस्थेसाठी एक आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती नेमलेली असते. या स्पर्धांत भाग घेणाऱ्या प्रत्येक देशाचे एक ते तीन प्रतिनिधी या समितीत असतात. या समितीमध्ये खेळांची व्यवस्था त्या त्या खेळांच्या आंतरराष्ट्रीय संघाकडे असते. ऑलिंपिक सामन्यांसाठी लागणारा खर्च फारच मोठा असतो. हा सर्व पैसा स्पर्धक देश उभा करतात.


क्रीडेच्या क्षेत्रात जातिभेद नाही, धर्मभेद नाही की वर्णभेद नाही. येथे सर्वांना समान संधी मिळते. अमेरिकेतील जेसी ओवेन्स हा वंशाने आफ्रिकी खेळाडू. १९३६ मध्ये बर्लिनला झालेल्या ऑलिंपिक स्पर्धेत त्याने चार अजिंक्यपदे मिळवली. इतकेच नव्हे, तर त्या चारही बाबतींत त्याने नवे उच्चांक प्रस्थापित केले. अमेरिकेच्या यशाचा तो मोठा शिल्पकार ठरला. अमेरिकेनेच नव्हे, तर साऱ्या जगाने या खेळाडूचा त्या वेळी केवढा गौरव केला! केवढे कौतुक केले! ओवेन्सचा वर्ण, त्याचा देश हे सर्व विसरून साऱ्या जगाने त्याची प्रशंसा केली.

एमिल झेटोपेक हा झेकोस्लोव्हाकियाचा खेळाडू. १९५२ साली त्याने हेलसिंकीचे मैदान गाजवले. तेथे त्याने ५,००० मीटर धावणे व मॅरेथॉन या लांब पल्ल्याच्या शर्यतीत नवीन विक्रम केले व नवा इतिहास घडवला. जगातील एक 'मानवी रेल्वे इंजिन' अशी झेटोपेकने ख्याती मिळवली. यामुळे जगातील सर्व लोकांना झेटोपेकबद्‌दल तर अभिमान वाटलाच; पण त्याबरोबर झेकोस्लोव्हाकिया देशाबद्‌दलही त्यांच्या मनात आदर निर्माण झाला.


आफ्रिकेतील इथियोपियाचा अबेबे बिकिला या खेळाडूने तर अनवाणी पायाने मॅरेथॉन-लांब पल्ल्याची शर्यत जिंकली! एवढे मोठे अंतर त्याने २ तास १५ मिनिटांत काटले. फॅनी बँकर्स या स्त्री-खेळाडूने तर १९४८ साली ऑलिंपिकचे मैदान दणाणून सोडले. १०० व २०० मीटरच्या शर्यतीत प्रथम क्रमांक मिळवला. भारताने हॉकीच्या स्पर्धेत अनेक वर्षे अजिंक्यपद टिकवले. सुप्रसिद्‌ध भारतीय हॉकी खेळाडू ध्यानचंद यांचे नाव कित्येक वर्षे जगात सर्वांच्या जिभेवर नाचत होते. ऑलिंपिकच्या मैदानावर खेळाडू खेळत असतात, तेव्हा खेळाडूंना पराक्रमाचा व प्रयत्नवादाचा संदेश देणारा ध्वज डौलाने फडकत असतो. त्या ध्वजावरील पाच खंडांची पाच वर्तुळे समतेचा व विश्वबंधुत्वाचा संदेश जगाला देत असतात; तर त्याच्या शेजारीच क्षुद्र विचारांचा अंधकार घालवणारी ज्योत तेवत असते.

**प्र. १. आकृती पूर्ण करा.**

(अ)




(आ)




**प्र. २. योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) पहिले ऑलिंपिक व्हिलेज········· येथे वसले.
(अ) ग्रीस (आ) मेलबोर्न (इ) फ्रान्स (ई) अमेरिका

(२) ········· पासून ऑलिंपिक सामने दर चार वर्षांनी वेगवेगळ्या देशांत भरवले जातात.
(अ) १८९६ (आ) १९५६ (इ) इ. स. ७७६ (ई) इ. स. पूर्व ३९४

**प्र. ३. खालील वाक्य वाचा. अधोरेखित केलेल्या शब्दांबाबत माहिती भरून तक्ता पूर्ण करा. एखाद्या शब्दाला खालील मुद्दे लागू नसतील तर तिथे– हे चिन्ह लिहा. उदा., 'व' यासाठी लिंग, वचन, विभक्ती सगळीकडे – हे चिन्ह येईल.**

(१) पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी वेगवेगळे सामने होतात.

| अ. क्र. | शब्द | मूळ शब्द | शब्दजात | प्रकार | लिंग | वचन | विभक्ती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | पुरुषांसाठी | | | | | | |
| (२) | व | | | | | | |
| (३) | स्त्रियांसाठी | | | | | | |
| (४) | वेगवेगळे | | | | | | |
| (५) | सामने | | | | | | |
| (६) | होतात | | | | | | |

**प्र. ४. स्वमत.**

(१) 'ऑलिंपिक म्हणजे विश्वबंधुत्व' ही संकल्पना स्पष्ट करा.

**उपक्रम :** सन २०१६ साली झालेल्या ऑलिंपिक सामन्यातील सुवर्ण, रजत व कांस्यपदक मिळवणाऱ्या खेळाडूंची माहिती आंतरजालाचा वापर करून मिळवा व खालील तक्त्यात लिहा.

| अ. क्र. | व्यक्तीचे नाव | देश | खेळाचे नाव | पदक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

# ७. दिव्याच्या शोधामागचे दिव्य

**डॉ. अनिल गोडबोले** (१९४७ - २०२०) : प्रसिद्ध लेखक. 'संस्कार शिदोरी स्वातंत्र्यवीर सावरकर', 'थॉमस अल्वा एडिसन', '१८५७ ची यशोगाथा', 'सुबोधकथा', 'कथाकथनातून बालविकास' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध.

थॉमस अल्वा एडिसन यांनी शोध लावलेल्या दिव्याच्या शोधामागची कथा, एडिसन यांची प्रयोगशीलता, याचे मार्मिक वर्णन प्रस्तुत पाठातून लेखकांनी केले आहे.

वसंत ऋतूचे दिवस. काही दिवस सुट्टी घालविण्यासाठी मित्रांना घेऊन थॉमस एडिसन एका डोंगराळ भागातील खेडेगावात जाऊन राहिला. सूर्यग्रहण असल्यामुळे भर दिवसा सर्वत्र अंधार पसरला. तिथे काही शास्त्रज्ञ आणि ज्योतिषी सूर्यग्रहणाचा अभ्यास करण्यासाठी जमले होते. मित्रमंडळींच्या गप्पा रंगात आल्या होत्या; पण एडिसन कसल्या तरी विचारात गढून गेला होता. त्याच्या एका मित्राने सहजपणे विचारले, ''काय एडिसन साहेब, कसल्या एवढ्या विचारात गढलात? त्या अंधारावर मात करणाऱ्या प्रकाश देणाऱ्या वस्तूच्या शोधाची कल्पना तर नाही ना तुमच्या डोक्यात? असले काही तरी वेडगळ विचार नेहमीच तुमच्या डोक्यात येतात.''

''मला वेडगळ म्हणा किंवा काहीही म्हणा; पण खरेच नेमका असाच विचार माझ्या डोक्यात आता आला आहे. मी अशा काही तरी प्रकाश देणाऱ्या वस्तूच्या शोधात आहे, की जी किंमतीने कमी असेल; पण सामान्य माणसालाही रोजच्या जीवनात तिचा उपयोग होईल.''

एडिसनच्या मित्रांनी फारसे गंभीरपणे मनावर घेतले नाही. बऱ्याच जणांनी तर ते हसण्यावारीच नेले.

''तुम्हाला ही थट्टा वाटते? पण हातच्या कंकणाला आरसा कशाला? माझ्या मनातील कल्पनेप्रमाणे असणारी वस्तू शोधण्याचे आव्हान मी स्वीकारले आहे.'' एडिसन अगदी सहजपणे बोलून गेला. एखादी कल्पना मनात आली, की तिचा सतत पाठपुरावा करणे हे तर एडिसनचे वैशिष्ट्य होते.

एडिसनने आव्हान स्वीकारले खरे; पण हे काम वाटते तितके सोपे नव्हते. कृत्रिमरीत्या प्रकाश निर्माण करण्याचे व रात्रीचे दिवसात रूपांतर करण्याचे यापूर्वीही काही प्रयत्न झाले. सर हंफ्रे डेव्ही याने खाणीमध्ये वापरण्यासाठी एक कमानदार दिवा तयार केला होता. त्यात वीज वाहून नेणाऱ्या तारांच्या टोकांना कार्बनचे म्हणजे कोळशाच्या पदार्थाचे तुकडे जोडलेले होते. तारांची कार्बन जोडलेली टोके जवळ आणली, की त्यातून झगझगीत प्रकाश निर्माण व्हायचा; पण या प्रकाशाच्या उपयोगाला फार मर्यादा होत्या. दर वेळी कार्बनचे तुकडे जाळून प्रकाश निर्माण करणे हे काम खर्चीक होते. त्यातून निर्माण होणारा विषारी वायू हाही धोकादायक होता. प्रकाश तर जास्त वेळ टिकणारा हवा. तो कमी खर्चात निर्माण करता यायला हवा. तो फार प्रखरही नको. त्यातून विषारी वायूचा धोकाही नको. हे सारे कसे जमायचे? एडिसनचे विचारचक्र सुरू झाले.

कोणताही नवा शोध एकाएकी लागत नाही. निरीक्षण, अनुमान, प्रयोग, पुन्हा पुन्हा प्रयोग करणे हे चक्र सतत चालूच असते. एडिसनने प्लेटिनमचा उपयोग करून पाहिला. तो थोडा फार यशस्वी झाला; पण असला महागडा प्रयोग व्यवहार्य नव्हता. उन्हाळ्याचे दिवस. हातातल्या पंख्याने वारा घेत असताना एडिसनचे लक्ष पंख्याच्या काडीकडे गेले. ''या बांबूपासून कार्बन करता येईल का?'' मनात विचार आला, की लगेच प्रयोगांना सुरुवात. हा बांबू कोणत्या जातीचा असावा? उष्ण कटिबंधात आणि विशेषत: आफ्रिका आणि आशिया खंडात बांबूच्या असंख्या जातींची लागवड केली जाते. यापैकी कोणता बांबू उपयुक्त ठरेल याचा शोध घेणे आवश्यक होते. बांबूच्या जाती गोळा करण्यासाठी एडिसनच्या सहकाऱ्यांनी आफ्रिका खंडात हजारो मैल पायी प्रवास केला. त्या ठिकाणी त्यांना हिंस्त्र

पशूंशी आणि मलेरियाशी सतत सामना करावा लागला. बांबूच्या जाती गोळा करण्यासाठी एडिसनने पाण्यासारखा पैसा खर्च केला. त्यातून त्याने सहा हजार प्रकारच्या बांबूच्या जाती गोळा केल्या. बांबूपासून तयार केलेली फिलॅमेंट ही अधिक काळ प्रकाश देणारी ठरली; पण अजूनही त्याच्या मनाचे पूर्ण समाधान झाले नव्हते. प्रयोग सतत चालूच होते. हे प्रयोग चालू असताना एडिसनचे चहा, जेवण आणि झोप हे सारे प्रयोगशाळेतील टेबलावरच. भूक लागली, की उभ्या उभ्याच थोडेसे खायचे, थकल्यासारखे वाटले, की बसल्या बसल्या थोडीशी डुलकी घ्यायची. तरीही कामातून थोडीशी फुरसत मिळाली, की एडिसन त्याच्या सहकाऱ्यांना समुद्रावर मासे मारायला किंवा नृत्याच्या नाही तर गाण्याच्या कार्यक्रमांना घेऊन जायचा. मन ताजेतवाने झाले, की पुन्हा कामाला सुरुवात.

सुरुवाती सुरुवातीला दिव्याच्या प्रयोगाबाबतची प्रत्येक कल्पनाच योग्य आहे असे एडिसनला वाटायचे; पण प्रयोग करून पाहिल्यावर त्यातील फोलपणा जाणवायचा. केलेला प्रत्येक प्रयोग आणि त्यातून काय आढळले याची पद्धतशीर नोंद वह्यांमधून ठेवली. अशा त्याच्या प्रयोगाच्या दोनशे वह्यांची चाळीस हजार पाने भरून गेली. एडिसनचे काही टीकाकार त्याला म्हणायचे, ''हा सगळा खटाटोप फुकटचा गेला म्हणायचा! कारण यातल्या बहुतेक नोंदी या फसलेल्या प्रयोगांच्या आहेत.'' या टीकाकारांना एडिसनने उत्तर दिले आहे, ''मी जे हजारो प्रयोग केले ते फसले तरी फुकट गेले असे कसे म्हणता येईल? निदान माझ्यानंतर प्रयोग करणाऱ्यांना हेच प्रयोग पुन्हा करून पाहण्याची गरज नाही. त्यांचे ते श्रम आणि वेळ वाचला हा फायदाच नाही का?''

सतत दहा ते बारा वर्षे प्रयोग करून पाहिल्यानंतर दिव्यामध्ये फिलॅमेंटसाठी वापरण्यात येणाऱ्या टंगस्टन धातूचा प्रयोग यशस्वी झाला. इतका महत्त्वपूर्ण शोध लागला; पण तो लोकांना माहिती कसा व्हावा? त्याच्या डोक्यात एक कल्पना आली. मेन्लो पार्क येथील घराभोवती त्याने प्रचंड मोठा मांडव उभारला. त्या ठिकाणी नाना प्रकारच्या दिव्यांची आकर्षक रोषणाई केली. झाडात, झुडपात, अंगणात, गच्चीवर किंबहुना जिथे जागा मिळेल तिथे वाटाण्यापासून भोपळ्यापर्यंतच्या विविध आकाराचे आणि रंगाचे दिवे लावण्यात आले. तो दिवस होता २१ ऑक्टोबर १८७९ चा. घराभोवतीचा दिव्यांचा झगमगाट पाहायला सारे गावच्या गाव लोटले. एडिसनने केलेल्या या दिवाळीचा वर्तमानपत्रात आणि सगळीकडे गवगवा झाला. वर्तमानपत्रांतून दिव्याच्या शोधाची बातमी जगभर पसरली.

२१ ऑक्टोबर १९२९ या दिवशी एडिसनने लावलेल्या दिव्याच्या शोधाला पन्नास वर्षे पूर्ण झाल्यावर साऱ्या अमेरिकेने हा दिवस एखाद्या महोत्सवासारखा साजरा केला. एका मोठ्या समारंभात अमेरिकेच्या अध्यक्षांनी एडिसनचा सन्मान केला. या घटनेच्या निमित्ताने अमेरिकेच्या पोस्टखात्याने दिव्याचे चित्र असणारी तिकिटेही प्रसिद्ध केली.

एक सर्वसामान्य बुद्धिमत्ता असणाऱ्या एडिसनने हे सारे कसे केले याचे त्याच्या टीकाकारांना आश्चर्य वाटले; पण त्यांना एडिसनने मार्मिकपणे सांगितले, ''इतरांपेक्षा माझ्यामध्ये बुद्धिमत्ता अधिक होती असे मुळीच नाही; पण संकटांना तोंड देण्याची, असंख्य प्रकारचे प्रयोग करून पाहण्याची व हजारो वेळा अपयश आले तरी पुन्हा तितक्याच उमेदीने नवे प्रयोग करून पाहण्याची चिकाटी माझ्याजवळ होती. माझ्या यशात एक हिस्सा भाग बुद्धिमत्तेचा असल्यास नव्याण्णव हिस्से भाग हा चिकाटीचा आहे.''

❖❖❖

## स्वाध्याय

**प्र. १. (अ) आकृतिबंध पूर्ण करा.**

(१) सर भंफ्रे डेव्ही यांनी तयार केलेल्या दिव्याच्या मर्यादा

(२) बांबूच्या निरनिराळया जाती गोळा करण्यात एडिसनच्या सहकाऱ्यांना आलेल्या अडचणी

**(आ) रिकाम्या जागा भरा.**

(१) ....... या दिवशी एडिसनच्या घराभोवती आकर्षक रोषणाई होती.

(२) ....... दिव्याच्या शोधाची बातमी जगभर पसरली.

**प्र. २. (अ) योग्य पर्याय शोधून वाक्य पूर्ण करा.**

(१) प्लेटिनमचा प्रयोग..... होता.

(स्वस्त, फायदेशीर, महागडा, व्यवहार्य)

(२) फसलेल्या प्रयोगातूनही नंतर प्रयोग करणाऱ्यांचे ...... वाचतात.

(पैसे, श्रम, कागद, प्रयत्न)

**(आ) आकृती पूर्ण करा.**

एडिसनच्या व्यक्तिमत्त्वाचे गुणविशेष

**प्र. ३. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

(१) घराभोवती दिव्यांचा झगमगाट पाहायला सारे गाव लोटले.

(२) कार्बनचा तुकडा जोडून प्रकाश तयार करण्याचे काम खर्चीक होते.

(३) अमेरिकेच्या पोस्टखात्याने दिव्याचे चित्र असणारी तिकिटेही प्रसिद्ध केली.

(४) फसलेल्या प्रयोगांची पद्धतशीर नोंद एडिसनने वहीमध्ये ठेवली.

**प्र. ४. स्वमत.**

(१) संशोधक होण्यासाठी तुम्ही स्वतःच्या व्यक्तिमत्त्वात कसे बदल कराल ते ८-१० वाक्यांत लिहा.

(२) विज्ञानात नवे शोध लावण्यासाठी फक्त बुद्धिमत्ता पुरेशी नाही या मताशी आपण सहमत आहात का? असल्यास अथवा नसल्यास तुमचे मत सकारण स्पष्ट करा.

(३) तुमच्या मनात येणारा नवीन विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी तुम्ही कोणकोणते प्रयत्न कराल?

# अपठित गद्य आकलन.

आपण पाठ्यपुस्तकात गद्य व पद्य पाठांचा अभ्यास करतो. विविध साहित्यप्रकारांच्या अभ्यासाबरोबर भाषिक अंगाने प्रत्येक पाठाचा अभ्यास आपणांस करायचा असतो. विद्यार्थ्यांची भाषासमृद्धी, भाषिक विकास ही मराठी भाषा अध्ययन-अध्यापनाची प्रमुख उद्दिष्टे आहेत, म्हणूनच पाठ्यपुस्तकातील पाठांच्या सूक्ष्म अभ्यासाने आपल्याला कोणतेही साहित्य वाचल्यानंतर त्याचे आकलन होणे, आस्वाद घेता येणे व त्या भाषेचे सुयोग्य व्यावहारिक उपयोजन करता येणे ही उद्दिष्टे साध्य करता येतात. अशा पाठ्येतर भाषेच्या आकलनाचे, मूल्यमापन करण्याचे कौशल्य प्राप्त होण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तकात अपठित गद्यउतारा हा घटक समाविष्ट केला आहे. गद्य उतारा वाचून त्याचे आकलन होणे व त्यावरील स्वाध्याय तुम्ही स्वयंअध्ययनाने करणे येथे अपेक्षित आहे.

- **खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखालील कृती करा.**

**प्र.१ खालील आकृतिबंध पूर्ण करा.**

विद्यार्थ्यांची समाजात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या सवयी

विद्यार्थिजीवनात चांगल्या सवयींना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. चांगले साहित्य वाचणारा, योग्य त्याच बाबी लक्षात ठेवणारा, योग्य ठिकाणी खर्च करणारा, आवश्यक असेल तेवढेच बोलणारा, नेहमीच इतरांच्या मदतीसाठी तत्पर असणारा विद्यार्थी भावी आयुष्यात समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करतो. त्याने निवडलेल्या क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी त्याला विशेष मेहनतीची आवश्यकता पडत नाही.

तुम्ही जोपर्यंत मार्गदर्शन मिळवण्यासाठी स्वतःहून पुढाकार घेणार नाहीत, तोपर्यंत तुम्हांला कोणाचेही मार्गदर्शन मिळणार नाही. आपल्याला काय करायचे याची दिशा दुसरा ठरवणार नाही. तुम्हांलाच दिशा ठरवायची आहे आणि तुम्हांलाच त्या दिशेने चालायचेही आहे. हे स्वप्रयत्नानेच शक्य आहे. चांगल्या सवयी केवळ स्वप्रयत्नाला चालना देत नाहीत, त्या केवळ ध्येय गाठून थांबत नाहीत, तर त्या संपूर्ण मानवी गुण वृद्धिंगत करण्यास मदत करतात.

**प्र.२. 'चांगल्या सवयी आणि स्वप्रयत्न यामुळे व्यक्तिमत्त्व घडते' हे उदाहरणासह स्पष्ट करा.**

## भाषाभ्यास

### (१) अव्ययीभाव समास

*** अव्ययीभाव समास वैशिष्ट्ये** – (१) पहिले पद महत्त्वाचे असून ते बहुधा अव्यय असते.
(२) संपूर्ण सामासिक शब्द क्रियाविशेषण अव्ययाप्रमाणे काम करतो.
(आ, यथा, प्रति वगैरे उपसर्गांना संस्कृतात अव्यय म्हणतात.)

उदा., (१) गरजूंना यथाशक्ती मदत करावी.
(२) त्या गावात जागोजागी वाचनालये आहेत.
(३) क्रांतिकारकांनी आमरण कष्ट सोसले.

जागोजागी, घरोघरी यांसारख्या शब्दांत अव्यय दिसत नसले, तरी त्याचा विग्रह अव्ययासह केला जातो, म्हणून अशा शब्दांचा समावेश अव्ययीभाव समासात केला जातो.

*** खालील शब्दसमूहांपासून सामासिक शब्द बनवा.**

(१) विधीप्रमाणे (२) प्रत्येक गल्लीत (३) चुकीची शिस्त (४) धोक्याशिवाय (५) प्रत्येक दारी

# ८. सखू आजी

**राजन गवस** (१९५९) : प्रसिद्ध कथा कादंबरीकार, कवी, समीक्षक, संशोधक. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक. 'भंडारभोग', 'धिंगाणा','कळप', 'तणकट' इत्यादी कादंबऱ्या; 'हुंदका' काव्यसंग्रह; 'काचकवड्या' हा ललितगद्यसंग्रह प्रसिद्ध आहे.

प्रस्तुत पाठात सखूआजीच्या मनातील जुन्या-नव्या जीवनमूल्यांविषयीचे भान, तिची प्रगतिशील दृष्टी, निर्णयक्षमता, माणसांवरचे प्रेम अतिशय सहजतेने व ओघवत्या शैलीत लेखकांनी वर्णन केले आहे.

सखू आजी परवा वारली, ही गोष्ट कदाचित सांगण्याइतपत महत्वाची नसेल, कारण आपण कितीतरी मृत्यू रोज अनुभवत असतो. मग सखू आजी मरण पावली याला विशेष महत्त्व काय, असा प्रश्न कोणीही उपस्थित करू शकेल. याबाबत मला काहीही म्हणायचे नाही. तरीही सखू आजीचा मृत्यू मला खोलवर जखम करून गेला. आपलं असं काही हरवलं, असं मला आजही वाटतंय. माझ्या जगण्यातलं एक शुभ्र-निरभ्र काही संपलं अशी एक पोकळी वाढतेय. कोण सखू आजी ? माझी कोण लागत होती ती ? कोणीच नाही. ना माझ्या जातीची ना पातीची; पण तरीही ती माझ्या जवळची होती. रक्ताच्या माणसाइतकीच. सखू आजीचं वय वर्षे नव्वद. हातात काठी. वाकून कमान झालेलं शरीर. चेहरा सुरकुत्यांनी भरलेला. सखू आजी गल्लीतून जाताना कोणी सहज म्हटलं, ''आजी, कुठं चाललीस ?'' तर लगेच उत्तर ''कुठं जातोय बाबा. म्हातारं माणूस. हाडं गेली वड्याला, बघा माज्या मड्याला.'' म्हातारी काय बोलते हे सगळ्यांना समजायचं असं नाही; पण प्रत्येक जण तिच्याशी बोलायचा प्रयत्न करतो. म्हातारी प्रत्येकाशी बोलते. मला सखू आजी नेहमीच एक कविता वाटते. ती कवितेत बोलते. कवितेत जगते. तिच्याइतकं प्रचंड भाषिक ज्ञान मला कोणाकडंच दिसलं नाही.



सखू आजी सहज बोलायला लागली तरी एक कविताच बोलायची. म्हणजे कुणी म्हटलं, ''म्हातारी गप्प घरात बसायचं सोडून कुठं निघालीस मरायला.'' तर ती लगेच म्हणायची, ''मरण लोकाला, सरण दिक्काला/माजं कपाळ, भरलं आभाळ/मरलं माणूस, झिजलं कानुस/म्हातारी नवसाची, भरून उरायची'' हे सगळं ती जुळवून बोलायची असं नाही; पण ती बोलायला लागली, की आपोआपच तिच्या तोंडातून ते बाहेर यायचं. तिच्याशी बोलताना एक अवर्णनीय आनंद मिळायचा. लहानपणी शाळेला जाता जाता आजी आम्हांला गोळा करून बसायची. शेतातल्या देवाच्या गोष्टी सांगायची. आजीची गोष्ट कधी कधी आठवडा आठवडा चालायची. शाळेला जाताना काही वेळ. शाळेहून येताना काही वेळ. असा तो ठरलेला कार्यक्रम असायचा. एकदा आजीनं एक गोष्ट सहज सुरू केली आणि संपवली; पण ती माझ्या मनात दीर्घकाळ रेंगाळली. आजी म्हणाली, ''शेतात एक साप होता. त्याचा माणूस झाला. त्याला पंख फुटले. तो समुद्रावर गेला. चार तपं तपश्चर्या केली. परत आला. त्याचा बैल झाला. खांदा मळला. नांगर जुंपला. फाळाला नागीण डसली. बैलाची दातकुडी बसली. नांगराची नदी झाली. बैलाला आंघोळ घातली.

त्याचा साप झाला. नागिणीला घेऊन पळाला...'' हे सांगताना आजीच्या चेहऱ्यावरचे बदलणारे भाव, हातांच्या हालचाली, या साऱ्यांतून हे सारं आपल्यासमोर घडतं आहे. आपण पाहत आहोत, असं वाटून अंगावर शहारे यायचे. ही गोष्ट ऐकल्यानंतर कित्येक दिवस ही गोष्ट माझ्या स्वप्नात जशीच्या तशी घडायची. बैल आंघोळ करायला लागला, की डोळे टक्क उघडे पडायचे. तिथून पुढं झोपच लागायची नाही. कधी तरी आपल्या स्वप्नातला साप नागीण घेऊन जाईल आणि आपल्याला हे स्वप्न पडायचं बंद होईल, असं वाटायचं; पण कैक वर्षांत असं कधी घडलं नाही. ही कथा कधी अचानक स्वप्नात येतेच. आजीनं कैक गोष्टी सांगितल्या; पण एवढीच कशी मेंदूत रुतून बसली, हा प्रश्न अनुत्तरित आहे. त्या काळी आणि त्यानंतर या गोष्टीचा अर्थ आजीला विचारला होता तर ती फक्त हसायची. मध्येच एकदा म्हणाली, ''गाव गरतीला, सपान धरतीला/धरती दुवापली, माती हाराकली'' आता हे कोणाला कळणार? नंतर म्हातारीला काहीच विचारलं नाही.

सखू आजी गावातल्या कुणाच्याही बारशाला, लग्नाला, मयताला हटकून पुढं असायचीच. सगळं तिच्या म्हणण्यानुसार चालायचं. तिच्या शब्दाला चॅलेंज नसायचं. गावातल्या बापय माणसांत ती एकदम बरोबरीनं वावरायची. एकदा गावच्या लक्ष्मीची जत्रा ठरली. इडं पडलं. चाकबंदी झाली. अशात गावातली वस्तू बाहेर जाऊ द्यायची नाही, असा नियम. अशात सातबा घोरपड्याचा पोरगा वावगं वागला. गावबैठक बसली. पंच म्हणाले, ''रिवाजानुसार सातबाच्या पोराला दंड कराच.'' सगळ्यांनी माना डोलावल्या. निर्णय फायनल. एवढ्यात म्हातारी उठली. म्हणाली, ''पोरगं मांडीवर घाण करतंय म्हणून मांडी कापता व्हयगाऽऽ?'' सगळे टाळा पगळून बघाय लागले. बोलायचं काय? शेवटी सगळे उठले. आपापल्या घराच्या वाटेला लागले. सातबाच्या पोराला कोणीच काही बोललं नाही. म्हातारीची गावाला भीती होती.



एकदा सखू आजी गावातल्या आयाबाया गोळा करून आमच्या घरात आली. तेव्हा मी कॉलेजात होतो. आमच्या भागात तेव्हा प्रौढ साक्षरतेचे वर्ग जोरात होते; पण आमच्या गावात एकही चालत नव्हता. म्हातारी सगळ्या आयाबायांच्या समोर म्हणाली, ''आमचं पोरगं एवढं काय काय शिकलंय, आपल्याला दुसरा मास्तर कशाला पायजे. तूच शिकीव रंऽऽ आमाला.'' सखू आजी पंधरा दिवसांत वाचायला शिकली. सगळ्या बायकांना शिकवत सुटली. त्या वेळी आमच्या गावचा सरपंच अंगठेवाला होता. त्याला तिनं चावडीतच गाठला. आठवड्यात सहीपुरता साक्षर केला. आमच्या गावातला चोपडा यांचा पोरगा पहिल्यांदा पोलीस झाला. म्हातारीनं गावच्या बायका गोळा करून, त्याला ड्रेसवर ओवाळलं. दही-साखरेनं तोंड गोड केलं. गाव म्हणजे म्हातारीचा गोतावळा. तिला गावातल्या सगळ्या लहान-थोरांमध्ये आपलं घर दिसायचं.


सखू आजी शिकली सवरली असती, शहरात जन्मली असती, तर कुठल्या कुठं पोहोचली असती.

इतकी प्रचंड बुद्धी तिला लाभली होती; पण ते तिच्या नशिबात नव्हतं, म्हणून काही बिघडलं नव्हतं. तिनं सगळं तिच्या हयातीत काबीज केलं होतं. सखू आजी मरण पावली. लहान पोरांपासून म्हाताऱ्याकोताऱ्यांपर्यंत प्रत्येकाच्या डोळ्यांतून पाणी आलं. गाव पोरकं झालं.

आता फक्त आजीच्या दंतकथा. घडलेल्या न घडलेल्या. प्रत्येक गावात अशी एक आजी गावचा गोतावळा सांभाळून गेलेलीच असते. आता गावगाडा बदलला. आजीला जागाच उरली नाही. अडचण फक्त उद्याच्या मुलांची. त्यांनी अशा आजीची आठवण कुठली सांगायची?


## स्वाध्याय

**प्र. १. खालील घटनेचा लेखकावर झालेला परिणाम लिहा.**




**प्र. २. 'सखू आजी कवितेत बोलते, कवितेत जगते' हे विधान स्पष्ट करणारी पाठातील वाक्ये शोधा.**

**प्र. ३. गुणवैशिष्ट्ये लिहा.**




**प्र. ४. कंसातील सूचनेनुसार बदल करा.**

(अ) याबाबत मला काहीही म्हणायचे नाही. (काळ ओळखा.)

(आ) आजी, कुठं चाललीस? (अधोरेखित शब्दाची जात ओळखा.)

(इ) आजी माझ्या जवळची होती. (अधोरेखित शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा.)

(ई) डोंगराच्या कुशीत वसले होते ते गाव! (अधोरेखित शब्दाचा समानार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा.)

**प्र. ५. स्वमत.**

(अ) सखूआजीच्या व्यक्तिमत्व विशेषांपैकी तुम्हांला भावलेल्या कोणत्याही दोन विशेषांचे सकारण स्पष्टीकरण करा.

(आ) खालील मुद्द्यांना अनुसरून सखूआजीविषयी तुमचे मत लिहा.

(१) करारीपणा (२) आजीचा गोतावळा

**प्र. ६. अभिव्यक्ती.**

(अ) 'बदलत्या गावगाड्यात आजीला जागाच उरली नाही.' या विधानाबाबत तुमचे मत सविस्तर लिहा.

(आ) तुम्हांला समजलेल्या सखूआजीचे व्यक्तिचित्र रेखाटा.

(इ) सखूआजी व तुमची आजी यांच्या स्वभावातील साम्यस्थळे शोधा.

## भाषाभ्यास

**※ खालील सामासिक शब्दाचा विग्रह करा.**

| सामासिक शब्द | विग्रह |
| --- | --- |
| (१) यथामती | |
| (२) हरसाल | |
| (३) गावोगाव | |
| (४) आमरण | |
| (५) यथाशक्ती | |

### (२) द्वंद्व समास

**※ खालील उदाहरणे वाचा व अभ्यासा.**

(१) मुलांनी आईवडिलांची आज्ञा पाळावी.
(२) आई गावाहून चार पाच दिवसात परत येईल.
(३) दूरच्या प्रवासात सोबत अंथरुण पांघरुण घ्यावे.

(१) अधोरेखित शब्दात किती पदे आहेत?
(२) दोन्ही पदे महत्वाची वाटतात काय?

**द्वंद्व समास वैशिष्ट्ये**

दोन्ही पदे महत्वाची

समासाचा विग्रह आणि, व, या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांनी नाहीतर किंवा, अथवा या विकल्पबोधक उभयान्वयी अव्ययांनी करतात.

**※ द्वंद्व समासाचे तीन उपप्रकार**

| १) इतरेतर द्वंद्व | २) वैकल्पिक द्वंद्व | ३) समाहार द्वंद्व |
| --- | --- | --- |
| दोन्ही पदे महत्वाची<br>विग्रह - आणि, व या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांनी करावा. | दोन्ही पदे महत्वाची<br>विग्रह-वा, किंवा, अथवा अशा विकल्प बोधक उभयान्वयी अव्ययांनी करावा. | दोन्ही पदे महत्वाची<br>दोन्ही पदांसोबत त्याचप्रकारच्या इतर पदांचा समावेश (समाहार) गृहित धरलेला असतो. |
| उदा., कृष्णार्जुन<br>कृष्ण आणि अर्जुन | उदा., खरेखोटे<br>खरे किंवा खोटे | उदा., भाजीपाला<br>भाजी आणि इतर गोष्टी |

**※ तक्ता पूर्ण करा.**

**बाजूच्या चौकटीतून शब्द किंवा शब्दसमूह योग्य ठिकाणी भरून नंतर उरलेल्या चौकटी भरा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
| --- | --- | --- | --- |
| (१) | | | |
| (२) | बरेवाईट | बरे किंवा वाईट | वैकल्पिक द्वंद्व |
| (३) | | | |
| (४) | | | |
| (५) | | | |
| (६) | | | |
| (७) | | | |

घडोघडी
बरेवाईट
पाप किंवा पुण्य
प्रतिक्षण
मीठभाकरी
जन्मापासून मरेपर्यंत
खरेखोटे

# हास्यचित्रांतली मुलं (स्थूलवाचन)

**मधुकर धर्मापुरीकर** (१९५४) : कथालेखक, ललित लेखक आणि व्यंगचित्रांचे संग्राहक – अभ्यासक.

१९७६ पासून त्यांनी व्यंगचित्रांचा संग्रह करण्यास सुरुवात केली. कथालेखनासोबतच व्यंगचित्रांच्या आस्वादाच्या निमित्ताने विपुल लेखन. किशोरवयीन मुलांसाठी लिहिलेल्या 'अन्कॉमन मॅन आर. के. लक्ष्मण.' या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे. त्यांनी आर. के. नारायण यांच्या 'मालगुडी डेज' आणि 'स्वामी अॅण्ड फ्रेंडज' या पुस्तकांचे मराठी अनुवाद केलेले आहेत. 'अप्रपू', 'रूप', 'विश्‍वनाथ' हे कथासंग्रह; 'रेषालेखक वसंत सरवटे', 'हसऱ्या रेषेतून हसवण्याच्या पलीकडले' ही पुस्तके प्रसिद्ध.

हास्यचित्र, व्यंगचित्र म्हणजे काय? ती कशी वाचायला पाहिजेत? हे प्रस्तुत पाठातून सांगितले आहे. हास्यचित्रे, व्यंगचित्रे आपल्याला हसवतात, विचार करायला भाग पाडतात. हास्यचित्रे व व्यंगचित्रे यांमधील भेदाभेद दर्शवत लेखकांनी या चित्रदुनियेची सफर प्रस्तुत पाठातून घडवून आणली आहे. प्रस्तुत लेख 'वयम् २०१६'च्या दिवाळी अंकातून घेतला आहे.

आपण दररोज कार्टून्स पाहतो, ती आपल्या इतक्या सवयीची झालेली आहेत, की कार्टून्सच्या ऐवजी त्याला कुणी व्यंगचित्र किंवा हास्यचित्र म्हटलं, की आपण थबकतो. शिवाय, आपण सहसा जी पाहत असतो, ती असतात 'स्ट्रीप कार्टून्स' (म्हणजे चित्रमालिका). 'चिंटू' हे त्याचे सर्वांत महत्त्वाचे असे उदाहरण. अशा चित्राच्या पहिल्या भागात कुणीतरी कुणाला तरी सांगत असतं, बोलत असतं, मग त्याच्या दुसऱ्या-तिसऱ्या भागांत त्या सांगण्या-बोलण्यातून उलगडणारी गंमत असते! कधी आपल्याला एकाच भागाचं कार्टून पाहायला मिळतं, ते पाहून खुदकन हसू येतं आपल्याला. असं चित्र हे हास्यचित्र असतं; पण हास्यचित्र म्हणजे काय, असं विचारलं तर आपल्याला काय सांगता येईल?

कुणी सांगेल, वेडंवाकडं चित्र काढलं, की ते झालं कार्टून! कुणी म्हणेल, त्यात एक जोक असतो आणि कुणी सांगेल, त्यात एक माणूस असतो, तो दुसऱ्याला बोलतो, ते वाचलं की आपल्याला हसू येतं, वगैरे... हे सगळं सांगणं-बोलणं बाजूला ठेवून, आपल्याला हास्यचित्राची व्याख्या करायची झाल्यास अशी करता येईल – 'सफाईदार रेषांनी काढलेलं गमतीदार चित्र, म्हणजे हास्यचित्र'. हास्यचित्राचे वैशिष्ट्य काय, तर ते पाहिलं, की आपल्याला हसू येतं! व्यंगचित्र म्हणजे, हास्यचित्राचा पुढला टप्पा. व्यंगचित्रसुद्धा आपल्याला हसवतं; पण केवळ हसवणं एवढाच त्याचा हेतू नसतो. व्यंगचित्र पाहिल्यावर आपल्याला हसूही येतं आणि ते आपल्याला त्याशिवाय काहीतरी सांगू पाहत असतं. आपण जर त्या चित्रापाशी थोडं थांबून राहिलो, तर त्यात काही गमतीदार विचार मांडलेला असतो, हे आपल्या लक्षात येतं.

मुलांची हास्यचित्रं काढणं ही सर्वांत अवघड गोष्ट आहे. मुलांची म्हणजे, केवळ मुलांसाठीच नाही, तर हास्यचित्रात जी मुलं असतात, ती मुलं काढणं फार अवघड असतं, का ? तुम्ही काढून पाहा, तेव्हा लक्षात येईल. कारण, लहान मुलाचं चित्र-आकारानं लहान काढलं, तर ते थोडंच लहान मुलाचं वाटणार! एखादा उंच माणूस काढला, तर तो त्या उंच माणसाचा मुलगा वाटणार का, छे! मग... दाढीमिश्या नसल्या, की होईल का चित्रातलं पोरगं-नाही बुवा! तसंही होणार नाही. त्याला शर्ट-चड्डी घातली, की होईल का ते पोरगं... चित्र काढायचा प्रयत्न केला, की आपल्या या अडचणी लक्षात येतात. मोठ्या माणसाकडे आणि मुलाकडे आपण बारकाईनं पाहिलेलंच नाही, हेही आपल्या स्पष्टपणे लक्षात येईल! आणि इथेच व्यंगचित्रकाराचं कौशल्य लक्षात येतं. मुलांसाठी विनोद करणं एक वेळ सोपं; पण व्यंगचित्रातलं मूल हे मुलासारखं दिसणं सर्वांत कठीण!

आपण इथे वेगवेगळ्या व्यंगचित्रकारांनी, आपापल्या व्यंगचित्रांत-हास्यचित्रांत लहान मुलं कशी काढली आणि त्यांच्या बोलण्यातून, वागण्यातून त्यांचं लहानपण कसं उमटलं आहे, ते पाहूया. हास्यचित्र



म्हटलं, की आधी आठवण येते, ती शि.द. फडणीस या ज्येष्ठ व्यंगचित्रकाराच्या चित्रांची. शाळेतल्या चौथी-पाचवीच्या गणिताच्या पुस्तकात फडणीसांची हास्यचित्रे होती, ती पाहताना गणिताचा 'बाऊ' कमी झाला होता मुलांचा!

त्यांचं हे हास्यचित्र पाहा. जाड रेषांनी खरं म्हणजे मोठी माणसं काढता येतात, असा आपला समज. मात्र या चित्रात फ्रॉक घातलेली ही मुलगी लहान बाळाला दूध पाजावे, तशी या लहानग्या रोपट्याला पाणी घालते आहे, तेही किती काळजीने-दुधाच्या बाटलीने!

श्याम जोशी हे मराठीतले मागच्या पिढीचे महत्त्वाचे हास्यचित्रकार. त्यांची रेषा ही फडणीसांच्या रेषेपेक्षा अगदी उलट-नाजूक आणि लवचीक अशी! त्यांच्या या हास्यचित्रांत पाहा.







अगदी रांगणारं मूल काढलं आहे, त्याची हालचाल जाणवते, नाही का! शिवाय देवाला 'फूल' देणारा हा मुलगा त्या रांगणाऱ्या बाळापेक्षा मोठा! हास्यचित्र आणि चित्रात हाच फरक असतो. चित्रात हुबेहूब काढायचा प्रयत्न असतो तर हास्यचित्रात विनोदी माणूस एखाद्याच्या वागण्या-बोलण्याची जशी हुबेहूब नक्कल करतो, तशी ती चित्राची गमतीदार हुबेहूब नक्कल असते.

डेव्हीड लँग्डन या अमेरिकन व्यंगचित्रकाराची ही चित्रं पाहा. पहिल्या चित्रात चतुर मुलगा पैशाचा गल्ला फोडतो आहे, हा त्याचा पराक्रम आपल्याला दिसतो आणि मग त्याच्या चेहऱ्यावरचे ते भाव आपल्याला जाणवतात आणि खरे वाटतात.






तर दुसरं चित्र भोकाड पसरणाऱ्या मुलाचं; त्याला व्यंगचित्र म्हणता येईल. का बरं?... चित्र पाहताना आपलं लक्ष आधी जातं, ते काळ्या रंगाकडे-मुलाच्या मोठ्याने रडण्याकडे. आपल्याला वाटून जातं, की लहान मुलं उगीचच रडत असतात, तसंच हा रडतो आहे, बाकी काही नाही; पण चित्राकडे लक्षपूर्वक पाहिल्यावर आपल्याला दिसते, ती सेफ्टी पिन... आणि विचार येतो, अरे! ही पिन याला टोचत असणार आणि म्हणून याने भोकाड पसरले असणार. तसेच असावे, कारण मुलांच्या रडण्याला काही 'कारण' असतं! इथे त्याचे हातपाय कसे काढले आहेत, पाहा.




लहान मुलं लहान कशी दिसतात चित्रात? त्याचं नेमकं काय रहस्य आहे हे पाहायचं असेल, तर ज्या व्यंगचित्रात –हास्यचित्रात मोठा माणूस आणि छोटा मुलगा असे दोन्ही आहेत, अशी चित्रं पाहावीत. हे आहे, जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार आर.के. लक्ष्मण यांनी रेखाटलेलं व्यंगचित्र. खेड्यात मुलांचे केस कापणारे असायचे, मुलाला जमिनीवर बसवून त्याचे केस कापले जायचे. इथे पाहा, तो माणूस कसा बसला आहे, त्याचा आकार त्याच्या चेहऱ्यावरचे ते उत्साहाचे भाव आणि केस कापून घेणारा, कंटाळलेला, वैतागलेला मुलगा... तेच हात-पाय, तेच नाक-डोळे; पण फरक कुठे आहे ज्यामुळे हा मोठा माणूस वाटतो आणि हे मूल, लहान मूल वाटतं? आकाराने लहान-मोठेपण आहेच; पण त्याशिवाय अधिक काय आहे?

ही चिंटूची चित्रमालिका पाहा. इथेही हा फरक आपल्याला दिसतो. शिवाय, पहिल्या चित्रात त्या चिंटूचा प्रश्न त्याच्या बाबांप्रमाणे आपल्यालाही स्पष्ट कळत नाही, मात्र तिसऱ्या चित्रात त्याचा 'अर्थ' समजतो. त्या अर्थानं हे उत्तम असे व्यंगचित्र आहे, नाही का!




आता आणखी एक गंमत पाहू. हंगेरियन व्यंगचित्रकार रेबर याचे हे व्यंगचित्र. चित्र पाहताच आपल्याला वाटते, ही दोन वेगवेगळी चित्रं आहेत- एक लहान मुलगा आणि एक मोठा माणूस; पण भिंतीवर लावलेले तेच चित्र आणि दोघांच्या केसांची ठेवण पाहिल्यावर लक्षात येते, की हा लहानपणी मोठे व्हायोलिन वाजवतो आहे आणि आता मोठा झाल्यावर लहान व्हायोलिन वाजवतो आहे. लहान मुलांना 'मोठ्या' वस्तूंचं आकर्षण असतं आणि वाढत्या वयानुसार आपण जपलेला छंद अधिक खोल-सूक्ष्म असा होत जातो, बाह्य आकाराचं आकर्षण कमी होत असतं, असं या व्यंगचित्रकाराला सांगायचं आहे.





आता हे हास्यचित्र. चित्रकलेवर हुकूमत मिळवली, की हास्यचित्रात काय जादू करता येते, त्याचं उदाहरण. ब्रिटिश व्यंगचित्रकार नॉर्मन थेलवेल यांचं. मुलाची कॅप, त्याचा शर्ट आणि सॉक्स – बूट पाहून लक्षात येतं, की हा स्काउटचा मुलगा आहे. त्याच्याकडे सर्वच उपयोगी वस्तू अगदी तयार असतात. इथे, त्याच्या बुटात अगदी मध्यभागी काहीतरी घुसून बसलं आहे अन् ते काढण्याच्या नादात असलेला हा मुलगा पाहा ना, कसा वेडावाकडा झालेला आहे, शिवाय त्याचा चेहरा...आपल्याला अगदी गुंतवून टाकणारं हे हास्यचित्र.

आता आपल्या लक्षात आलं असेल, की लहान मुलाचं चित्र काढताना, त्या चित्राचा किंवा त्या मुलाचा लहान आकारच महत्त्वाचा नसतो, तर शरीराच्या प्रत्येक अवयवाचा आकार त्या प्रमाणात लहान असणं गरजेचं असतं. म्हणजे, हाता-पायांची बोटं, ती लहान काढली, की आपोआप नखं लहान होतात. नाकाचा, ओठांचा आकार काढल्यावर कळतं, की लहान मुलांच्या भुवया तशाच लहान किंवा एका रेषेच्या असतात आणि लहान मुलांना दाढी-मिश्या नसतात, हे तुम्हांला सांगायची गरज नाही! यापुढे व्यंगचित्रं-हास्यचित्रं पाहताना आणि काढताना, अशा बारीकसारीक गोष्टींची नोंद तुम्हीसुद्धा घेऊ शकाल.

❖❖❖

## स्वाध्याय

**प्र. १. खालील फरक लिहा.**

| व्यंगचित्र | हास्यचित्र |
|---|---|
| | |

**प्र. २. वैशिष्ट्ये लिहा.**

व्यंगचित्रे

**प्र. ३. 'व्यंगचित्र हे व्यक्तीचे गुण-दोष मांडण्याचे प्रभावी अस्त्र आहे', हा विचार सोदाहरण स्पष्ट करा.**

**प्र. ४. प्रस्तुत पाठातील व्यंगचित्रांपैकी तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका व्यंगचित्राचे तुम्ही केलेले निरीक्षण बारकाव्यासह स्वत:च्या शब्दांत लिहा.**

**प्र. ५. 'व्यंगचित्र रेखाटणे' ही कला आत्मसात करण्यासाठी कोणत्या गुणांची आवश्यकता असते, यासंबंधी तुमचे विचार लिहा.**

**प्र. ६. 'लहान मुलांची हास्यचित्रे काढणे अवघड आहे', याबाबत तुमचे मत स्पष्ट करा.**

**उपक्रम :** ५ मे या जागतिक व्यंगचित्र दिनाच्या निमित्ताने शाळेमध्ये व्यंगचित्रांचे प्रदर्शन भरवा व त्यांचा आस्वाद घ्या.

# ९. उजाड उघडे माळरानही

**ललिता गादगे** (१९५४): प्रसिद्ध कवयित्री. 'फसवी क्षितिजे', 'अग्निजळ', 'संवेदन' इत्यादी कवितासंग्रह; 'आयुष्याच्या काठाकाठाने', 'दु:ख आणि अश्रू', 'प्राजक्ताची फुले आणि दाह' हे कथासंग्रह; 'नाळबंधाची कहाणी', 'खिडकीतलं आभाळ' हे ललित गद्य प्रसिद्ध.

प्रस्तुत कवितेत कवयित्रींनी वसंतऋतूच्या आगमनामुळे सृष्टीच्या निसर्गसौंदर्यातील बदलांचे मनमोहक वर्णन केले आहे.

स्वागत करण्या वसंत ऋतूचे  
रंग उधळले दिशा-दिशांना,  
बेरड कोरड इथली सृष्टी  
घेऊन आली ती नजराणा ।।१।।

गर्द पोपटी लेऊन वसने  
मुरडत आली लिंबोणी,  
जर्द तांबडी कर्णफुलेही  
घालून सजली नागफणी ।।2।।

लुसलुस पाने अंगोपांगी  
झुले वड हा दंग होऊनी,  
दुरंगी चुनरीत उभी ही  
घाणेरी ही नटुनी थटुनी ।।3।।

सळसळ झळझळ पिंपळ पाने  
मऊ मुलायम मोरपिसापरी,  
सांबर लाल कळ्यांनी लखडून  
उभे स्वागता पाणंदीवरी ।।४।।

पळसफुले ही बहरून आली  
या मातीच्या अंकावरती,  
कुसुमे सारी या जगातली  
पाहून त्यांना मनात झुरती ।।५।।

आंब्याच्या मोहरातून आली  
कोकिळेची सुरेल तान,  
उजाड उघडे माळरानही  
गाऊ लागले वसंतगान ।।६।।

## स्वाध्याय

**प्र. १. (अ) कारणे लिहा.**

(अ) कवयित्रीच्या मते दाही दिशांना रंग उधळले, कारण ............

(आ) जगातील सर्व फुले मनात झुरू लागली, कारण ............

**(आ) खालील आकृतिबंध पूर्ण करा.**

**वसंतऋतूच्या स्वागतासाठी आतुर असलेले घटक**

**(इ) निसर्गाचे रूप खालील बाबतींत स्पष्ट करा.**

आगमनापूर्वी ← **वसंतऋतू** → आगमनानंतर

**प्र. २. सृष्टीतील खालील घटक वसंतऋतूच्या आगमनाने कसे सजले, ते स्पष्ट करा.**

| घटक | त्यांचे सजणे |
|---|---|
| (१) लिंबोणी | |
| (२) नागफणी | |
| (३) घाणेरी | |
| (४) पळसफुले | |

**प्र. ३. खालील शब्दांसाठी कवितेत आलेले समान अर्थाचे शब्द शोधा.**

(१) भेटवस्तू –

(२) सजली –

(३) अरुंद रस्ता –

(४) फुले –

**प्र. ४. भावार्थाधारित.**

(१) 'सांबर लाल कळ्यांनी लखडून उभे स्वागता पाणंदीवरी', या ओळीचा संदर्भ स्पष्ट करा.

(२) 'उजाड उघडे माळरानही गाऊ लागले वसंतगान' या ओळीतील तुम्हांला कळलेले अर्थसौंदर्य स्पष्ट करा.

**प्र. ५. अभिव्यक्ती.**

(अ) वसंतऋतूच्या आगमनाने सृष्टीत होणारे बदल तुमच्या निरीक्षणाने लिहा.

(आ) सृष्टीचे सौंदर्य कायम राहण्यासाठी तुम्हांला सुचतील असे उपाय लिहा.

GSHUCP

# १०. कुलूप

**श्री. कृ. कोल्हटकर** - श्रीपाद कृष्ण कोल्हटकर (१८७१-१९३४) : समीक्षक, लेखक, कवी, नाटककार, कथाकार, कादंबरीकार. 'मूकनायक', 'गुप्तमंजूष', 'मतिविकार', 'प्रेमशोधन' इत्यादी नाटके; 'दुटप्पी की दुहेरी', 'शामसुंदर' इत्यादी कादंबऱ्या; 'गीतोपायन' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध. 'सुदाम्याचे पोहे' हा त्यांचा विनोदी लेखांचा संग्रह प्रसिद्ध आहे.

स्वभावनिष्ठ व प्रसंगनिष्ठ विनोदाचा अतिशय चपखलपणे वापर प्रस्तुत पाठाचे खास वैशिष्ट्य आहे. बंडूनानांच्या कुलपांच्या हव्यासापायी त्यांच्यावर अनेक चमत्कारिक प्रसंग उद्भवतात, याचे वर्णन प्रस्तुत पाठात विनोदी शैलीत लेखकांनी केले आहे. प्रस्तुत पाठ हा 'सुदाम्याचे पोहे' या लेखसंग्रहातून घेतला आहे.

आमच्या बंडूनानांना कुलपांचा मोठा शौक. अनेक धातूंची, अनेक आकारांची, अनेक कळींची कुलपे जमवून त्यांनी एक संग्रहालय बनवले आहे. घरात दूध-दुभत्याच्या कपाटापासून तो तहत पैशाच्या तिजोरीपर्यंत प्रत्येक ठिकाणी त्यांनी कुलपे लावून नाकेबंदी करून टाकली आहे. घरावर एखादा डाका पडणार आहे अशी बातमी कळूनही कोणी इतकी तयारी करत नसेल! बरे, इतका बंदोबस्त करण्याचे कारण विचाराल, तर ते आपल्या चीजवस्तूंचे रक्षण व्हावे ही इच्छा नसून, कुलपांचा संग्रह मित्रमंडळींच्या नजरेस पडावा एवढीच आहे. या हव्यासामुळेच बंडूनानांनी काही कड्यांस दोन-दोन व काही दारांस दोन्ही बाजूंनी कुलपे लावलेली आहेत.

एवढा खटाटोप करून ठेवल्यामुळे बंडूनानांवर अनेक चमत्कारिक प्रसंगही आले आहेत. एकदा त्यांच्या धान्याच्या कोठीच्या कुलपाची किल्ली त्यांच्या कुटुंबाने हरवली. कुलूप जरा निराळ्या पद्धतीचे असल्यामुळे त्याला किल्ली शोधण्याकरता त्यांनी सगळा बाजार पालथा घातला, तरी किल्ली मिळेना! बरे, कुलूप लोहाराकडून काढवावे तर पोटच्या पोरापेक्षाही ममतेने वाढवलेल्या कुलपाची हाडे खिळखिळी होताना पाहणे हे बंडूनानांसारख्यांना जरा दुर्घटच होते. शिवाय गृहस्थ इतका मानी, की त्याने शेजाऱ्यांपाशी कधी पसाभर धान्यही उसने मागितले नव्हते. असो, अशा रीतीने पहिला दिवस तर घरातील सर्व मंडळींनी त्या कुलपानिमित्त कडकडीत उपास काढला. दुसऱ्या दिवशी द्वादशी; पण तो दिवसही सगळ्यांनी तितक्याच धार्मिकपणाने उपासात काढला. नानांचे तर डोळे पांढरे होण्याची वेळ आली. शेवटी सर्व हकीगत कळताच आम्ही स्वत: लोहारास घेऊन नानांच्या घरी गेलो व ते कुलूप एकदाचे फोडले; पण त्यामुळे नानांचा आमच्यावर इतका घुस्सा झाला, की ते पंधरा दिवसपर्यंत आमच्याशी नीटपणे बोलेनातच!

आपल्या उपयोगातील सर्व किल्ल्या बंडूनाना आपल्या जानव्यात अडकवून ठेवत असल्यामुळे त्या कधी हरवत नाहीत. हरवतात त्या बहुतकरून त्यांच्या कुटुंबाच्या ताब्यातल्या किल्ल्या. वरील अनर्थ गुदरल्यापासून साधी बाजारी कुलपेच ते कुटुंबाच्या स्वाधीन करू लागले. ही कुलपे किल्ल्यांच्या बाबतीत काहीच विधिनिषेध बाळगत नसत. त्यांना कोणतीही किल्ली, खिळा किंवा काडी चालत असे. कधी कधी तर नुसत्या हिसक्यानेच ती उघडत असत. त्यांची अशी 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्ती पाहून शेवटी नानांच्या पदरच्या एका विश्वासू नोकरालाही चोरी करण्याची इच्छा झाली व तो हजारपाचशेचे डबोले घेऊन पळून गेला. तिजोरीला कोणते कुलूप लावायचे याचा बंडूनानांना फार दिवस प्रश्न पडला होता. प्रथम त्यांनी अक्षरी कुलूप लावले; पण तिजोरी अंधारात असल्यामुळे कुलपाची अक्षरे जमवताना ती नीट दिसेनातच, म्हणून त्यांनी तिजोरी महत्प्रयासाने उजेडात आणून ठेवली. पण तेव्हापासून अक्षरे जुळवताना ती जवळ उभे राहाणारासही दिसू लागली. तेव्हा ती कुलपेही कुचकामाची ठरली. यापेक्षा अक्षरशत्रू कुलपे पुष्कळ बरी, असा टोला देत देत त्यांनी त्या कुलपाच्याऐवजी दुसऱ्या कुलपाची योजना केली. हे कुलूप नुसते दाबले की लागत असे.

उघडताना मात्र त्याला किल्लीची जरूर लागे. एके दिवशी बंडूनाना आम्हांकडे हर्षित मुद्रेने येऊन म्हणू लागले, ''आमच्या आर्यभूमीच्या पुत्रांना कल्पकता नाही म्हणून चोहोकडे ओरड चालू आहे. पण हा आरोप निव्वळ खोटा आहे. अहो, आम्हांला संधी मिळत नाही साधी! ती मिळती तर आम्हांमध्ये शेकडो एडिसन झाले असते.'' देशाभिमानाच्या या उकळीचा अर्थ विचारता बंडूनानांनी प्रथम आपली कोणत्याही प्रकारे स्तुती करणार नाही असे आम्हांपासून वचन घेतले. नंतर लोहाराच्या मदतीने त्यांनी स्वत: तयार केलेले एक कुलूप दाखवले. ते म्हणाले, ''या कुलपाची कल्पना मला आमच्या तिजोरीच्या कुलपावरून सुचली. या कुलपाचे गुणधर्म त्या कुलपाच्या अगदी विरुद्ध आहेत. त्या कुलपास उघडण्याला किल्ली पाहिजे-याला लावताना मात्र पाहिजे ते कुलूप नुसते दाबून लावता येते-माझे नुसत्या हिसड्यासरसे उघडते. हे कुलूप मी-आता तिजोरीला लावून पूर्वीचे काढून टाकणार.''

हा अकल्पित प्रकार ऐकून आम्ही नानांचे मन वळवण्याचा पुष्कळ प्रयत्न केला; पण ज्याचे नाव ते! नानांच्या अंगी दृढनिश्चय हा एक अलौकिक गुण आहे. 'आपल्या लोकांत कोणत्याही कलेला उत्तेजन नाही' अशी पुटपुट करत त्यांनी ठरलेला बेत लागलीच अमलात आणला. थोड्याच दिवसांत आमच्या अनुमानाप्रमाणे तिजोरीची चोरी झाली, तेव्हा तर नानांचा तिळपापड झाला! ते म्हणाले, ''आमच्याकडे चोरसुद्‌धा देशबुडवे व कलेला आश्रय न देणारे असतात!''

यानंतर नानांनी तिजोरीस घंटेचे कुलूप लावले व ती आपल्या निजायच्या खोलीत नेऊन ठेवली. ते म्हणाले, ''आता मात्र चोर माझ्या हाती नि:संशय सापडणार. बेट्याला कळणारसुद्‌धा नाही, की किल्लीचा प्रयोग सुरू होताच घंटा वाजायला लागून घरातील सर्व मंडळी जमतील व तात्काळ त्याला कोतवाल चावडी दिसेल! घंटेच्या आवाजाबरोबर मी ताडकन उठून त्याच्या मानगुटीस बसलोच समजा!'' हा विचार आम्हांलाही पसंत पडला.ज्या दिवशी ते कुलूप लावण्याचा बेत ठरला त्याच दिवशी रात्री आम्हांला घंटानाद ऐकू आल्यामुळे आम्ही बंडूनानांच्या निजायच्या खोलीत गेलो, तो काय चमत्कार सांगावा! बंडूनाना स्वत: उजव्या हाताने तिजोरीचे कुलूप उघडत असून डाव्या हाताने आपलाच उजवा हात जोराने पकडून 'चोर! चोर!' म्हणून ओरडत आहेत.यानंतर लवकरच आमच्या गावात लोकांची एक टोळी आली. त्यांच्याजवळ चाकू, सुऱ्या, कुलपे वगैरे बरेच जिन्नस विकण्यासाठी होते. त्यांच्याजवळची बहुतेक कुलपे बंडूनानांनीच विकत घेतली व घरातील सर्व जुनी कुलपे काढून त्यांनी त्यांच्या जागी या नवीन कुलपांची स्थापना केली. कर्मधर्मसंयोगाने एक नाटकमंडळीही याच सुमारास आमच्या गावात आलेली होती. तिचा पहिला प्रयोग 'सुभद्राहरण अथवा चौर्यविपाक' त्याच दिवशी होता. यास्तव आपली सर्व मंडळी बरोबर घेऊन बंडूनाना निर्भय चित्ताने नाटकाला गेले. जाताना त्यांनी म्हटलेसुद्‌धा, की 'आता चोरांना म्हणावे, या, कशी चोरी करता ती पाहू. तुमच्या बापजन्मीसुद्‌धा अशी तऱ्हेतऱ्हेची कुलपे तुम्ही पाहिली नसतील!''


नाटक सकाळी पाच वाजता आटोपले. नाना परत येऊन पाहतात तो सर्व पेट्यांची कुलपे जशीच्या तशी असून आतील माल मात्र चोरीस गेलेला! शोध करता, ही टोळीही पळून गेलेली आढळली. त्यावरून उघड असे अनुमान निघाले, की या लोकांनी बिचाऱ्या भोळसर नानांकडे आपली सर्व कुलपे खपवून पुढे रात्री अनायासे त्यांनी स्वत:च्याच किल्ल्या चालवून माल लांबवला! सुदैवाने त्या रात्री बंडूनानांचे कुटुंब त्यांच्या ताकदीस न जुमानता आपले सर्व दागिने अंगावर घालून नाटकाला गेले होते, त्यामुळे तेवढे मात्र बचावले. यापुढे बंडूनानांस नेहमी त्यांच्या कुटुंबाने टोमणा द्यावा, की 'दागिने घालण्याच्या माझ्या हौशीबद्‌दल आपण सदा मला दोष लावत होता; पण शेवटी आपल्या कुलपांपेक्षा माझ्या हौशीनेच आपल्या मिळकतीचा बचाव केला!''

बिचारे बंडूनाना तरी यावर काय बोलणार? त्यांच्या तोंडाला आपोआपच कुलूप बसले!

❖❖❖

## स्वाध्याय

**प्र. १. (अ) खालील आकृतिबंध पूर्ण करा.**




**(आ) कारणे शोधा**


(१) काही कड्यांना आणि काही दारांना दोन दोन कुलुपे लावलेली होती, कारण-----

(२) नानांनी शेजाऱ्यांना पसाभर धान्य मागितले नाही, कारण -----

**(इ) खालील चौकटीत दिलेल्या संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करा.**

| | संकल्पना | संकल्पनांचा अर्थ |
|---|---|---|
| (१) | वसुधैव कुटुंबकम् वृत्ती | |
| (२) | अक्षरशत्रू कुलूप | |
| (३) | चोर कलेला आश्रय देत नाही. | |
| (४) | माझ्या हौशीने मिळकतीचा बचाव केला | |

**(ई) आकृती पूर्ण करा.**




**प्र. २. (अ) खालील शब्दांचे अर्थ शोधून लिहा.**

(१) दुर्घट (२) हव्यास (३) कुचकामी

**प्र. ३. पाठात आलेल्या विनोदी वाक्यांचा शोध घ्या व ती लिहा.**

**प्र. ४. सहसंबंध शोधा.**

(१) अंधार : तम : : किल्ली :

(२) सावध : बेसावध : : विश्वासू :

(३) रमेश : नाम : : ते :

**प्र. ५. स्वमत.**

(१) बंडूनानांच्या तोंडाला आपोआप कुलूप बसण्याची तुम्हांला समजलेली कारणे स्वभाषेत लिहा.

**प्र. ६. अभिव्यक्ती.**

(१) बंडूनानांच्या छंदाच्या वर्णनातून पाठात घडणारा विनोद तुमच्या शब्दांत वर्णन करा.

(२) व्यक्तिमत्वविकासात छंदाचे असलेले महत्व लिहा.

GT60EC

# ११. आभाळातल्या पाऊलवाटा

नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असलेल्या भारतात प्राणी-पक्षी यांमधील वैविध्यही थक्क करणारे आहे. भारतात पक्ष्यांच्या १२४६ जाती आहेत. पक्ष्यांच्या दुनियेतल्या अनेक आश्चर्यकारक गोष्टींपैकी एक गोष्ट म्हणजे पक्ष्यांचे स्थलांतर होय. पक्षी स्थलांतर का, कुठून व कधी करतात, याचे विवेचन प्रस्तुत पाठात आले आहे. प्रस्तुत पाठ 'आपली सृष्टी आपले धन' या पुस्तकातून घेतला आहे.

पक्ष्यांच्या दुनियेतल्या अनेक गोष्टी आश्चर्यजनक आहेत; पण त्यातही सर्वांत स्तिमित करणारे काही असेल तर अनेक पक्षी-जाती वर्षातून दोनदा करत असलेला हजारो मैलांचा प्रवास. भारतातल्या कोणत्याही सरोवराकडे हिवाळ्याच्या सुरुवातीला नजर टाकली तर निरनिराळ्या जातींच्या बदकांनी पाणी अक्षरश: झाकलेले दिसते. हे पक्षी महिन्या दोन महिन्यांपूर्वी तर इथे नव्हते. एकदम हजारोंच्या संख्येने हे आले कुठून ?

युरोप आणि उत्तर आशियातून हजारो मैलांचा प्रवास करून बदकेच नव्हे, तर इतरही असंख्य जातींचे पक्षी नियमितपणे हिवाळ्याच्या आरंभी येऊ लागतात. भारतात येणारे श्वेतबलाक जर्मनीतून येतात, तर बदकांच्या काही जाती सायबेरियातून. बलाकांच्या स्थलांतराविषयी कालिदासाच्या वाङ्मयात उल्लेख आढळतात. हंस पक्षीसुद्धा पावसाळ्यात दिसत नाहीत, अशी वर्णने प्राचीन वाङ्मयात आहेत. मात्र या काळात हे पक्षी नक्की कुठे जातात याची मात्र माहिती दिसत नाही.

याच्या उलट युरोपमध्ये अनेक पक्षी हिवाळ्यात दिसेनासे होतात याची जाणीव होती; पण ते नक्की काय करतात हे कुणालाच माहिती नव्हते. अनेकांच्या समजुतीप्रमाणे बर्फ पडू लागण्यापूर्वी हे पक्षी बेडूक, खवलेकरी अथवा काही सस्तन प्राण्यांप्रमाणे चिखलात अथवा कपारीत गाडून घेऊन प्रदीर्घ हिवाळी झोप काढत असले पाहिजेत. पुढे माणूस एका खंडातून दुसऱ्या खंडात प्रवास करू लागला तेव्हा त्याच्या लक्षात आले, की आपल्या खंडातून गायब होणारे पक्षी त्याच ऋतूत दुसऱ्या खंडात दिसून येतात.



पक्ष्यांच्या स्थलांतराचा अभ्यास करणे, ही काही सोपी गोष्ट नाही; पण अवघडातल्या अवघड प्रश्नातून विज्ञानाला मार्ग काढावा लागतो. पक्ष्यांच्या स्थलांतराचे मार्ग शोधण्यासाठी एक साधा पण कष्टसाध्य उपाय गेल्या शतकापासून वापरला जात आहे. एखाद्या विशिष्ट भागात अनेक पक्षी पकडून त्यांच्या पायात खुणेचे वाळे अडकवून द्यायचे. ॲल्युमिनिअमचे बनवलेले हे वाळे हलके असतात, त्याचे पक्ष्यांना ओझे होत नाही. या वाळ्यावर ज्या संशोधनसंस्थेने ते लावले त्या संस्थेचे नाव आणि खुणेचा क्रमांक असतो. कोणत्या क्रमांकाचे वाळे कोणत्या पक्ष्याला, कुठे आणि केव्हा

लावले यांची संस्थेकडे नोंद असते.

वाळे अडकवलेले हे पक्षी पुन्हा मोकळे सोडले जातात. एखादा वाळे असलेला पक्षी जिवंत अथवा मृत ज्याला सापडेल त्याने त्या संस्थेला कळवावे अशी अपेक्षा असते. अर्थात लावलेल्या सर्व वाळ्यांची माहिती परत मिळतेच असे नाही; परंतु शंभरातल्या एक दोन वाळ्यांचा जरी पत्ता लागला तरी त्यातून मौल्यवान माहिती मिळू शकते. केरळात वाळे लावलेले परीट पक्षी काबूल, अफगाणिस्तान, वायव्य पाकिस्तान या भागांत सापडले आहेत. केरळातलाच एक रानपरीट (forest wagtail) ब्रम्हदेशात सापडला आहे. जर्मनीत वाळे लावलेला बलाक बिकानेरमध्ये सापडला आहे.

अलीकडच्या काळात विमाने आणि रडारयंत्रणेमुळे सुद्धा पक्ष्यांच्या स्थलांतराविषयी मोलाची माहिती मिळाली आहे. तरीसुद्धा पक्ष्यांच्या या गूढ सवयींसंबंधीची कित्येक रहस्ये अद्याप उकललेली नाहीत.


पक्ष्यांच्या स्थलांतराचे अनेक प्रकार पाडता येतील. हिमालयासारख्या पर्वतरांगांमध्ये राहणारे पक्षी थंडीत खाली दरीत अथवा सखल भागात उतरतात आणि उन्हाळ्यात परत वर सरकतात. त्यांचा एकूण प्रवास काही किलोमीटरचाच असतो. अनेकदा दुष्काळ, महापूर अथवा बर्फवृष्टीमुळे एखाद्या प्रांतात अन्न मिळेनासे झाले, की पक्षी तो प्रांत सोडून तात्पुरते दुसरीकडे जातात. मुळात अन्नाचे दुर्भिक्ष हीच स्थलांतरामागची मूळ प्रेरणा आहे. पक्ष्यांना थंडीवाऱ्याची फारशी काळजी नसते. अन्नाचा पुरेसा पुरवठा असेल, तर पक्षी बर्फाळ प्रांतातही व्यवस्थित जगू शकतात. एरवी दोन ते पाच हजार मीटर उंचीपर्यंत सापडणारे हिमकाक पक्षी एव्हरेस्ट चढणाऱ्या गिर्यारोहकांच्या मागे मागे साडेआठ हजार मीटर म्हणजे सुमारे सत्तावीस हजार फुटांपर्यंत आल्याची नोंद आहे. एवढ्या उंचीवर या पक्ष्यांना बर्फ, थंडी आणि हवेची कमी होत जाणारी घनता याचा कोणत्याही प्रकारे त्रास होत असलेला दिसत नाही. हिवाळ्यात पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर करतात ते थंडीमुळे नाही तर बर्फ पडून अन्न शोधणे कठीण झाल्यामुळे.

अनेक पक्षी असे आहेत, की जे बर्फ पडायला लागण्याच्या बरेच आधी, अन्न अद्यापही भरपूर उपलब्ध असतानाच आपल्या दक्षिणयात्रेला सुरुवात करतात. हे पक्षी स्थलांतरासाठी अन्नाच्या तुटवड्याची वाट पाहत बसत नाहीत. सूर्य दक्षिणेकडे झुकू लागला, की त्यांचे मन जणू उचल खाते, दक्षिणेची ओढ लागते, आतील अस्वस्थता वाढते. एका जातीचे अनेक पक्षी एकत्र येतात आणि ठरावीक मुहूर्ताला प्रयाण करतात. या पक्ष्यांच्या बाबतीत स्थलांतराचा आता अन्नाशी संबंध उरला नसून ठरावीक ऋतूत ठरावीक दिशेने झेप घेणे हा एक 'धार्मिक विधी' असल्यासारखा त्यांच्या जीवनाचाच एक भाग झाला आहे. परतीच्या प्रवासाचेही तसेच. वसंतागमाला सगळेच पक्षी अनामिक ओढीने आपल्या उत्तरेतल्या घरांकडे निघतात.


❖❖❖

## स्वाध्याय


**प्र. १. (अ) पक्षी स्थलांतराच्या अभ्यासाच्या वाळे अडकविण्याच्या पद्धतीचा घटनाक्रम लिहा.**



**(आ) पक्ष्यांच्या स्थलांतराची वैशिष्ट्ये लिहा.**



**(इ) स्थलांतर करणाऱ्या वेगवेगळ्या जातींतील पक्ष्यांचे साम्यघटक लिहा.**



**प्र. २. फरक स्पष्ट करा.**

| दक्षिणेतील हवामान | उत्तरेतील हवामान |
|---|---|
| (१) | (१) |
| (२) | (२) |
| (३) | (३) |

**प्र. ३. चौकटी पूर्ण करा.**

(अ) पक्ष्यांच्या स्थलांतराची मूळ प्रेरणा–

(आ) बलाकांचे भारतात या देशातून होणारे स्थलांतर –

(इ) आधुनिक काळात पक्ष्यांच्या स्थलांतराची माहिती देणाऱ्या गोष्टी–

(ई) गिर्यारोहकांच्यामागे जाणारा पक्षी–

**प्र. ४. कारणे लिहा.**

(अ) फक्त ॲल्युमिनिअमचेच वाळे पक्ष्यांच्या पायात अडकवतात कारण.....

(आ) हिवाळ्यात पक्षी दक्षिणेकडे स्थलांतर करतात कारण .....

**प्र. ५. सूचनेप्रमाणे कृती करा.**

(अ) पक्ष्यांना घराकडे जाण्याची चाहूल लागते. (या अर्थाचे पाठातील वाक्य शोधा.)

(आ) जर्मनी आणि सायबेरिया हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

(इ) वाळे अडवलेले पक्षी मोकळे सोडले जातात. (अधोरेखित शब्दाचा विरुद्धार्थी शब्द वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

**प्र. ६. स्वमत.**

(१) पक्षी निरीक्षणातून पक्ष्यांच्या जीवनपद्धतीसंबंधी तुमची मते सविस्तर लिहा.

(२) तुमच्या मते मानवी जीवन व पक्षी जीवन यांच्यातील महत्त्वाचे साधर्म्य सोदाहरण लिहा.

**प्र. ७. अभिव्यक्ती.**


(१) 'पक्षी जाय दिगंतरा' ही उक्ती पाठाच्या आधारे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

(२) तुम्हांला पक्षिमित्र बनायला आवडेल काय ? तुमचे मत सकारण लिहा.

# १२. पुन्हा एकदा

**प्रतिमा इंगोले** (१९५३) : ग्रामीण कथाकार, कवयित्री. 'हजारी बेलपान', 'अकसिदीचे दाने', 'सुगरनचा खोपा', 'जावयाचं पोर' इत्यादी कथासंग्रह; 'भुलाई' हा कवितासंग्रह; 'बुढाई' ही कादंबरी प्रसिद्ध. अस्सल वैदर्भी बोलीचा प्रभावी वापर हे त्यांच्या लेखनाचे खास वैशिष्ट्य आहे.

नवनिर्माणाचा ध्यास घेतलेल्या मनाच्या भावस्थितीचे वर्णन प्रस्तुत कवितेत कवयित्रींनी केले आहे.



पुन्हा एकदा
चमकावी वीज
उतरावी खाली
भिनावी रक्तात
पेटावे स्नायू
करीत पुकार
पुन्हा एकवार

पुन्हा एकदा
घालीत पिंगा
पावसाच्या सरी
व्हाव्यात बेभान
कोसळाव्या खाली
मातीत माती
व्हावी एक...
पुसून टाकीत
भेदाभेद...
पुन्हा एकवेळ...

पुन्हा एकदा
घुमावा वारा
युवक इथला
भारला जावा
भुलावी तहान
विसरावी भूक
नवनिर्माणाची
लागावी चाहूल
उजळावी भूमी...
दिगंतात...
पुन्हा एकदा...

## स्वाध्याय

**प्र. १. कवयित्रीला असे का म्हणावेसे वाटते? ते लिहा.**

(१) पावसाच्या सरी कोसळाव्यात, कारण ......................................

(२) भुलावी तहान विसरावी भूक, कारण ............................................

**प्र. २. खालील घटनांचे कवयित्रीला अपेक्षित परिणाम लिहा.**

| गोष्टी | परिणाम |
|---|---|
| (१) वीज चमकणे. | |
| (२) वारा घुमणे. | |

**प्र. ३. खालील प्रतीके व त्यांचा अर्थ यांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) वीज रक्तात भिनावी | (अ) सर्वत्र भारत भूमी चमकावी |
| (२) मातीत माती एक व्हावी | (आ) समाजातील भेदभाव नष्ट व्हावे |
| (३) नवनिर्माणाची चाहूल लागावी | (इ) मातीने भेदभाव विसरावा |
| (४) पुसून टाकीत भेदभाव | (ई) माणसांत उत्साह निर्माण व्हावा |
| (५) उजळावी भूमी दिगंतात | (उ) नवनवीन गोष्टीची निर्मिती करण्याची इच्छा व्हावी |

**प्र. ४. भावार्थाधारित.**

'मातीत माती व्हावी एक, पुसून टाकीत भेदाभेद' या काव्यपंक्तीतील सामाजिक आशय स्पष्ट करा.

**प्र. ५. अभिव्यक्ती.**

(१) आपल्या देशात शांतता निर्माण व्हावी यासाठी 'पुन्हा एकदा' काय व्हावे असे तुम्हांस वाटते, ते स्वतःच्या शब्दांत सविस्तर लिहा.

(२) कवितेचा तुम्हांला समजलेला भावार्थ स्पष्ट करा.

## अपठित गद्य आकलन.

• **खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखालील कृती करा.**

**प्र. १. चौकटी पूर्ण करा.**

(अ) झेंड्याचा पांढरा रंग गुणांचा निदर्शक ☐

(आ) झेंड्याचा केशरी रंग गुणांचा निदर्शक ☐

(इ) झेंड्याचा हिरवा रंग गुणांचा निदर्शक ☐

आपल्या झेंड्याचा मधला भाग पांढरा आहे. त्याचा अर्थ काय? पांढरा रंग प्रकाशाचा सत्याचा व साधेपणाचा निदर्शक आहे आणि त्यावरील अशोकचक्र काय सांगते? ते सद्गुणांची, धर्माची खूण सांगते. या झेंड्याखाली काम करताना आपण धर्ममय राहू, सत्यमय राहू असा त्याचा अर्थ आहे. आपल्या वर्तनाची ही सूत्रे राहू देत. या चक्राचा आणखी काय अर्थ आहे? चक्र म्हणजे गती. हे चक्र सांगते, की गतिमान राहा. केशरी रंग त्यागाचा व नम्रतेचा निदर्शक आहे आणि हिरवा रंग म्हणजे हरितश्यामल भूमातेचा. या ध्वजाखाली उभे राहून सेवावृत्तीने व निरहंकारीपणाने आपण पृथ्वीवर स्वर्ग निर्मूया.

**प्र. २. झेंड्यातील अर्थपूर्णता स्वभाषेत स्पष्ट करा.**

## व्हेनिस (स्थूलवाचन)

**रमेश मंत्री – रमेश राजाराम मंत्री** (१९२५-१९९८) : कथाकार, प्रवासवर्णनकार, विनोदी लेखक. 'थंडीचे दिवस', 'सुखाचे दिवस', 'नवरंग' इत्यादी प्रवासवर्णने प्रसिद्ध. १९७९ साली एकाच वर्षात ३४ पुस्तके प्रकाशित करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे.

'व्हेनिस' या पाण्यावर तरंगणाऱ्या शहरातील वातावरण, हवामान, निसर्गसौंदर्य व जीवनमान, या सर्वाचे वर्णन प्रस्तुत पाठात लेखकांनी केले आहे.

व्हेनिस हे त्या गाडीचे अखेरचे स्टेशन होते. त्यामुळे रेल्वेचे दोन नोकर 'ऑल आऊट' असे इंग्रजीतून आणि त्याच अर्थी इटालियन व फ्रेंचमधून ओरडत डब्या-डब्यांतून फिरत होते. त्या अमेरिकन म्हाताऱ्यांजवळ चिकार सामान होते. व्हेनिसला बिऱ्हाड बदलायच्या इराद्यानं आल्यासारखे, त्यामुळं त्यांनी दोन पोर्टर्स बोलावले. मी त्या स्त्रियांचे औपचारिक आभार मानून माझी छोटी बॅग घेऊन निघालो. स्टेशनच्या बाहेर येऊन पाहतो तर रस्ता नव्हताच ! होता तो एक प्रचंड कालवा, एखाद्या विस्तीर्ण नदीसारखा. हाच तो ग्रँड कॅनॉल. त्यात अनेक पॉटर टॅक्सी म्हणजे लहान मोटर लाँचीस आणि मोठ्या यांत्रिक नावा उभ्या होत्या. 'व्हेनिझिया-व्हेनिझिया, पियाझा-पियाझा' असा त्यांचा पुकार चालला होता. टॅक्सीपेक्षा बस स्वस्त पडणार हे सांगायला काही अर्थतज्ज्ञ लागत नाही. मी अडीचशे लिरांचे बोटीचे तिकीट काढले. दोनएकशे प्रवासी पोटात घेऊन आमची नाव जोरात निघाली.

ते वातावरण अतिशय प्रसन्न होते. विशाल कालव्यावर अनेक उत्साही प्रवासी वेगाने जा-ये करत होते. हायवेवर वाहनांची वाहतूक चालावी तशी त्या जलमार्गावर नावांची धावपळ चालली होती. अनेक प्रकारच्या नावा कालव्यातून चालल्या होत्या. हवेत गारवा होता, वाऱ्यात उत्साह होता, मनात संगीत होते आणि सभोवार पसरलेल्या पाण्यात तारुण्य होते. रोमला भेटलेला एक इटालियन लेखक मला म्हणाला होता ते खरेच होते. 'व्हेनिस हे जगातलं एकच असं शहर आहे, की त्याचं वर्णन करता येत नाही. तिथं प्रत्यक्षात गेलं पाहिजे. तिथली हवा खाल्ली पाहिजे. तिथं राहिलं पाहिजे. तरच तुम्हांला व्हेनिस म्हणजे काय ते समजेल.'

कारण हे पाण्यातले असे जगातले एकमेव अद्‌भुत शहर आहे. ज्या शहरात एकही मोटार नाही. वाहतूक नियंत्रण करणारा पोलीस नाही. ट्रॅफिक लाईट्स नाहीत आणि रस्त्यावर धक्काबुक्की नाही असे हे जगातले एकमेव शहर, कारण याला खऱ्या अर्थाने रस्तेच नाहीत. आहेत ते कालवे-फक्त कालवे आणि त्यांना जोडणारे पूल. आईच्या गळ्यात मुलाने हात टाकावा तसे हे पूल. लाडिक, प्रेमळ. हा गाव म्हणजे रूढ अर्थाने शहर नव्हेच, तर अनेक छोट्या बेटांचा हा पुंजकाच आहे. निळ्या मखमली सागरावर टाकलेल्या हिऱ्यामाणकांच्या ढिगासारखा हा लांबून दिसतो. मधूनच चर्च किंवा जुना राजवाडा यांची टोके आभाळात घुसतात. ग्रँड कॅनॉलच्या किनाऱ्यावर खुर्च्या टाकलेल्या. चार खुर्च्यांच्या मध्ये टेबल आणि त्यावर रंगीबेरंगी प्रचंड छत्री. या खुर्च्यांवर बसून कॉफी घेत समोरून सरकणाऱ्या विविध आकारांच्या आणि अनंत प्रकारांचे उतारू वाहून नेणाऱ्या नावांची ये जा पाहत बसायचे. तीच गंमत या नावांतून प्रवास करणाऱ्यांनाही पाहायला मिळते. डेकवर येऊन किनाऱ्यावरच्या निरुद्योगी संथ, शांत, चित्रविचित्र प्रवाशांच्याकडे पाहत पुढेपुढे सरकायचे. हे शहर निरुद्योग्यांसाठीच आहे यात शंका नाही, कारण इथे येणाऱ्या प्रवाशांना कसलीही घाई गर्दी नसते. न्यूयॉर्क, मुंबई, हाँगकाँग अशा शहरांतल्या धावपळीपासून हे निवांत शहर सर्वस्वी अलिप्त आहे.

व्हेनिसचे रस्ते म्हणजे पाणरस्ते असतात याची कल्पना नसलेला एक मुनीम एकदा लंडनहून व्हेनिसला विमानाने आला. रस्त्यावर सगळीकडे पाणीच पाणी झालेले पाहून त्याने आपल्या मालकाला तार केली, ''व्हेनिसमध्ये पूर आला आहे. सगळे रस्ते पाण्यानं तुडुंब आहेत. परत येऊ की पूर ओसरेपर्यंत वाट पाहू ते कळवा !''

व्हेनिस म्हणजे अफाट जलदर्शन ! व्हेनिस म्हणजे केवळ कालव्यांचेच नव्हे तर कालव्यातही तरंगणारे शहर ! एक प्रचंड उत्साह आणि उत्सव ! दोन दिवसांच्या निवांत मुक्कामानंतर हे गोड, कलासक्त आणि निळ्या पाण्यावर तरंगणारे शहर सोडताना मनाला खूपच हुरहुर वाटली.

❖❖❖

## स्वाध्याय

**प्र. १. टिपा लिहा.**

(१) ग्रँड कॅनॉल (२) व्हेनिसच्या स्टेशन बाहेरचा परिसर

**प्र. २. खालील मुद्द्यांच्या आधारे व्हेनिसचे वर्णन लिहा.**

(अ) व्हेनिस म्हणजे अफाट जलदर्शन.

(आ) व्हेनिस म्हणजे अवर्णनीय शहर.

**प्र. ३. खालील संकल्पना स्पष्ट करा.**

(अ) व्हेनिस म्हणजे हिऱ्या-माणकांच्या ढिगासारखा बेटांचा पुंजका..............

(आ) व्हेनिस म्हणजे अद्‌भुत शहर ..............

**प्र. ४. 'व्हेनिस हे पाण्यातले जगातले एकमेव शहर आहे', पाठाच्या आधारे या विधानाची सत्यता पटवून द्या.**

**प्र. ५. तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका स्थळाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.**

## भाषाभ्यास

### विरामचिन्हे

**✻ खालील वाक्ये वाचा व अभ्यासा.**

(१) आवडले का तुला हे पुस्तक

(२) हो जेवणानंतर मी सर्व गोष्टी वाचणार आहे जया म्हणाली

(३) वडील म्हणाले ज्ञानेश्वरी कुणी लिहिली तुला ठाऊक आहे का

वरील संवाद वाचताना वाक्य कुठे संपते, प्रश्न आहे की उद्‌गार आहे, हे काहीच कळत नाही कारण या वाक्यात विरामचिन्हे नाहीत. बोलताना काही विधाने करताना, प्रश्न विचारताना, आश्चर्य, हर्ष, क्रोध आदी भावना व्यक्त करताना माणूस त्या त्या ठिकाणी कमी अधिक वेळ थांबतो, म्हणून तोच आशय लिहून दाखवताना वाचकालाही कळावा, यासाठी विरामचिन्हांचा वापर केला जातो.

**✻ वरील वाक्यातील चिन्हे आणि त्यांची नावे यांचा तक्ता तयार करा.**

| विरामचिन्हे | नावे |
|---|---|
| | |
| | |
| | |

# १३. तिफन

**विठ्ठल वाघ** (१९४५) : सुप्रसिद्‌ध कवी व लेखक. ‘काळ्या मातीत मातीत’, ‘पंढरीच्या वाटेवर’, ‘कपाशीची चंद्रफुले’, ‘पाऊसपाणी’ हे कवितासंग्रह; ‘अंधारयात्रा’ हे नाटक; ‘डेबू’ ही कादंबरी; ‘वऱ्हाड बोली आणि इतिहास’, ‘वऱ्हाडी म्हणी’ इत्यादी पुस्तके प्रसिद्‌ध.

पेरणी, बैलांविषयीचे प्रेम, पावसाच्या दिवसांतील मातीचा सुगंध, शेतकऱ्यांचे स्वप्न, पावसाच्या आगमनाने शेतकऱ्यांची होणारी शेतीकामांची लगबग, याचे वर्णन कवीने प्रस्तुत कवितेतून केले आहे.

काया मातीत मातीत तिफन चालते तिफन चालते
ईज नाचते थयथय ढग ढोल वाजवते
नंदी बैलाच्या जोळीले सदाशीव हकालते
वटी बांधून पोटाले पाराबती उनारते
वटी पोटाले बांधते झोयी काटीले टांगते
झोयी काटीले टांगते त्यात तानुलं लळते
त्यात तानुलं लळते ढग बरसते
काकरात बिजवाई जसं हासरं चांदनं
धरतीच्या आंगोपांगी लाळानौसाचं गोंदनं
सरीवरी सरी येती माती न्हातीधुती होते
तिचा कस्तुरीचा वास भूल जीवाले पाळते
भूल जीवाले पाळते वाट सांजीले पाहेते
मैना वाटुली पाहेते राघू तिफन हानते
राघू तिफन हानते ढग बरसते
वला टाकती तिफन शितू वखर पाहेते
पानी भिजलं ढेकूल लोनी पायाले वाटते
काया ढेकलात डोया हिर्व सपन पाहेते
डोया सपन पाहेते काटा पायात रुतते
काटा पायात रुतते लाल रगत सांडते हिर्व सपन फुलते
हिर्व सपन फुलते ढग बरसते



## स्वाध्याय

**प्र. १. खालील अर्थाच्या शब्दसमूहाला कवितेतील योग्य शब्द दया.**

(१) पेरणीसाठी लागणारे बियाणे ____

(२) शेतकरी पेरणीसाठी वापरतो ते अवजार ____

(३) पाराबती करते त्या दोन कृती ____ , ____

**प्र. २. खालील ओळींतील अधोरेखित संकल्पना स्पष्ट करा.**

(१) काकरात बिजवाई जस <u>हासरं चांदनं</u>  (२) काया ढेकलात डोया <u>हिर्व सपन</u> पाहेते

**प्र. ३. या कवितेत आलेले वऱ्हाडी बोलीतील शब्द शोधा व त्यांना प्रमाणभाषेतील शब्द लिहा.**

| वऱ्हाडी शब्द | प्रमाणभाषेतील शब्द |
|---|---|
| | |

**प्र. ४. कवितेच्या आधारे खालील तक्ता पूर्ण करा.**

| कवितेचा विषय | कवितेतील पात्र | कवितेतील तुम्हांला सर्वांत आवडलेले प्रतिक | कवितेतील नैसर्गिक घटना |
|---|---|---|---|
| | | | |

**प्र. ५. अभिव्यक्ती.**

(१) 'काटा पायात रुतते लाल रगत सांडते हिर्व सपन फुलते', या ओळीचा संदर्भ स्पष्ट करा.

GTYDJR

## भाषाभ्यास

**✻ खालील वाक्ये वाचा.**

(१) मी शाळा जातो.  (२) मी शाळेत जातो.

ही दोन वाक्ये तुम्ही वाचलीत. यांपैकी पहिले वाक्य चुकीचे आहे आणि दुसरे वाक्य बरोबर आहे. या दोन्ही वाक्यांमध्ये काय फरक आहे? पहिल्या वाक्यात 'शाळा' हा शब्द आहे. दुसऱ्या वाक्यात 'शाळा' या शब्दाला '-त' हा प्रत्यय लागला आहे.

**✻ खालील वाक्ये वाचा.**

(१) राम मित्राशी बोलतो. (२) रेश्मा पालीला घाबरते. (३) कल्पना दुकानात जाते.

या वाक्यांमध्ये, मित्र, पाल, दुकान या नामांना अनुक्रमे -शी, -ला, -त हे प्रत्यय जोडलेले आहेत. प्रत्यय लागण्यापूर्वी या शब्दांमध्ये काही बदल झाले आहेत. उदा., मित्र~मित्रा-, पाल~पाली-, दुकान~दुकाना-. शब्दाला प्रत्यय लागण्यापूर्वी होणाऱ्या या बदलाला शब्दाचे **सामान्यरूप** म्हणतात. शब्दाच्या मूळ रूपाला **सरळरूप** म्हणतात. उदा., 'दुकान' हे सरळरूप आणि दुकाना- हे सामान्यरूप.

नामांना किंवा सर्वनामांना लागणारे प्रत्यय अनेक प्रकारचे असतात. -ला, -त, -ने, -शी, -चा, -ची, -चे इत्यादी. नामांना व सर्वनामांना प्रत्ययांबरोबरच शब्दयोगी अव्यये जोडली जातात. तेव्हासुद्धा सामान्यरूप होते.


# १४. ते जीवनदायी झाड

**भारत सासणे** (१९५१) : प्रसिद्ध लेखक, कथाकार, नाटककार, कादंबरीकार. 'अनर्थ', 'लाल फुलांचे झाड', 'रात्र', 'चिरदाह' हे कथासंग्रह : 'सर्प', 'दूर तेथे दूर तेव्हा' या लघुकादंबऱ्या प्रसिद्ध.

फलदायी व जीवनदायी लिंबाचे झाड आणि मानवी जीवन यांची सुंदर सांगड घालण्याचा यशस्वी प्रयत्न प्रस्तुत पाठात लेखकांनी केला आहे.

मी राहत होतो त्या घराच्या मागं एक लिंबाचं झाड होतं. लिंब म्हणजे कडूलिंब नव्हे. आपण खातो त्या लिंबाचं झाड. खिडकीलगतच होतं ते काटेरी आणि लिंबाच्या फळांनी गच्च लगडलेलं असं. लसलशीत हिरवंगार आणि चैतन्यमय. प्रदेश सगळा उन्हाचा होता. त्या भागात एकूणच उन्हाळा जास्त, आसमंत तापून जाई. आसपासची जमीन तापून करपून तपकिरी पडलेली दिसे. जी काही झाडं आसपास होती ती मलूल आणि काळपट हिरवी दिसत आणि पाणथळ तर परिसरात कुठंच नव्हती. सगळीकडं शुष्क कोरडी जमीन. घरसुद्‌धा तापून निघे.या सगळ्या पार्श्वभूमीवर ते झाड म्हणजे विलक्षण जीवनमय आणि जीवनदायी वाटे.

खरं तर भिंतीच्या उंचीचे झालेलं लिंबाचे झाड म्हणजे भोवतालच्या सजीवांच्या दिलाशाचं केंद्र झालं होतं, हे माझ्या लक्षात आलं. त्या झाडाखाली 'काळीभोर सावली' असे. मोरीचं पाणी सगळं त्या झाडाला जाई. त्यामुळं जमिनीत नेमकी तिथंच ओल असे . त्या ओलसर जमिनीत मला काही शंख दिसू लागले. आज इथं दिसलेला शंख उद्या तिथं दिसे. रात्रीतून तो बराच सरकलेला असे. लहान-मोठे अनेक शंख मग दिसून येऊ लागले. मग लक्षात आलं, की या झाडाखाली गोगलगाईची वस्ती आहे. इतक्या मोठ्या आकाराच्या गोगलगाईची वस्ती मी प्रथमच पाहत होतो आणि प्रथमच मी असंही पाहिलं, की त्या गोगलगाई शंख पाठीवर घेऊन तर चालताताच; परंतु त्या झाडांवरही चढतात. फांदीवर चिकट रंगानं बरबटलेल्या गोगलगाई पाहणं, त्यांचा प्रवास निरखणं हा माझा आणि लहान मुलांचा कौतुकाचा कार्यक्रम होऊन बसला होता.



लवकरच एक पारव्याची जोडी त्या गर्द हिरव्या आश्चर्यात दिलासा शोधू लागली. त्या जोडीनं काड्याकाड्यांचं एक घरटं त्या लिंबाच्या काटेरी झाडात बांधायला सुरुवात केली. खिडकीतून किंवा दारातून हळूच पाहिलं, की गुंजांच्या डोळ्यांची, लुकलुकत्या नजरेची पारवी दृष्टीस पडे. भोवतालच्या रखरखीतून त्या जोडीनं एक थंड असा आश्रय शोधून काढला होता. माझा मुलगा तिथं वारंवार जाऊन पाही म्हणून मग ते जोडपं हळूहळू दिसेनासं झालं.

चिमण्या आणि इतर पक्षी यांनी ते झाड नेहमी गजबजलेलं असे. जणू गातं बहरतं संगीतमय झाड! तुरेदार बुलबुल आणि पोपट नेहमी तिथं दिसत. त्या सगळ्यांचं ते झाड म्हणजे एक केंद्र, एक आकर्षण, एक आश्वासनाचं, विश्वासाचं ठिकाण झालं होतं. कलकलाट आणि गजबजाट. त्या झाडानं जणू अनेक पक्ष्यांना जगण्यासाठी नवं आश्वासक निमंत्रण दिलं होतं. ते आश्वासन कंठोकंठी दूरपर्यंत पोचून भोवतालच्या तप्त वातावरणातून अनेक पक्षी त्या एकमेव थंड झाडाकडं थव्याथव्यानं येत असल्याचं माझ्या लक्षात आलं.

झाडाखाली मुंग्याचंही एक वेगळंच विश्व होतं. अनेकरंगी किडेसुद्धा त्या दलदलीत होते. एकदा पाहत असताना सापाची कात आढळून आली. झाडांवर खारीची वस्ती तर होतीच; पण थंड सावलीत कुत्रीही तिथं विसाव्याला येत. फुलांपासून ते फळांपर्यंतचा सगळा जीवनप्रवास त्या झाडाचा मला पाहायला मिळाला नाही; परंतु शेवटच्या बहरात फुलं लागलेली पाहिली. ही फुलं चिमुकली, मंद गोड वासाची आणि अद्‌भुत फळदार आश्वासन घेऊन आलेली असत. फुलांमुळं लवकरच त्या झाडाभोवती पंखधारी चिमुकल्या पऱ्या उडू लागल्या. फुलपाखरं आणि रंगीत उडते कीटक. फुलचुखे चिमुकले पक्षी आणि भुंगे. एका छोट्या फांदीवर मधमाश्यांचं पोळंही रचलं जाऊ लागलं. तेव्हा मात्र खिडकी लावून घ्यावी असं वाटू लागलं;पण त्या माश्यांनी कधी कुणाला दंश केला नाही.

'सजीवांसाठी जीवनदायी केंद्र' अशी त्या लिंबाच्या झाडाची व्याख्या झाल्याचं माझ्या लक्षात आलं; पण इतकंच नव्हे तर, माणसंही त्या झाडाकडं आकर्षित होत होती.

ज्या कुण्या दाक्षिणात्य स्त्रीनं हे लिंबाचे झाड राहत्या घराच्या मागं केवळ भाडेकरू असताना लावलं होतं, तिनं त्या झाडाला कुंपण घातलं नव्हतं. मुक्त-मोकळं झाड, तिनं जणू कद्रूपणाच्या आणि कंजुषीच्या मर्यादा घातलेल्या नव्हत्या. आसपासचे लोक येत, लिंबाची फळं मुक्तपणे घेऊन जात. फळं कधी कमी पडली नाहीत, फळांनी लगडलेलं ते झाड दृष्ट लागण्यासारखं, समृद्धीची भावना जागवणारं आणि जीवनदायी होतं... सगळ्यांसाठीच!

म्हणजे असं की, माणसं, पशु-पक्षी, कीटक, साप, कुत्री आणि खारी, गोगलगाई अशा सगळ्यांनाच ते आकर्षून घेत असे. भोवतालच्या काहिलीतलं विसाव्याचं आणि आनंदाचं जणू आशीर्वादमय आश्वासन आणि जगण्याचा दिलासा...

इतकं महत्त्व त्या झाडाला आलेलं पाहून मी चकित होऊन गेलो होतो. ज्या घराची हकीकत मी सांगतो आहे, ती एक जोडइमारत होती. ट्विन ब्लॉक. शेजारी जे राहत होते, त्यांच्या परसदारी चक्क पाण्याचा हापसा होता म्हणजे भरपूर पाणी होते. मात्र अंगणात आणि परसदारात गवताची काडीही नव्हती. माणसं उदास, दुर्मुखलेली, त्रस्त वाटत. त्या घरातली स्त्री नेहमी दागिने घालून बसे; परंतु पाणी आणि जमीन मुबलक असतानाही त्यांनी हिरवा आनंद पसरवण्याचा प्रयत्न कधी केला नाही. मला वाटतं झाड लावणं, ते जगवणं, त्याद्‌वारे दूरवर आनंदाचे आणि आश्वासनाचे संगीतमय संदेश पसरवण आणि सर्व सजीवांचे आशीर्वाद घेणं ही एक प्रवृत्तीच असावी लागते. जो माणूस एखादं झाड जगवतो, तो निसर्गात एक 'हिरवा चमत्कार' रुजवत असतो. हे लिंबाचं झाडच बघा ना! ज्या कुण्या बाईनं हे झाड लावलं होतं, ती बाई इथून निघून गेली होती; परंतु जाताना एक अद्‌भुत नाट्य ती आपल्यामागं ठेवून गेली. दरवर्षी, दर ऋतूत त्या झाडाच्या अनुषंगानं एक उत्सव साजरा होत असणारं, फुलं येत असणारं, घमघमाट दरवळत असणारं आणि मग एक आख्खा फलोत्सव... फळांचं लगडणं.. हे सगळं घडत असणार, मी तर केवळ एका ऋतूतला सजीवांच्या जागत्या नांदत्या अस्तित्वाचा साक्षीदार होतो; पण शेजारची ती माणसं? ती अनेक वर्षं त्या घरात राहत आलेली होती; परंतु न त्यांनी ते 'हिरवं कौतुक' पाहिलं, न त्यांनी झाडं लावली, न त्यांनी फुलं फुलवली. हा निसर्गातला आनंद त्यांच्या मनात कधी पोचल्याचं मी पाहिलंच नाही. म्हणूनच कदाचित ती माणसं त्यांच्या परस-अंगणासारखीच उदास, भकास, तपकिरी अशीच वाटत राहिली मनानं.

ते झाड लावणारी ती दाक्षिणात्य बाई एकदा तिच्या मुलासह आमच्या घरी आली होती. तिनं आल्याबरोबर प्रथम जाऊन ते झाड पाहिलं. तिचा तो हळवेपणा मला सृजनाशी संबंधित वाटला. मला वाटतं सृजनाशी, नवनिर्माणाशी, निर्मितीशी मन जोडलेलं असेल तर ते ताजं राहतं, झाडांना फुलवणं, रुजवणं, त्यांचा 'हिरवा संदेश' दूरवर पोहोचवणं यातून मन सृजनात्मक आणि आनंदी, निर्मितीक्षम होत असावं. एक मागं ठेवलेलं फळदार झाड किती जिवांना जगवतं, आनंद देत, जीवन देतं, आश्वासन आणि आशीर्वाद देतं हे पाहिलं की मन थक्क होतं. हे मर्म ज्यांनी जाणलं, ते मला वाटतं, आनंदी राहतात. जे नुसते भौतिक गोष्टीचा ध्यास घेतात, दागिने लेवून बसतात, त्यांच्या भोवताली कधी हिरवं झाड उगवत नाही आणि त्यांच्या मनात कधी पक्षी चिवचिवत नाहीत! आनंदापासून ते बिचारे वंचित राहत असावेत.

त्या जीवनदायी झाडानं आपल्या 'हिरव्या भाषेत' मला असं बरंच काही काही सांगितलं.

## स्वाध्याय

**प्र. १. कारणे लिहा.**

(१) लेखकाला लिंबाचे झाड जीवनदायी वाटले, कारण....

(२) पारव्याची जोडी लिंबाच्या झाडावर राहते, कारण ....

(३) लेखकाला खिडकी लावून घ्यावी असे वाटले, कारण....

**प्र. २. चौकट पूर्ण करा.**

पाठातील नाददर्शक शब्द

**प्र. ३. लिंबाच्या झाडाला खालील वैशिष्ट्ये कोणी कोणी प्राप्त करून दिली.**

(१) संगीतमय झाड-

(२) आश्रयदायी झाड-

(३) आश्वासक झाड-

(४) जीवनदायी झाड-

**प्र. ४. 'परसदार' या शब्दापासून चार अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

**प्र. ५. पाठात वर्णन आलेल्या दोन कुटुंबांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे तुलना करा.**

| | जोडइमारतीत राहणारी दोन कुटुंबे | |
|---|---|---|
| मुद्दा | कुटुंब क्र.१ | कुटुंब क्र.२ |
| परसदार | | |
| माणसे | | |
| स्त्रिया | | |
| पाणी जमीन | | |
| हिरवा आनंद | | |

**प्र. ६. चूक की बरोबर ते लिहा.**

(१) परसदारी पाण्याचा हापसा असलेल्या शेजाऱ्यांची बाग फुललेली होती.

(२) इतर पक्ष्यांच्या त्रासामुळे पारव्याची जोडी लिंबाच्या झाडावरून हलली.

(३) लिंबाचं झाड लावणारी स्त्री अत्यंत हळवी होती.

(४) लिंबाच्या झाडावरील मधमाश्या कधी कुणाला चावल्या नाहीत.

H6CL2U

**प्र. ७. स्वमत.**

(१) वृक्ष व मानवी जीवन यांच्यातील परस्परसंबंधांविषयी तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.

(२) झाड सजीवांसाठी जीवनदायी केंद्र कसे बनू शकते, हे विधान पटवून द्या.

**प्र. ८. अभिव्यक्ती.**

लेखकाच्या मुलाने पारव्यांच्या जोडीचा आश्रय - त्यांचे घरटे वारंवार पाहिल्यामुळे पारव्याचे जोडपे हळूहळू दिसेनासे झाले. ही घटना तुम्हाला काय सांगते, ते स्पष्ट करा.

# १५. माझे शिक्षक व संस्कार

**शंकरराव खरात** (१९२१-२००१) : कथाकार, कादंबरीकार, लेखक. दलित चळवळीत सक्रिय सहभाग. 'तडीपार', 'सांगावा', 'आडगावचे पाणी' इत्यादी कथासंग्रह 'झोपडपट्टी', 'फूटपाथ नं.१', 'माझं नाव'. इत्यादी कादंबऱ्या; 'तराळ-अंतराळ' हे आत्मचरित्र प्रसिद्ध.

विद्यार्थिदशेत शिक्षकांकडून केल्या जाणाऱ्या संस्कारांचे महत्त्व, प्रस्तुत पाठातून लेखकांनी व्यक्त केले आहे.

मी माझी गावची शाळा सोडणार होतो. पुढील शिक्षणासाठी औंध (जि. सातारा) येथील हायस्कूलमध्ये जाण्याचा विचार करत होतो. तसे माझे प्रयत्नही चालू होते. त्यात यश मिळणार याची मला खात्री होती. म्हणूनच मी माझ्या शाळेतील एका शिक्षकाची भेट घेत होतो. त्यांचा सल्ला, मार्गदर्शन मला मिळत होते. श्री. हणमंतराव देशमुख हे गावचेच रहिवासी. त्यांनी मला इंग्रजी तर्खडकरांचे भाषांतर शिकवले. ते तसे स्काउटमास्तरही होते. त्यांनी शाळेचे स्काउटपथक पक्क्या पायावर उभे केले होते. श्री. कात्रेमास्तरांनी मला चौथीच्या वर्गात गणित शिकवले. अंकगणितासारखा अवघड विषय त्यांनी सोप्पा करून शिकवला. आमचे कात्रे मास्तर अंगाने सडपातळ, दम्याच्या विकाराने त्यांना कधी-कधी त्रास व्हायचा. कात्रे मास्तरांच्या घरी माझे वडील लाकडं फोडायला जायचे.

श्री. गोळीवडेकर मास्तर मला मराठी पाचवीत होते. ते इतिहास भूगोल शिकवायचे. त्यात इंग्रजी पहिलीत तर्खडकरांचे पहिले भाषांतर शिकवायचे. श्री. गोळीवडेकर खरे शेतीतज्ज्ञ शिक्षक. शाळेच्या बागा करण्यातच त्यांचं अर्ध लक्ष असे. त्यात त्यांचा व माझा जवळचा परिचय झाला. त्याचं कारण शाळेच्या 'बागा' आमच्यासारख्या मुलांच्या जिवावरच तर उभ्या होत. आम्ही मुलं वयानं तसंच हाडा-पिंडाने मोठाड. कष्टाच्या कामाला कणखर. शाळेची गावच्या ओढ्याकाठची बाग ही खरे तर आम्हां मुलांच्या जिवावर चांगली फुललेली, उभी असे. या बागेतल्या विहिरीचं पाणी दोन-दोन तास राहाटेने ओढून, बागेतल्या फुलझाडांना, फळझाडांना आम्ही देत असू. तेव्हा ती फुलझाडं-फळझाडं तरारून उभी राहात होती. त्यामुळे श्री. गोळीवडेकर मास्तर आमच्यावर प्रेम करायचे. बागेतील जमीन कुदळी, टिकावाने खांदावयाची, त्याचे वाफे करायचे, बंध घालायचे अशी सगळी कष्टाची कामे आम्ही मुलं करत असू.

हेडमास्तर श्री. नाईक मास्तर यांचा शाळेत दरारा असे. तसे ते शिस्तीचे कडे भोक्ते. या शिस्तप्रिय हेडमास्तरांनी माझ्या शाळेला चांगलीच शिस्त लावली. शाळेची दुसरी घंटा होताच ते हातात छडी घेऊन शाळेच्या दारात थांबत. अशा शिस्तीत मग कोण उशीरा येईल! असा त्यांचा दरारा.

श्री. नाईक हे मला इंग्रजी चौथीत इंग्रजी आणि इतिहास शिकवत. त्यात इंग्रजीचे 'रेन-मार्टिन'चे ग्रामर ते आवडीने शिकवत. ते सदानकदा विद्यार्थ्यांना समुपदेश करत. श्री. रायगावकर मास्तरांसारखे ते कधीही इतर सार्वजनिक कार्यात पडत नसत. आपण बरं अन् आपली शाळा बरी, हेच त्यांचं कार्य. त्यामुळे त्यांनी शाळेला शिस्त आणली आणि परीक्षेच्या निकालाच्या दृष्टीने त्यांनी शाळेची चांगली प्रगती केली.

औंधला शिकायला जाणार म्हणून मी श्री. नाईक मास्तरांना भेटलो. त्यांनी मला योग्य असं मार्गदर्शन केलं. शाळेत असतानाही त्यांचं माझ्यावर लक्ष होतं. शिस्तीच्या दृष्टीने कसं वागावे, जीवनात आपली प्रगती कशी करून घ्यावी, याबाबतीत त्यांनी केलेला हितोपदेश मी कधीच विसरू शकत नाही.

श्री. रायगावकर, देशपांडे या शिक्षकांनी तर मला संस्कारदृष्ट्या फारच उपकृत करून ठेवले आहे. कसे ते एक-दोन प्रसंग येथे उद्धृत करून स्पष्ट करतो.

कुस्तीसारख्या खेळातसुद्‌धा जातपात मानली जात असे. आमच्या गावातही आम्हां मुलांसाठी वेगळी तालीम होती. लहानपणी मी बऱ्यापैकी कुस्त्या करत असे. हंगामात कुस्त्या करून मी कधी खोबरे, तर कधी नारळ, तर कधी एखादया रुपयापर्यंत इनामे मिळवली आहेत. एक पटकासुद्‌धा एकदा मिळाल्याचे आठवते.

असाच बाहेरगावी मी कुस्त्यांचा फड पाहायला गेलो होतो. तेथे एका थोराड मुलाला, 'याला जोड, याला जोड' म्हणून फडात फिरवत होतो. दोन राउंड मारूनही त्याला कुणी जोड उभा राहिला नाही. तेव्हा आमच्यातला एक म्हणाला, 'शंकऱ्या उठतोस का? धरतोस का कुस्ती त्या गड्याबरोबर?'

मी 'हा हा' म्हणत मैदानात गेलो आणि लढत करण्याची तयारी दर्शवली; पण मला कुणीतरी ओळखले आणि हटकले.

मी हिरमुसला होऊन माघारी गेलो. हा प्रसंग माझ्या मनाला लागला हे ओळखून रायगावकरांनी माझी समजूत घातली. म्हणाले, 'अरे, समाज अजून निद्रिस्त आहे. खेळात-मैदानात जात न पाहता कौशल्य पाहावे, हे अजून त्याला नीट समजले नाही. पण एक दिवस असा येईल, की हे सारे नष्ट होईल. तुम्हांलाही खेळात-स्पर्धेत मानाने बोलवले जाईल.'

असाच एक दुसरा प्रसंग...

शिमग्याच्या धुळवडीला आमच्या वस्तीतील प्रौढ वर्गात तमाशाचा फड उभा राहिला. त्या दिवशी प्रौढ साक्षरतेचा वर्ग बंद होता; पण रायगावकर मास्तरांना याची कल्पना नसल्याने ते नेहमीप्रमाणे वर्गाला भेट दयायला आले. प्रौढ वर्गाच्या कंदिलाच्या प्रकाशात तमाशा चालला होता, ते पाहून रायगावकर चटकन परत फिरले. त्यांना पाहताच मी त्यांना आडवा गेलो. माझी मान खाली झाली होती, ते पाहून मास्तर म्हणाले, ''अरे! आज धूलिवंदन! हे चालायचेच!'' अन् मास्तर तसेच वाटेला गेले.

मग मास्तर मला दुसऱ्या दिवशी बोलले, ''शंकर! तू हे ध्यानात ठेव. जिथं प्रौढ साक्षरतेचा वर्ग चालतो, तुम्ही अभ्यास करता त्या विदयेच्या मंदिरात तमाशा कसा उभा...?''

सरांनी मला केलेला हा उपदेश मी कधीच विसरू शकत नव्हतो.

❖❖❖

## स्वाध्याय

**प्र. १. खालील वाक्यांचा संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा.**

(अ) शाळेच्या 'बागा' लेखकांसारख्या मुलांच्या जिवावर उभ्या होत्या.
(आ) लेखक सातारा जिल्ह्यातील औंधला जायच्या विचारात होते.

**प्र. २. जोड्या जुळवा.**

| शिक्षक | गुणवैशिष्ट्य |
|---|---|
| (१) श्री. नाईक | (अ) स्काउटगाईड अध्यापनतज्ज्ञ |
| (२) श्री. देशमुख | (आ) गणित अध्यापनतज्ज्ञ |
| (३) श्री. गोळीवडेकर | (इ) समुपदेशक आणि शिस्तप्रिय |
| (४) श्री. कात्रे | (इ) शेतीतज्ज्ञ |

**प्र. ३. चौकटी पूर्ण करा.**

पाठावरून तुम्हांला जाणवलेली लेखकाची स्वभाववैशिष्ट्ये लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

**प्र. ४. खालील परिणाम ज्या घटनेचे आहेत त्या घटना लिहा.**

(अ) परिणाम- हिरमुसले होऊन लेखक कुस्तीच्या मैदानातून माघारी फिरले.
घटना-

(आ) परिणाम- लेखकाची मान खाली गेली होती.
घटना-

**प्र. ५. समर्पक उदाहरण लिहा.**

(अ) खेळातसुद्धा जातपात मानली जात असे

(आ) लेखकांनी आणि त्यांच्या मित्रांनी केलेलं कष्टाचे काम

**प्र. ६. आकृतिबंध पूर्ण करा.**

हिरमुसलेल्या लेखकाची समजूत घालताना रायगावकर सरांनी व्यक्त केलेले सकारात्मक विचार

↓ ↓ ↓ ↓

**प्र. ७. चौकटीतील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा.**

दरारा असणे. →

हिरमुसले होणे. →

**प्र. ८. स्वमत.**

(१) 'विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शिक्षकांची भूमिका महत्त्वाची आहे', या विधानाबाबत तुमचे मत सोदाहरण स्पष्ट करा.

(२) शिक्षक व विद्यार्थी यांच्यातील नातेसंबंधाविषयी तुमच्या संकल्पना स्पष्ट करा.

**उपक्रम :**

तुमचे प्राथमिक शाळेतील शिक्षक आठवा व त्यांतील अविस्मरणीय शिक्षकांशी संबंधित असलेल्या तुमच्या आठवणी लिहा.

## भाषाभ्यास

*** अधोरेखित शब्दांविषयी खालील माहिती भरून तक्ता पूर्ण करा.**

| वाक्ये | सरळरूप | सामान्यरूप | प्रत्यय |
|---|---|---|---|
| (१) रमेशचा भाऊ शाळेत गेला. | (१)<br>(२) | | |
| (२) बँकेने शेतकऱ्याला कर्ज दिले. | (१)<br>(२) | | |
| (३) सुट्टीत तो मित्रांशी खेळतो. | (१)<br>(२) | | |
| (४) मंडईत फळांच्या गाड्या आहेत. | (१)<br>(२) | | |

# १६. शब्दांचा खेळ

**हेलन केलर** (१८८०-१९६८): विसाव्या शतकावर आपल्या अलौकिक कार्याने आणि व्यक्तिमत्त्वामुळे ज्या लोकोत्तर व्यक्तींचा प्रभाव पडला, त्यामध्ये हेलन केलर यांचे नाव अग्रगण्य आहे. अंधत्व, मुकेपणा आणि बधिरत्व अशा तिहेरी अपंगत्वाशी सामना देत त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. अंधारातून प्रकाशाकडे नेणाऱ्या शिक्षणपर्वाचे थक्क करणरे अनुभव त्यांनी 'The story of my life' या आत्मकथनात मांडले आहेत. त्याचा मराठी अनुवाद श्री. माधव कर्वे यांनी 'माझी जीवनकहाणी' या पुस्तकरूपाने केला आहे.

प्रस्तुत उतारा 'माझी जीवनकहाणी' हेलन केलर (अनुवाद - माधव कर्वे) या पुस्तकातून घेतला आहे. अपंगत्वामुळे भाषा शिक्षणात येणारे अडथळे व हे अडथळे दूर करण्यासाठी त्यांनी व त्यांच्या शिक्षिकेने केलेले प्रयत्न, याचे वर्णन प्रस्तुत पाठात केले आहे.

माझ्या आठवणीतला, आयुष्यातला सगळ्यात महत्त्वाचा दिवस म्हणजे माझ्या बाई-ॲनी मॅन्सफिल्ड सुलिव्हॅन-मला शिकवायला आल्या तो दिवस. दोन अगदी परस्परविरोधी आयुष्यं कशी एकत्र येतात, याचं मला नवल वाटतं. ३ मार्च १८८७. मला आठवं वर्षं लागायला तीन महिने बाकी होते. त्या दिवशी दुपारी मी पोर्चमध्ये उभी होते-शांत, कशाच्या तरी अपेक्षेत. आईच्या खाणाखुणा आणि घरातल्या लगबगीवरून आज काहीतरी वेगळं घडणार ह्याचा मला साधारण अंदाज आला, म्हणून मी दारापाशी जाऊन पायऱ्यांवर वाट पाहत राहिले. अचानक पोर्च झाकून टाकणाऱ्या हनीसकल् वेलीच्या जाळ्यामधून ऊन वाट काढत आलं आणि माझ्या उंचावलेल्या चेहऱ्यावर पसरलं. नकळतच माझी बोटं बाजूच्या सवयीच्या पानांवरून आणि वसंत ऋतूचं स्वागत करायलाच उमलाव्यात तशा कळ्यांवरून फिरली. भविष्यात माझ्यासाठी काय चमत्कार लिहून ठेवलाय, याची काही मला कल्पना नव्हती.

त्याआधी काही आठवडे रागानं आणि कडवटपणानं मन इतकं व्यग्र झालं होतं, की त्या स्वत:शीच चाललेल्या सततच्या झगड्यानं मी अगदी थकून गेले होते. दाट धुकं असताना तुम्ही कधी समुद्रावर गेलायत? अशा वेळी वाटतं, सहज स्पर्श करता येईल अशा पांढऱ्या अंधारानं आपल्याला वेढलंय आणि तशा धुक्यातून जहाज वाट काढत किनाऱ्याच्या दिशेनं येत असतं. किनारा गाठेपर्यंत ताण असतो. छाती धडधडत असते. वाटतं, आता काय होणार? शिक्षणाला सुरूवात होण्याआधी माझी अवस्था त्या धुक्यात सापडलेल्या जहाजासारखी होती. फरक इतकाच, की माझ्याकडं होकायंत्र वगैरे काहीच नव्हतं आणि बंदर किती जवळ आलंय, तेही कळायला काही मार्ग नव्हता. 'प्रकाश! प्रकाश हवाय मला!' असं माझ्या आत्म्याचं नि:शब्द आक्रंदन चालायचं. नेमक्या त्याच हव्याशा क्षणी प्रेमाच्या प्रकाशात मी न्हाऊन निघाले.

माझ्या जवळ कुणीतरी येतयसं मला जाणवलं. आईच आहे, असं समजून मी हात पुढे केला. तर दुसऱ्याच कोणीतरी माझा हात हातात घेतला आणि मला उचलून कडेवर घेतलं. ह्याच माझ्या बाई, ॲनी सुलिव्हॅन. त्या मला शिकवायला आल्या होत्या, त्याहीपेक्षा जास्त माझ्यावर मायेची पाखर घालायला! दुसऱ्या दिवशी सकाळीच बाई मला आपल्या खोलीत घेऊन गेल्या. त्यांनी मला एक बाहुली दिली. 'पर्किन्स इन्स्टिट्युशन' मधल्या अंध मुलांनी माझ्यासाठी ही भेट पाठवली होती. बाहुली लॉरा ब्रिजमननं सजवली होती. अर्थात हे सगळं मला कालांतरानं कळलं. थोडा वेळ मी या बाहुलीशी खेळल्यावर बाईंनी बोटांनी हळूच माझ्या हातावर अक्षरं जुळवली. 'd-o-l-l' हा बोटांचा खेळ मला फार आवडला. मीही बाईंप्रमाणं बोटं फिरवू लागले. शेवटी जेव्हा एकदा मी ती अक्षरं बरोबर काढली तेव्हा बालसुलभ आनंद आणि अभिमानानं फुलून आले. धावतच जिना उतरून मी आईपाशी गेले. तिच्यासमोर हात धरून त्यावर पुन्हा एकदा मघाचीच अक्षरं बोटांनी जुळवून लिहिली. मी एक शब्द जुळवत होते,

हे काही मला त्या वेळी माहीत नव्हतं. किंबहुना शब्द म्हणून काही असतं, हे तरी मला कुठं ठाऊक होतं? मी फक्त बोटांनी बाईंचं अनुकरण करत होते. नंतरच्या दिवसांत मी ह्याच पद्धतीनं पिन्, हॅट, कप असे कितीतरी शब्द आणि बसणं, उभं राहणं, चालणं अशी थोडी क्रियापदंही शिकले. बरेच दिवस बाईंबरोबर राहून राहून, प्रत्येक वस्तूला काहीतरी नाव असतं, हे माझ्या लक्षात आलं.

एक दिवस मी माझ्या नव्या बाहुलीशी खेळत असतानाच बाईंनी माझी जुनी, चिंध्या झालेली बाहुली माझ्या मांडीवर ठेवून पुन्हा हातावर लिहिलं, d-o-l-l. म्हणजे, दोन्ही बाहुल्यांना शब्द एकच! त्या आधी 'm-u-g' आणि 'w-a-t-e-r' म्हणजे 'वॉटर'. तर मी हट्टानं म्हणायची, (म्हणजे खाणाखुणा करतच) ''नाही!'' माझा हा गोंधळ बघून त्यांचा हिरमोड झाला आणि त्यांनी तो विषय तेवढ्यावरच ठेवला. पुन्हा कधीतरी तानमान बघून हे शब्द शिकवावेत, असं त्यांनी ठरवलं असावं. आता पुन्हा बाहुलीवरून त्यांचं शिकवणं सुरू झालं होतं. त्यांचं ते पुन्हा पुन्हा सांगणं सहन न होऊन मी माझी नवी बाहुली हिसकावून जमिनीवर आपटली. त्या बाहुलीचे तुकडे होऊन माझ्या पायांशी पडलेले मला जाणवल्यावर मला उकळ्या फुटू लागल्या. वाटलं, बरं झालं, एकदाची पीडा गेली. एवढा थयथयाट करूनही ना खंत ना खेद असाच माझा आविर्भाव होता. ती बाहुली माझी नावडती होती ना! माझ्या निश्चल, अंधाऱ्या जगात हळव्या, हळुवार भावना कुठून उगवणार? बाईंनी मात्र बाहुलीचे ते तुकडे झाडून शेकोटीजवळच एका बाजूला लोटले. माझी डोकेदुखी गेल्यानं मलाही हायसं वाटलं. बाईंनी माझी हॅट माझ्या हातात ठेवल्यावर मी ओळखलं, आता बाहेर, छान उबदार उन्हात जायचंय. ह्या विचारानं मी पुन्हा आनंदानं टुणटुण उड्या मारू लागले. पाऊलवाटेनं जात आम्ही विहिरीपाशी आलो. इथंही हनीसकल् वेलीच्या जाळ्या होत्या. त्यांच्या फुलांचा सुगंध दरवळत होता. कोणीतरी विहिरीतून पाणी काढत होतं. त्या पाण्याच्या धारेत बाईंनी माझा हात धरून ठेवला. एका हातावरून अजून थंडगार पाण्याचे ओघळ वाहत असतानाच बाईंनी त्याच हातावर बोटांनी शब्द लिहिला w-a-t-e-r. आधी सावकाश, मग झरझर. मी एकदम निश्चल उभी राहिले. माझं सगळं लक्ष बाईंच्या बोटांच्या हालचालींवर एकवटलं होतं. एकाएकी, इतके दिवस आपण काहीतरी विसरून गेलो होतो, याची अस्पष्ट जाणीव झाली. गमावलेली स्मृती परत येण्यातला थरार मी अनुभवला... w-a-t-e-r वॉ...वॉ...आणि भाषेचं कोडं एकदम माझ्यासमोर जसं उलगडलंच. अरेच्या, पाणी म्हणजे आपल्या हातावरून थंडगार, नाचत, उसळत काहीतरी जातं ते? त्या एका जिवंत, चैतन्यमय शब्दानं माझ्या आत्म्याला जशी जाग आणली. प्रकाश, आशा, आनंदाची उधळण केली, मुक्त केलं. अजूनही तसे ह्या वाटेत बरेच अडथळे होते; पण लौकरच ते दूर होणार होते.

विहिरीपासून मी परतले, तेव्हा मन नवीन गोष्टी शिकण्यासाठी आतुर झालं होतं. आता प्रत्येक गोष्टीला नाव होतं आणि नावा-नावातून उमलत होता एकेक नवा विचार! घरात आल्यावर मी स्पर्श करायची ती प्रत्येक वस्तू जशी स्पर्शागणिक चैतन्यानं थरथरायची. मला जशी एक वेगळीच नवी दृष्टी मिळाली होती. आता त्या दृष्टीतून मी सगळं 'पाहत' होते. दारापाशी आल्यावर मला मी मोडलेल्या बाहुलीची आठवण झाली. चाचपडत शेकोटीजवळ लोटलेले बाहुलीचे तुकडे मी गोळा करून उचलले. तुकडे जोडून पाहत पुन्हा त्यांची बाहुली करण्याचा मी कसोशीनं प्रयत्न करत राहिले. आता माझ्या हातून घडलेल्या चुकीची जाणीव होऊन माझे डोळे भरून आले. पहिल्यांदाच मला खऱ्या अर्थानं पश्चात्ताप झाला, फार वाईट वाटलं.

त्याच दिवशी मी खूप नवे शब्द शिकून घेतले. ते सगळेच काही, नेमके कोणते ते आता आठवत नाही; पण त्या शब्दांत 'आई', 'बाबा', 'बहीण', 'बाई' हे शब्द होते एवढं निश्चित. आयुष्यात नव्यानं आलेल्या या शब्दांनी माझ्या भावविश्वात पालवी फुटली. तो दिवस माझ्या दृष्टीनं फार नाट्यमय होता. रात्री मी माझ्या चिमुकल्या पलंगावर झोपी गेले, तेव्हा माझ्याइतका दुसरा आनंदी जीव कुठे सापडला नसता. दिवसभराच्या आनंददायी आठवणी पुन्हा पुन्हा मी आठवत राहिले. आयुष्यात पहिल्यांदाच मला 'उद्या' कधी उगवतोय, ह्याची उत्कंठा लागून राहिली होती.


## स्वाध्याय

**प्र. १. खालील वाक्यांचा अर्थ स्पष्ट करा.**

(अ) बाहुलीचे शेकोटीजवळ लोटलेले तुकडे हेलनने गोळा केले.

(आ) हव्याशा क्षणी हेलन प्रेमाच्या प्रकाशात न्हाऊन निघाली.


**प्र. २. w-a-t-e-r हा शब्द हेलन कशा शिकल्या ते लिहून आकृती पूर्ण करा.**




**प्र. ३. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) आतुर होणे. | (अ) खूप आनंद होणे. |
| (२) हिरमोड होणे. | (आ) प्रेम करणे. |
| (३) उकळ्या फुटणे. | (इ) उत्सुक होणे. |
| (४) पालवी फुटणे. | (ई) नाराज होणे. |
| (५) मायेची पाखर घालणे. | (उ) नवीन उत्साह निर्माण होणे. |

**प्र. ४. फरक स्पष्ट करा.**




**प्र. ५. खालील गटातील लेखननियमांनुसार योग्य असलेला शब्द लिहा.**

(अ) शिरीष, शिरिश, शिरीश, शीरीष = ☐

(आ) पुनर्वसन, पूनर्वसन, पुनर्वसन, पुनरवसन = ☐

(इ) पारंपारिक, पारंपरिक, पारंपारीक, पारंपरीक = ☐

(ई) क्रिडांगण, क्रीडांगण, क्रिंडागण, क्रिडांगन = ☐

**प्र. ६. खालील वाक्यातील काळ ओळखा.**

(अ) काल शब्द शिकून घेतले. ________ (आ) सकाळी आई माझ्या खोलीत येऊन गेली. ________

(इ) आयुष्यात पहिल्यांदाच मला उद्या कधी उगवेल याची उत्कंठा लागली. ________

**प्र. ७. स्वमत.**

(१) तुमच्या मते हेलन केलर आयुष्यात पहिल्यांदा 'उद्याची' वाट का पाहात असेल ?

(२) 'ॲनी सुलिव्हॅन नसत्या तर 'हेलन' घडली नसती', विधानाची सत्यता पटवून द्या.

H6VE45

**प्र. ८. अभिव्यक्ती.**

(१) तुमच्या मते दिव्यांग मुलांना भाषाशिक्षणात येणारे संभाव्य अडथळे लिहा.

(२) 'सर्वसामान्य मुलांबरोबर दिव्यांग मुलांना शिक्षणाची समान संधी द्यायला हवी', या विचाराचे सामाजिक महत्त्व जाणा व ते शब्दबद्ध करा.

**उपक्रम :**

नसीमा हुरजूक यांचे 'चाकाची खुर्ची' हे आत्मवृत्त मिळवून वाचा.

# विश्वकोश (स्थूलवाचन)

विश्वकोशाची ओळख करून देणारा हा पाठ आहे. आपल्या ज्ञानविषयक गरजा आणि व्यावहारिक सोयी यांच्या दृष्टीने सर्वविषयसंग्राहक मराठी विश्वकोश अधिक उपयुक्त आहे. कोणत्याही शब्दाचे वेगवेगळे संदर्भ विश्वकोशातून मिळू शकतात. हे संदर्भ पाहणे, या संदर्भांचा अभ्यास करणे या भाषासमृद्धीच्या दृष्टीने अत्यंत आनंददायी प्रक्रिया आहेत. हा आनंद मिळावा, विश्वकोश पाहण्याची गरज कळावी व विश्वकोश अभ्यासण्यासाठी सवय लागावी या हेतूने स्थूलवाचन विभागात समावेश असलेला हा पाठ महत्त्वपूर्ण आहे.

तुमच्या शाळेच्या अथवा तुमच्या गावातील सार्वजनिक ग्रंथालयात तुम्ही गेलात तर अनेक 'जाड-मोठ्ठी पुस्तके' असलेलं काचेचं कपाट तुमचं लक्ष वेधून घेईल. मराठीच्या विविध साहित्यसंपदेसोबत मराठी विश्वकोश, मराठी व्युत्पत्तीकोश, मराठी चरित्रकोश, मराठी शब्दकोश असलेली ही ग्रंथसंपदा हा प्रत्येक वाचनालयाचा 'मानबिंदू'! या पाठात आपण मराठी विश्वकोशाचा परिचय करून घेऊया.

मानव्यविद्या, विज्ञान व तंत्रज्ञान यांतील सर्व विषयांचे अद्ययावत ज्ञान एका व्यापक योजनेखाली संकलित करणारा असा हा मराठी विश्वकोश! मराठी विश्वकोशामध्ये मानव्यविद्या शाखेअंतर्गत धर्म व तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र, साहित्य, इतिहास, दृश्यकला, भूगोल आणि क्रीडा या विषयांचा समावेश केला आहे. तसेच विज्ञान व तंत्रज्ञान शाखेअंतर्गत भौतिकी, रसायनशास्त्र, गणित-सांख्यिकी, जीवशास्त्र, अभियांत्रिकी, कृषिविज्ञान, माहिती तंत्रज्ञान संगणकविज्ञान, वास्तुकला, भूविज्ञान आणि वैद्यक या विषयांचा समावेश केला आहे. कोणताही एक महत्त्वाचा विषय अन्य अनेक विषयांशी संलग्न असतो. अशा अनेक विषयांची एकत्र माहिती मिळाली, तर तो विषय नीट समजून घेता येतो.

मुख्य विषय व त्याचे संलग्न विषयांचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी मराठी विश्वकोश उपयोगी पडतो.

शिक्षणाचा प्रसार जसा झपाट्याने वेग घेऊ लागला, भाषासमृद्धीची वाटचाल जशी दमदार होऊ लागली, तशी 'भाषा' सर्वार्थाने खुलू लागली. भाषा-भाषांमध्ये आदानप्रदान होऊन अनेक नवे शब्द मराठीत रूढ झाले. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे समाजाच्या वैज्ञानिक व तांत्रिक गरजा वाढू लागल्या. अनेक नवे शब्द अस्तित्वात आले. शब्दांना नवीन आयाम प्राप्त झाले. त्याचबरोबर सर्वविषयसंग्राहक विश्वकोशाची गरज निर्माण झाली.

उच्च शिक्षणाचे माध्यम म्हणून मराठीचा होत गेलेला अधिकाधिक स्वीकार, मराठीमध्ये निर्माण झालेली संदर्भग्रंथाची तीव्र गरज आणि शासनव्यवहाराची भाषा म्हणून राज्यपातळीवर मराठीला मिळालेली मान्यता या पार्श्वभूमीवर मराठी भाषेतील सर्वविषयसंग्राहक विश्वकोशाची गरज अधोरेखित झाली.

मराठी विश्वकोशाच्या निर्मितीमध्ये पहिले संपादक म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. तसेच मराठी विश्वकोशाचा परिचय करून घेताना ज्ञानकोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचेही कृतज्ञतापूर्वक स्मरण करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात त्यांनी केलेली कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. तथापि त्यानंतरच्या काळात विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळात ज्ञानविकासाच्या क्षेत्राचा ज्या वेगाने विकास झाला, हा विकास लक्षात घेऊन विद्यमान ज्ञानक्षेत्रांचा सर्वांगीण परिचय करून देणारा 'मराठी विश्वकोश' हा आश्वासक प्रयत्न आहे.

- **विश्वकोश असा तयार झाला...**

(१) विषयवार तज्ज्ञांच्या समितीची रचना केली गेली.

(२) प्रत्येक विषयाच्या नोंदीची शीर्षके निश्चित केली गेली.

(३) मुख्य, मध्यम, लहान नोंदीतील मुद्द्यांची टाचणे तयार केली गेली.

(४) नोंदींच्या मर्यादा आखून टाचणांमध्ये तशा सूचना दिल्या गेल्या.

(५) प्रत्येक विषयातील मुख्य, मध्यम, लहान व नाममात्र नोंदींच्या याद्या तयार केल्या गेल्या.

(६) अकारविल्ह्यानुसार या याद्या लावण्यात आल्या.

१९७६ यावर्षी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने मराठी विश्वकोशाचा पहिला खंड प्रकाशित केला. आत्तापर्यंत विश्वकोशाचे वीस खंड प्रकाशित झाले आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी कुमार विश्वकोशाची निर्मिती करण्यात आली असून त्याचे जीवसृष्टी आणि पर्यावरण भाग १ व भाग २ प्रकाशित करण्यात आले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून मराठी विश्वकोशाच्या वीस खंडातील माहिती मोबाईल ॲपमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

- **विश्वकोश यासाठी पाहावा....**

(१) आपल्या ज्ञानविषयक गरजा मराठीतून भागवण्यासाठी.

(२) जागतिक ज्ञानक्षेत्राचे क्षितिज विस्तारताना आपल्या विविध विषयांतील कुतूहलास इष्ट वळण लागण्यासाठी.

(३) अभिव्यक्तीला योग्य चालना मिळण्यासाठी.

(४) सर्व प्रकारचे प्रगल्भ व सूक्ष्म ज्ञान मराठी भाषेतून मिळण्यासाठी.

- **विश्वकोश असा पाहावा...**

(१) शब्द अकारविल्ह्यांनुसार (अनुज्ञेय) पाहावेत.

(२) बाराखडीतील स्वर व व्यंजन यांच्या स्थानानुसार अनुक्रमे दिलेला शब्द पाहावा.

एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाप्रमाणे मराठी भाषेतील सर्वविषयसंग्राहक विश्वकोश तुमच्या ज्ञानात, तुमच्या भाषिक समृद्धीत निश्चित भर घालणारा आहे. भाषा व त्यासंबंधीचे संदर्भ.... यांची गंमत अनुभवण्यासाठी विश्वकोश पाहण्याची सवय लावून घ्यायला हवी.

तुमच्या माहितीसाठी तुम्हांला आवडणारी 'शब्दकोडी' व फॅशन्सपैकी 'केशरचना' या शब्दांचे संदर्भ विश्वकोशाचा आधार घेऊन येथे देत आहोत.

तुम्हांला आवडणारे कोणतेही शब्द... त्यांचे अर्थ.... संदर्भ विश्वकोशातून शोधा व भाषेचे अनोखे अंग जाणून घ्या. विश्वकोश आता www.marathivishwakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१) शब्दकोडे**

- **पुढील पानावरील शब्दकोडे दिलेल्या वाक्यांच्या आधारे सोडवा.**

(१) 'स्वेदगंगा' या कवितासंग्रहाचे कवी.

(२) एका साहित्यिकाचे आडनाव 'श्रीपाद कृष्ण....'

(३) तुरुंगात असतानादेखील ज्यांची काव्यप्रतिभा बहरून येई, असे साहित्यिक(देशभक्त).


(४) 'सुधारक' चे संपादक.

(५) कवी यशवंत यांचे आडनाव.

(६) विनोदी साहित्य लिहिणाऱ्या एका साहित्यिकाचे आडनाव.

(७) मालतीबाई बेडेकर यांनी वापरलेल्या टोपणनावातील आडनाव.

(८) कवी कुसुमाग्रज यांचे आडनाव.




‘आर्थर विन’ याने २१ डिसेंबर १९१३ च्या न्यूयॉर्क वर्ल्डच्या अंकात अशा प्रकारचे पहिले शब्दकोडे प्रसिद्ध केले.

‘हाच तो चहा’ हे वाक्य दोन्हीकडून जरी शब्द वाचले तरी एकसारखेच बनते. अशा प्रकारच्या शाब्दिक करामतीवर आधारित हे कोडे असावे, असा अंदाज आहे.

मुलांनो, विविध वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके यांमध्ये येणारी शब्दकोडी तुम्ही सोडवता आणि भाषेची गंमत अनुभवता.

| |
|---|
| (१) फ्रेंच भाषा शब्दकोड्यांसाठी सर्वांत सोईस्कर भाषा. |
| (२) कॅनडामध्ये फ्रेंच व इंग्रजी शब्द योजून द्विभाषिक शब्दकोडे लोकप्रिय. |
| (३) रशियामध्ये शब्दकोड्याचा वापर प्रचारासाठीही. |
| (४) शब्दकोड्यासाठी चिनी भाषेचा अपवाद. |

शब्दकोड्यांचे प्रकार

- वर्तुळाकार
- बदामाच्या आकाराची
- फुलीच्या खुणेच्या आकाराची
- शास्त्रीय किंवा गुप्त लेखनाची
- चौकोनांची कोडी
- चित्रचौकटी
- साम्याकारी
- अनियमित आकाराची

अशा कल्पनांवर आधारलेले अनेक प्रकार रूढ आहेत. संगणकीय खेळांमध्ये विविध प्रकारच्या शाब्दिक कोड्यांचा समावेश होतो.

| |
|---|
| (१) प्रसिद्ध विधान अथवा अवतरण देऊन त्यांचे लेखक ओळखण्यास सांगणे. |
| (२) एका शब्दातील अक्षरे फिरवून नवीन शब्द तयार करणे. |
| (३) काही शब्दांतील रिकाम्या अक्षरांच्या जागा भरणे. |

## (२) केशभूषा



आजकाल केसांच्या वेगवेगळ्या स्टाईल्स करणे, तुम्हांला सर्वांना आवडते; पण मुलांनो, तुम्हांला आश्चर्य वाटेल, की पौराणिक काळापासून आकर्षक केशरचनेचे आकर्षण सर्व समाजात होते.

**केशभूषेत अंतर्भूत असणाऱ्या गोष्टी**

↓ केस कापणे
↓ धुणे
↓ नीट करणे
↓ विंचरणे
↓ कुरळे करणे
↓ सरळ करणे

**उद्‌देश**

- केशभूषेचा मुख्य उद्‌देश ↓ आकर्षकता किंवा सौंदर्य वाढवणे
- केशभूषेचा सामाजिक उद्‌देश ↓ सामाजिक संकेतानुसार प्रतीकात्मक केशभूषा

आदिम लोक केसांना मातीचा लेप लावून आपला पराक्रम व गुणवैशिष्ट्ये दाखवण्याकरिता त्यात विजयचिन्हे आणि पदके लावत.

केशभूषेचा उगम यातून झाला असावा.

केस इतरांना दिसू न देण्याच्या पुरातन स्त्रीच्या प्रयत्नातून केशबंधाची कल्पना पुढे आली असावी.





अजिंठा, वेरूळ, कोणार्क, खजुराहो येथील शिल्पाकृतींत आढळणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या केशरचना उल्लेखनीय आहेत. या प्राचीन केशरचनांचे अनुकरण भारतीय स्त्रिया करताना आढळतात.

## स्वाध्याय

**प्र. १. टीप लिहा.**

(१) विश्वकोशाचा उपयोग-

(२) विश्वकोशाची निर्मितिप्रक्रिया-

**प्र. २. 'शब्दकोडे सोडवल्यामुळे भाषिक कौशल्य वाढते', याविषयी तुमचे मत लिहा.**

**प्र. ३. विश्वकोश पाहण्याचे तुम्हांला लक्षात आलेले फायदे लिहा.**

**प्र. ४. केशभूषेचे उद्देश सांगून त्यात कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव होतो, ते स्पष्ट करा.**

**प्र. ५. विश्वकोशाचा उपयोग तुम्हांला मराठी भाषेतील ज्ञान प्राप्त करण्यासाठी कसा होऊ शकेल, ते लिहा.**

### भाषा सौंदर्य

विश्वकोश अकारविल्हयांनुसार (अनुज्ञेय) पाहावा हे आपल्याला कळले. त्यासाठी संपूर्ण वर्णमाला (आता ॲ व ऑ हे स्वर धरून) आपल्याला क्रमाने मुखोद्गत असायला हवी. त्या योग्य वर्णांची आणि त्यांची उच्चारस्थाने, परिपूर्ण आकलनही असावयास हवे. (उदा., स्वर, स्वरादी, व्यंजन, महाप्राण, मृदू व्यंजने, कठोर व्यंजने, अनुनासिके).

**खालील कोडे सोडवा व त्याच्या शेवटच्या रकान्यातील वर्णांचे विशेष ओळखा.**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | | | |
| (२) | × | | |
| (३) | | | |
| (४) | × | | |
| (५) | | | |

(१) पैसे न देता, विनामूल्य.
(२) पाणी साठवण्याचे मातीचे गोल भांडे.
(३) जिच्यात रेतीचे प्रमाण खूप जास्त असते अशी जमिनीची जात.
(४) रहस्यमय.
(५) खास महाराष्ट्रीयन पक्वान्न. पोळ्या, मोदक, करंज्या यांमध्ये हे भरतात.

वरील कोडे वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचे उत्तर तुम्हांला सोडवायचे आहे. हे कोडे सोडवल्यावर तुम्हांला निश्चितच भाषेचे सौंदर्य व गंमत लक्षात येईल. अशा कोड्यांचा अभ्यास करा. त्यातील भाषिक वैशिष्ट्ये समजून घ्या व अशी विविध वैशिष्ट्यांची कोडी तयार करण्याचा तुम्ही स्वत: प्रयत्न करा.

### भाषाभ्यास

**अनुस्वार लेखनाबाबतचे नियम :**

**❋ खालील शब्द वाचा.**

'रंग', 'पंकज', 'पंचमी', 'पंडित', 'अंबुज' हे शब्द तत्सम आहेत. हे आपण पर-सवर्णानेसुद्धा लिहू शकतो, म्हणजे अनुस्वारानंतर येणाऱ्या अक्षराच्या वर्गातील अनुनासिक वापरून लिहू शकतो. उदा., रङ्ग, पङ्कज, पञ्चमी, पण्डित, अम्बुज असे. विशेषत: जुने साहित्य वाचले तर असे लेखन दिसते. परंतु, आजकाल अशी पर-सवर्णाने लिहिण्याची पद्धत जुनी झाली आहे. त्याऐवजी अनुस्वारच वापरले जातात. खालील शब्द बघा कसे दिसतात!

'निबन्ध', 'आम्बा', 'खन्त', 'सम्प', 'दङ्गा' हे शब्द बघायला विचित्र वाटतात ना! कारण हे तत्सम नाहीत. पर-सवर्ण लिहिण्याची पद्धत फक्त तत्सम शब्दांपुरती मर्यादित आहे. संस्कृत नसलेले मराठी शब्द शीर्षबिंदू देऊनच लिहावेत.

**मराठीत स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा.**

**❋ खालील शब्द वाचा.**

'सिंह', 'संयम', 'मांस', 'संहार.' या शब्दांचा उच्चार खरे तर खूप वेगळा आहे ना? या शब्दांचे 'सिंव्ह', 'संय्यम', 'मांव्स', 'संव्हार' उच्चार असे होत असले तरी लिहिताना हे शब्द तसे लिहू नयेत.

**य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा.**

| पर-सवर्णाने लिहा. | अनुस्वार वापरून लिहा. |
|---|---|
| घंटा, मंदिर, चंपा, चंचल, मंगल | जङ्गल, चेण्डू, सञ्च, गोन्धळ, बम्ब |

# ♦ उपयोजित लेखन

## १. पत्रलेखन

आपल्या मनातील भावना, विचार, मते मुद्‌देसूदपणे, सुसंबद्‌ध पद्‌धतीने अपेक्षित व्यक्तीपर्यंत लिखित स्वरूपात पोहोचवण्याचे उत्तम माध्यम म्हणजे पत्रलेखन होय.

पत्रलेखन

औपचारिक (व्यावहारिक)

अनौपचारिक (घरगुती, कौटुंबिक)

यापूर्वीच्या इयत्तांमध्ये अनौपचारिक व औपचारिक पत्रलेखनाचे काही प्रकार तुम्ही अभ्यासले आहेत.

स्वपरिचय, मागणी व तक्रार या औपचारिक पत्रप्रकारांचा यावर्षी आपण अभ्यास करणार आहोत.

**औपचारिक पत्रप्रारूपाचे प्रमुख घटक**

- मायना व विषय
- ज्यांना पत्र पाठवायचे त्यांचा पत्ता (लिफाफ्यासह)
- पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता व दिनांक
- विषयानुरूप मांडणी
- मुख्य मजकूर
- समारोप

✻ कृतिपत्रिकेत एखादी सूचना, आवाहन, निवेदन, जाहिरात इत्यादी प्रकारांपैकी एक कृती दिलेली असेल, ती कृती विषय समजून घेऊन तुम्हांला पत्रलेखन करायचे आहे.

**पत्रलेखनाचे स्वरूप**

- पत्रलेखनाचा विषय (निवेदन), सूचना, जाहिरात, बातमी इत्यादींपैकी एक.
- कृतीच्या आकलनावरून पत्रलेखन.
- पत्रलेखनाच्या संपूर्ण प्रारूपाचा समावेश आवश्यक.
- कृतीतील सर्व मुद्‌दे लेखनात येणे आवश्यक.
- पत्राच्या विषयानुरूप प्रभावी भाषाशैली.

**औपचारिक पत्राची मांडणी**

१. पत्राच्या सुरुवातीला उजव्या कोपऱ्यात पत्र लिहिणाऱ्याचे नाव, हुद्‌दा, पिनकोडसह पत्ता, दिनांक, ई-पत्ताही असावा.
२. डावीकडे योग्य मायना लिहावा. संबंधित व्यक्तीचे नाव, हुद्‌दा, पत्ता लिहावा.
३. कृतीत विशेषनाम दिले असेल तरच ते लिहावे. अन्यथा प्रति, प्रेषक याठिकाणी 'अ. ब. क.' असा उल्लेख करावा.
४. औपचारिक पत्रात पत्राचा 'विषय' लिहिणे आवश्यक आहे.
५. विषयानंतर त्या खाली महोदय/महोदया असे लिहून पत्रलेखनास सुरुवात करावी.
६. विषयानुसार लेखन व भाषा असावी.
७. शेवटी योग्य ते संबोधन वापरून समारोप करावा.

**लक्षात घ्या, औपचारिक पत्रलेखन ही एक कला आहे, तसेच ते शास्त्रही आहे.**

## नमुना १

- **खालील निवेदन वाचा–**

संबंधित विषयासाठी स्व–परिचय पत्र तयार करा.

महात्मा फुले विद्यालय बुलढाणा

आंतरशालेय नाट्यमहोत्सवातील स्पर्धांसाठी

**एकपात्री प्रयोग कलाकारांची निवड**

इच्छुक विद्यार्थ्यांकडून स्व–परिचयपत्र

मागविण्यात येत आहे.

अंतिम दिनांक
दि.२६
डिसेंबर

नाट्यविभाग प्रमुख

पासपोर्ट आकाराचा फोटो आवश्यक

**स्वपरिचय पत्राचे मुद्दे**

| | |
|---|---|
| (१) संपूर्ण नाव | (५) शैक्षणिक पात्रता/विशेष प्रशिक्षण |
| (२) पत्ता | (६) छंद |
| (३) संपर्क क्रमांक | (७) अनुभव/पारितोषिके |
| (४) जन्मतारीख | (८) इतर कलांमधील प्रावीण्य |

**टीप : स्वपरिचयपत्रातील सर्व माहिती विषयानुरूप परंतु काल्पनिक असावी.**

## नमुना २

अमरावतीकरांना सुवर्णसंधी

‘सरगम’ संस्था अमरावतीद्वारे आयोजित

**‘दिवाळी पहाट’**

सर्व नागरिकांना निमंत्रण

सर्वांनी सहभागी व्हावे

स्थळ – वसंतराव देशपांडे हॉल

कौस्तुभ व सोनाली माडे यांच्या

सुरेल, बहारदार गायनाचा कार्यक्रम

तृप्त करा कानांना
प्रफुल्लित करा मनाला

सोमवार
दिनांक
२ नोव्हें.

घरपोच तिकिटांची सोय व हॉलवर विक्री सुरू.

पहाटे
५.३०
वाजता

रसिक नागरिक या नात्याने

कार्यक्रमाची तिकिटे संपल्यामुळे हाच कार्यक्रम पुन्हा सादर करण्याची मागणी करणारे पत्र लिहा.


घरपोच तिकिटे मागितल्याप्रमाणे न मिळाल्याबाबत संबंधित व्यक्तीकडे तक्रार करा.

**विद्यार्थ्यांसाठी :** स्वपरिचय पत्र हा कृतिपत्रिकेतील लेखन विभागात (मूल्यमापनात) समाविष्ट नाही. मात्र, विद्यार्थ्यांसाठी हा प्रकार/घटक उपयुक्त असल्याने, त्याचा अभ्यास करावा.

# २. गद्य आकलन

प्रश्नांची रचना करता येणे, हे महत्त्वाचे भाषिक कौशल्य आहे. हे कौशल्य प्राप्त होण्यासाठी 'गद्य आकलन' या घटकाचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

दिलेला उतारा वाचून त्यावर आधारित पाच प्रश्न तुम्हांला तयार करावयाचे आहेत. हे पाच प्रश्न असे असावेत, की त्यांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात येतील.




१. तयार केलेला प्रश्न अर्थपूर्ण असावा.
२. कोण ? कोठे ? केव्हा ? का ? इत्यादी प्रकारच्या प्रश्नांची रचना करण्याचा सराव करावा.
३. प्रश्नाचे उत्तर उताऱ्यातच असेल असेच प्रश्न असावेत.
४. उत्तरे पडताळून पाहावीत.
५. उत्तरे लिहिण्याची आवश्यकता नाही.
६. प्रश्नाच्या शेवटी प्रश्नचिन्ह देणे आवश्यक आहे.
७. उताऱ्याला 'योग्य शीर्षक कोणते असेल' असा प्रश्न तयार करू नये.

## नमुना गद्य आकलन उतारा

**※ खालील उतारा वाचा व त्याच्या आशयावर प्रश्न तयार करा.**

'पूर्वरंग'.....! लेखक अर्थातच आपले सर्वांचे आवडते पु. ल. देशपांडे. 'पूर्वरंग' हे एक प्रवासवर्णन म्हणून प्रसिद्ध आहे; पण पूर्वेकडील देशांचे प्रवासवर्णन यापेक्षा पूर्वेकडील देशांतील विविध लोकांचे 'अंतरंग' हेच नाव याला साजेसे ठरेल. अर्थातच हे केवळ एक प्रवासवर्णनच नाही, तर ते आहे विविध देशांतील अनेक व्यक्तींचे स्वभाव, राहणी, त्यांचे आचार-विचार एवढेच नव्हे, तर त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण पोशाख, खाद्यपदार्थ यांचा बारकाईने केलेला अभ्यास आणि त्याचे मनोवेधक चित्रण ! आणि या चित्रणाला पुलंच्या विनोदी शैलीने प्राप्त झालेला अनोखा 'रंग' !

पुस्तकाची सुरुवातच होते लेखकाच्या प्रवास तयारीने ! त्यात लेखकाचा उडणारा गोंधळ, परदेशी जाताना घ्यावी लागणारी इंजेक्शने आणि त्यातील कर्मचाऱ्यांचा गलथानपणा विनोदी भाषेत व्यक्त करताना पुलंनी इतके छान किस्से सांगितले आहेत, की पहिल्यांदा वाचतानाच हे पुस्तक मनाची पकड घेते.

**गद्य आकलन उतारा प्रश्न**

(१) 'पूर्वरंग' या पुस्तकाचे लेखक कोण ?
(२) 'पूर्वरंग' या पुस्तकाचा वाङ्मय प्रकार कोणता ?
(३) पुस्तकाची सुरुवात लेखक कोणत्या विषयाने करतात ?
(४) पुस्तकात कोणत्या गोष्टींचा अभ्यास लेखकाने बारकाईने केलेला आढळतो ?
(५) पुस्तकातून लेखकांच्या कोणत्या लेखन शैलीचा परिचय होतो ?


# ३. कथालेखन

उपयोजित लेखनप्रकारामध्ये 'कथालेखन' हा घटक विद्यार्थ्यांच्या सृजनशील लेखनाला वाव देणारा आहे. कल्पना, नवनिर्मिती, स्वभाषेत प्रकटीकरण हे या वयोगटाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहेत. कथालेखनाच्या योग्य सरावाने भावी कथालेखक घडू शकतील.

कथाविषयांनुसार कथांचे विविध प्रकार पडतात.

उदा.,

(१) शौर्यकथा (२) विज्ञान कथा (३) बोधकथा (४) ऐतिहासिक कथा (५) रूपककथा (६) विनोदी कथा इत्यादी. कथालेखनाचे महत्वाचे घटक जाणून घेण्यासाठी खालील मुद्द्यांचा अभ्यास करून कथालेखन तंत्र जाणून घेऊया.




**खालील मुद्द्याचा सविस्तर विचार करूया.**

**(१) कथाबीज–**

कथालेखन ही कल्पकतेवर आधारलेली कला आहे. कथाबीज हा कथेचा प्राण असतो. कथालेखन करताना कथाबीजाच्या विषयास अनुसरून दैनंदिन निरीक्षण, वाचन, अनुभव, सृजनशील कल्पना, भावना यांचा विचार करून कथाबीज फुलवावे.

**(२) कथेची रचना–**

कथेला प्रारंभ, मध्य व शेवट असावा. कथेची सुरुवात आकर्षक असावी. वाक्यांची रचना पाल्हाळिक नसावी. अर्थपूर्ण छोटी छोटी वाक्ये असावीत. कथेचा मजकूर सातत्याने उत्कंठावर्धक असावा. कथेतील आशयाला काहीतरी वळण असेल, तर उत्कंठा अधिक वाढते. कथा नेहमी भूतकाळातच लिहावी.

**(३) कथेतील घटना व पात्रे–**

कथाबीजानुसार कथेतील पात्रे व घटना निवडाव्यात, त्या कथाबीजाला पुढे नेऊ शकतील. घटना घडण्याचे स्थळ सुसंगत निवडावे. पात्र, घटना व स्थळांच्या वैशिष्ट्यांचे बारकावे जाणून घेऊन वर्णन करावे. वर्णन चित्रदर्शी असावे.

**(४) पात्रांचे स्वभाव विशेष–**

कथेतील आशयाला समर्पक असे पात्रांच्या स्वभाव विशेषांचे व त्यानुसार असलेल्या वर्तनांचे वर्णन करावे.
उदा., राग आला तर– त्याने हाताच्या मुठी करकचून आवळल्या इत्यादी.

**(५) कथेतील संवाद व भाषा–**

कथेत निवडलेल्या परिसराला कथाबीजाला अनुसरून कथेची भाषा असावी. आलंकारिक भाषेचा वापर करून कथेची परिणामकारकता वाढवता येते. विरामचिन्हांचा योग्य वापर करावा. संवादाची परिणामकारकता विरामचिन्हांमुळे निर्माण होते. पात्रांच्या तोंडी पात्राच्या वैशिष्ट्यांच्या गरजेनुसार ग्रामीण भाषा व बोलीभाषा यांचा वापर सहजतेने करायला हवा. कथेमध्ये वाक्प्रचार, म्हणी यांचा सुयोग्य वापर करावा.

(६) **शीर्षक तात्पर्य–**

संपूर्ण कथेचा आशय, कथेतील मूल्य/संदेश व्यक्त करणारे शीर्षक असावे. कथेतून मिळणारा संदेश/मूल्य किंवा कथेतील वैशिष्ट्यपूर्ण आशय प्रतिबिंबित करणारे तात्पर्य असावे.

**कथालेखन पूर्णत: सृजनशील कल्पकतेवर अपेक्षित आहे. कथाबीज विस्तारासाठी, अपूर्ण कथा पूर्ण करण्यासाठी वेगळा नावीन्यपूर्ण विचार किंवा कल्पना अपेक्षित आहे.**

**विद्यार्थ्यांनो, तुमच्या सृजनशील कल्पनेला खूप धुमारे फुटू शकतात. त्यांना फक्त निरीक्षण व कल्पकतेने अभिव्यक्त करा.**

**कथालेखन मूल्यमापनाच्या नियोजित कृती**

(१) कथाविषयांवरून कथालेखन (३) दिलेल्या शब्दांवरून कथालेखन

(२) मुद्द्यांवरून कथालेखन (४) कथेचा पूर्वार्ध देऊन उत्तरार्ध लिहिणे किंवा उत्तरार्ध देऊन पूर्वार्ध लिहिणे.

कथालेखनासाठी वरीलपेक्षा वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व त्यांचा अभ्यास करावा.


## कथालेखन नमुना

- **खालील अपूर्ण कथा वाचा. तुमच्या विचार व कल्पनेने कथा पूर्ण करा.**

२६ जानेवारी, भारताचा गणतंत्र दिन. अर्णव स्वच्छ शालेय गणवेशात तयार होऊन शाळेत गेला. माननीय प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम सुरू झाला. विद्यार्थ्यांनी ध्वजवंदन केले. राष्ट्रगीत, ध्वजगीत, देशभक्तीपर गीत सादर केले. अध्यक्षांच्या प्रेरणादायी भाषणानंतर अर्णवचे देशभक्तीचा संदेश देणारे व देशभक्ताबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारे भाषण झाले. वृक्षारोपण, खाऊवाटप झाल्यानंतर मुले घरी जायला निघाली.

अर्णवदेखील आपली तीनचाकी सायकल घेऊन निघाला. सावकाशपणे हुतात्मा चौकापर्यंत पोहोचला. लाल दिव्याचा संकेत मिळताच जागेवरच थांबला. चौकात खूप गर्दी होती. अनेक छोटी मुलं हातात छोटे तिरंगी झेंडे घेऊन पालकांच्या वाहनांवर बसली होती. हिरवा दिवा दिसताच थांबलेली गर्दी पुढे सरकली. अर्णवनेही हाताने चाकाला वेग दिला. एवढ्यात सर्वांचं लक्ष वेधून घेणारं असं.....

- **तुम्ही लिहिलेल्या कथेला योग्य शीर्षक द्या व तात्पर्य लिहा.**
- **तुम्ही कथा तयार करताना व लिहिताना कोणकोणत्या गोष्टी विचारात घेतल्या, त्यांची यादी करा.**



# ४. जाहिरात

'जाहिरात' या शब्दातच तिचा अर्थ सामावलेला आहे. इंग्रजीत 'जाहिरात'साठी Advertisement हा शब्द आहे. यातील 'Ad' चा अर्थ 'कडे' आणि 'verfo' चा अर्थ 'वळणे' किंवा 'लक्ष वेधून घेणे' असा आहे. म्हणूनच लोकांचे लक्ष एखाद्या गोष्टीकडे वेधून घेते ती जाहिरात होय. यादृष्टीने विविध क्षेत्रांतील निर्मित वस्तू, उत्पादने यांची ग्राहकाकडून मागणी निर्माण करणारी जाहिरात ही एक कला आहे.

आजच्या संगणक व माहिती-तंत्रज्ञानाच्या युगातील इंटरनेट व मोबाईल क्रांतीमुळे जाहिरातक्षेत्राची कक्षा अधिक विस्तारत चालली आहे.

कला, क्रीडा, शिक्षण, आरोग्य, व्यापार, दळणवळण, प्रसारमाध्यम, मनोरंजन अशा सर्वच क्षेत्रात जाहिरातीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे, म्हणूनच 'युग' आहे जाहिरातींचे...' असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

- **जाहिरातक्षेत्रातील भाषेचा वापर**

जाहिरात हा संदेश स्वरूपाचा संवाद असतो आणि कोणत्याही संवादाचे महत्वाचे माध्यम भाषा हेच असते. या दृष्टीने जाहिरात लेखनात भाषा ही पुढीलप्रमाणे महत्वाची ठरते.

- **जाहिरातीची भाषा-**

(१) आकर्षक मजकूर.

(२) साधी, सोपी, सरळ, आकर्षक, स्पष्ट व ओघवती भाषा.

(३) बुद्धीला फारसा ताण न देणारी.

(४) ग्राहकाच्या मनात विश्वासार्हता निर्माण करणारी.

(५) शब्दांचा गैरवापर न केलेली.

(६) लोकभावनांची जोड, जाण असणारी.

(७) वेचक, अर्थपूर्ण, प्रसन्न व परिणामकारक.


(८) लयबद्ध व वाचकांशी सुसंवाद साधणारी.


(९) विनोदाची झालरही असणारी.

(१०) मानवी भावभावनांची संवेदनशीलता जाणणारी व जपणारी.


उदाहरणादाखल जाहिरातीचे काही नमुने आपण पाहिले, तर त्यातून जाहिरातकलेची विविध रूपे आपल्या लक्षात येऊ शकतात.


आजचे युग जाहिरातीचे युग





लोकांच्या मनात एखाद्या वस्तूविषयी आवड निर्माण करणे हा जाहिरातीचा हेतू.




**जाहिरातलेखनाच्या मूल्यमापनाच्या कृती.**


- शब्दांवरून जाहिरात लेखन.
- जाहिरात देऊन त्यावरील कृती सोडवणे.
- विषय देऊन जाहिरात लेखन.
- दिलेल्या जाहिरातीचे अधिक आकर्षक पद्धतीने पुनर्लेखन.
- दिलेल्या मुद्द्यांवर जाहिरात लेखन.

या व्यतिरिक्त वेगळ्या, सृजनशील पद्धतीने कृतींची मांडणी केली जाऊ शकते. अशा सृजनशील वैविध्यपूर्ण कृतींचा शोध घ्यावा व अभ्यास करावा.


## जाहिरात लेखन नमुना

### नमुना क्र.१

• खालील जाहिरात वाचून त्याखालील कृती करा.




(अ) चौकट पूर्ण करा.




(आ) जाहिरातीतील काही मजकूर चुकीचा वाटतो का? सकारण नमूद करा.

(इ) वरील जाहिरात अधिक आकर्षक बनवण्यासाठी तुम्ही कोणकोणते बदल सुचवाल?

### नमुना क्र.२

• नमुना क्र. १ मधील जाहिरातीचे अधिक आकर्षक स्वरुपात पुनर्लेखन करा.

### नमुना क्र.३

• खाली दिलेल्या बातमीच्या मथळ्यावरून आकर्षक जाहिरात तयार करा.

‘पाठ्यपुस्तकेतर पुस्तके सवलतीच्या दरात मिळतील.’

**लक्षात घ्या.**

✼ कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त आशय समजणे अपेक्षित.

✼ शब्दरचना व वाक्यरचना समजण्यास सोपी असणे आवश्यक.

✼ आलंकारिक व काव्यमय शब्दांचा वापर– जाहिरात आकर्षक होण्यास मदत.

✼ काळानुरूप जाहिरातीतील भाषा वापरणे आवश्यक.

# ५. मुलाखत

एखाद्या व्यक्तीशी संवाद साधून तिचे विचार, जीवनकार्य लोकांपर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे मुलाखत होय.

स्वत: कमीत कमी बोलून समोरच्या व्यक्तीला बोलते करण्याची कला मुलाखतकाराने संपादन करावी लागते.

**मुलाखतकाराने लक्षात ठेवावे**

- पूर्वज्ञान
- मुलाखतीचा हेतू
- व्यक्तीविषयी माहिती

**मुलाखतकाराने घ्यावयाची काळजी**

- वातावरणात कृत्रिमता नसावी.
- शब्दांत जवळीक
- कमी बोलणे
- सहज संवाद
- योग्य आदर

**मुलाखतीचे दोन भाग**

- प्रत्यक्ष मुलाखत घेणे
- शब्दबद्ध करणे

## मुलाखतीची वैशिष्ट्ये

### मुलाखत घेताना

(१) प्रश्नोत्तर स्वरूपात संवाद.
(२) मोकळे वातावरण.
(३) समोरच्या व्यक्तीचा मान राखत संवाद.
(४) व्यक्तीला बोलते करणे.

### मुलाखत लिहिताना

(१) सुरुवातीस प्रास्ताविक/परिच्छेद.
(२) नेमके प्रश्न-उत्तर सविस्तर.
(३) मूळ आशयाला धक्का न लावता आकर्षक संपादन.

मुलाखत घेणे, मुलाखत देणे, मुलाखत वाचणे व मुलाखत ऐकणे या आनंददायी प्रक्रिया आहेत.

बालमित्र चित्रकला स्पर्धेत तुमच्या शाळेतील चि. अमित/कु. अमिता घोलप यास/हीस राज्य पातळीवर प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्यासंदर्भात त्याची/तिची मुलाखत घ्या.

## मुलाखत लेखन नमुना

विद्यार्थी मित्रांनो,

खालील मुलाखत ही काल्पनिक असली, तरी त्यातील विषय व त्याचे गांभीर्य महत्त्वाचे आहे. व्यसनाधीनता हा सुदृढ व निकोप जीवनाला लागलेला शाप असतो. त्यापासून जाणीवपूर्वक अन् निर्धाराने दूर असलेल्या व्यक्तींनाच सुखी व निरामय जीवनाचा सूर गवसतो. हा आनंदी जीवनाचा मंत्र जाणून घ्या व कोणत्याही लोभाला कधीच बळी पडू नका. स्वत:चे व पर्यायाने समाजाचे निकोप मनच राष्ट्रप्रगतीसाठी आवश्यक असते.

नमस्कार! आज व्यसनमुक्ती दिन. त्या निमित्ताने सोनेगाव या गावात व्यसनमुक्ती केंद्र स्थापन करणारे मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शैलेश वाघ यांची अक्षय चौधरी यांनी घेतलेली ही मुलाखत वाचा. त्यांच्या 'मुक्तानंद' व्यसनमुक्ती केंद्राबाबत अधिक जाणून घेऊया.

प्रश्न : सर नमस्कार, 'मुक्तानंद' हे केंद्र स्थापन करण्याची गरज का भासली?

उत्तर : अनेक पालक नेहमीच माझ्याकडे व्यसनमुक्तीबाबत सल्ला घेण्यास व मुलांवर उपचार करण्यास येत. त्यांची गरज व इच्छा ओळखून मी हे केंद्र स्थापन केले.

प्रश्न : डॉक्टर ही किशोरवयीन मुले व्यसनाधीनतेकडे का वळली असतील, असे तुम्हांला वाटते?

उत्तर : छान प्रश्न विचारला. व्यसनाधीन होण्याची कारणे बरीच आहेत. काही मुले अबोल, आत्मविश्वासाची कमतरता, शैक्षणिक अपयश, कौटुंबिक ताणतणाव, प्रेमभंग यांमुळे मानसिक नैराश्याच्या भावनेला बळी पडून त्यातून बाहेर पडण्यासाठी मित्रपरिवाराचा आधार घेतात. त्यात संधी मिळाल्यास ती व्यसनांकडे आकर्षित होतात.

प्रश्न : मुले एकदम व्यसनाधीन बनतात की सुरुवातीला दुसरे काही सेवन करतात?

उत्तर : खरं तर, सुरुवातीला गंमत व नंतर सवय म्हणून व्यसन केले जाते. या गोष्टी 'स्लो पॉइझनिंग' आहेत हे त्यांना कळत नाही.

प्रश्न : डॉक्टर या मुलांमध्ये काही वेगळी अशी लक्षणे आढळतात का?

उत्तर : त्यांना झोप येत नाही, त्यांचे हात-पाय थरथरतात, त्यांना भीती वाटते, कायम अस्वस्थता जाणवत असते; पण ते स्वत:हून कबूल करत नाहीत. दीर्घ संवादानंतरच ती व्यसनाधीनता लक्षात येते.

प्रश्न : व्यसनाधीनतेचे वैयक्तिक आणि सामाजिक दुष्परिणाम होतात का?

उत्तर : किशोरवयीन मुलांमधील व्यसनाधीनता त्यांच्यासाठी व समाजासाठीही घातक असते.

प्रश्न : डॉक्टर, या परिस्थितीत आपण कोणता सल्ला द्याल?

उत्तर : पालकांनी मुलांशी मोकळा संवाद साधावा. विचार, मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य असावे. घरातील वातावरण सुसंवादी व मैत्रीपूर्ण असावे. प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे याची सर्वांनीच जाण ठेवावी.

# ६. संवाद लेखन

संवाद लेखन या घटकाचे प्रमुख उद्‌दिष्ट विद्यार्थ्यांना सुसंवादी बनवणे. 'संवाद कौशल्य' हा प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा अपरिहार्य पैलू आहे. उत्कृष्ट संवाद साधणारी व्यक्ती त्यांच्या कार्यक्षेत्रात स्वत:चे वेगळेपण सिद्‌ध करते. विशिष्ट विषयावर व्यक्त केलेली मतमतांतरे, त्या विषयावरचे चिंतन व विषयानुरूप सुसंगत असे संभाषण म्हणजे संवाद होय.

**संवाद**

**हे असावे**

(१) संवाद कोणाकोणात सुरू आहे, याची स्पष्ट कल्पना लेखनातून यावी.
(२) संवादांतील दोन व्यक्ती भिन्न स्तरावरील (वय, व्यवसाय, लिंग, सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी) असतील तर त्यानुसार भाषा बदलती असावी.
(३) संवादातील वाक्ये सोपी, सुटसुटीत, अनौपचारिक असावीत.
(४) संवादाला योग्य समारोप असावा.
(५) संवाद वाचल्यावर त्या विषयावरचा सर्वांगीण विचार वाचकापर्यंत पोहोचावा.

**हे नसावे**

(१) हो-नाही स्वरूपाचे संवाद नसावेत.
(२) बोलणे पाल्हाळीक नसावे.
(३) मध्येच बोलणे थांबवल्याची भावना नसावी.
(४) संवाद ओढून-ताणून केलेला नसावा.
(५) संवाद मुद्दे सोडून भरकटणारा नसावा.

**संवादासाठी आवश्यक स्वभाव वैशिष्ट्ये**

(१) संवेदनशीलता (२) गुणग्राहकता
(३) अनाग्रही वृत्ती (४) विवेकशीलता
(५) भावनिकता (६) विश्वासार्हता
(७) स्वागतशील रसिक वृत्ती.

ही वैशिष्ट्ये अंगी असतील तरच माणूस सुसंवादी बनतो.

**विद्यार्थ्यांसाठी सूचना**

जागतिक पर्यावरणदिनानिमित्त 'आनंदनिकेतन' या वृक्षवाटिकेतर्फे

**वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन**

इच्छुक विद्यार्थ्यांनी २५ एप्रिलपर्यंत वर्गशिक्षकांकडे आपली नावे नोंदवावीत व ५ जूनला सकाळी ७.३० ला शाळेत जमावे.

टीप :- येताना उन्हाळी सुट्टीत जमवलेल्या फळबिया सोबत आणाव्यात.

वरील सूचना वाचा. तुम्ही व तुमचा मित्र यांच्यातील संवाद लिहा.

## संवाद लेखन नमुना

एक मित्र (राजू) — दुसरा मित्र (संजू)

**राजू** : आपल्या फळ्यावरची सूचना वाचली का?

**संजू** : हो वाचली नं आणि मी त्या कार्यक्रमाला जाणार आहे. मी नावही दिलंय. अरे, तू येतोस नं?

**राजू** : हे काय विचारणं झालं? माझी तर खूप दिवसांपासून तयारी सुरू आहे.

**संजू** : तयारी? अन् ती कशी काय?

**राजू** : अरे! ती सूचना तर आता आली व आत्ता सर्वांना कळले; पण माझी तयारी आधीच झाली.

**संजू** : कोणती तयारी केलीस रे तू?

**राजू** : जंगलतोड आणि त्याचे परिणाम हे वारंवार ऐकून माझ्या मनावर इतका परिणाम झाला, की झाडं आपणच लावायची असा मी निश्चय केला. मी खूप रोपे तयार केली. अनेक झाडांच्या बिया गोळा करून ठेवल्यात.

**संजू** : वा! राजू, तू छान तयारी केलीस. मी तुला हे करायला मदत करीनच; पण माझ्याकडे जेवढ्या बिया आहेत त्यासुद्धा मी घेऊन येणार आहे.

**राजू** : आपण दोघे मिळून आपल्या परिसरात सुद्‌धा त्यादिवशी काही झाडं लावू.

**संजू** : राजू, मला तुझा मित्र असल्याचा अभिमान वाटतो, कारण तू सूद्‌धा माझ्यासारखाच वृक्षप्रेमी आहेस.

वरील संवादाचा मजकूर केवळ नमुना आहे. दिलेल्या विषयावर विद्यार्थ्यांनी अधिक प्रभावी संवादलेखन करावे.

# ७. वृत्तान्त लेखन

वृत्तान्त लेखन

↓

**घडलेल्या घटनेचे नेमके वर्णन**

* वृत्तान्त लेखनात राग, आनंद, दु:ख, आश्चर्य इत्यादी तीव्र भावना व्यक्त करणे अपेक्षित नाही.

**लक्षात ठेवा**

- कल्पनेला अजिबात वाव नाही
- सत्यकथन व वस्तुनिष्ठता यांस महत्त्व

*** सभा, संमेलने, शिबिरे, कार्यशाळा यांच्याविषयी एखाद्या घटनेसंबंधी सविस्तर व क्रमवार माहिती सांगणे म्हणजे वृत्तान्त लेखन होय.**

वृत्तान्त लेखन

- आटोपशीर व आकर्षक पद्धतीने लेखन आवश्यक
- दिनांक, वेळ, ठिकाण देणे आवश्यक

**लक्ष द्या.**

वृत्तान्त

- घटनेचे नेमके वर्णन
- स्थळ, काळ, व्यक्ती यांचा अचूक उल्लेख
- लहान वाक्ये व लहान परिच्छेद
- घटनांचा योग्य क्रम
- स्पष्टीकरण
- मथळा

- **खालील विषयावर वृत्तान्त लेखन करा.**

**नवमहाराष्ट्र विद्यालय**

विमाननगर, वसई

**जागतिक विज्ञानदिन सोहळा**

जागतिक विज्ञानदिनानिमित्त सुप्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ

डॉ. जयंत नारळीकर यांचे व्याख्यान

प्रमुख उपस्थिती– .........

२८ फेब्रुवारी

**वेळ**

सकाळी ११ वाजता

**स्थळ–**

डॉ. होमी भाभा सभागृह

## वृत्तान्त लेखन नमुना

### स्वच्छता अभियान कार्यक्रम

२ ऑक्टोबर, आष्टी जि. चंद्रपूर येथील शारदा विद्यालयात महात्मा गांधी जयंती निमित्त स्वच्छता अभियान कार्यक्रम संपन्न झाला. या दिवशीच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शहरातील प्रसिद्ध आहारतज्ज्ञ डॉ. जयंत करोडे उपस्थित होते, तर अध्यक्षस्थान शाळेच्या मुख्याध्यापकांनी भूषवले.

इयत्ता आठवी ते दहावी साठी 'स्वच्छ भारत सुंदर भारत' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली होती. इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी परिसरात 'स्वच्छता अभियान' राबवले. प्रमुख पाहुण्यांनी 'माझी शरीर स्वच्छता आणि आहार' या विषयावर उत्तम उद्बोधन केले. प्रत्येक स्पर्धेतील पहिल्या तीन क्रमांकांना बक्षिसे देण्यात आली. अध्यक्षीय भाषणानंतर श्री. गावंडे सरांनी आभारप्रदर्शन केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊ देण्यात आला.

- वरील वृत्तान्त वाचा व त्यासाठीची कृती तयार करा.

# ८. लेखनकौशल्य

## निबंध लेखन

इयत्ता नववीमध्ये आपण विविध लेखनकौशल्यांच्या प्रकारांचा अभ्यास करूया. निबंधलेखन म्हणजे विषयानुरूप केलेली विचारांची मुद्देसूद मांडणी होय. एखाद्या विषयाच्या अनुषंगाने आपल्या मनात येणारे विचार, भावना, कल्पना, स्वानुभव यांना प्रभावी भाषेत मुद्देसूदपणे मांडणे म्हणजे निबंधलेखन. निबंधलेखनात लिहिणाऱ्याच्या विचारांचे प्रतिबिंब पडत असते. लेखनकौशल्याचा विकास व अभिव्यक्ती क्षमतेचा विकास हे निबंधलेखन घटकाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

**निबंधलेखनासाठी आवश्यक गोष्टी/क्षमता**

- निरीक्षण
- वाचन
- बहुश्रुतता
- शब्दसंपत्ती
- चिकित्सक विचार
- कल्पना
- भावना
- अनुभव
- चिंतन
- विषयानुरूप भाषा

पाठ्यपुस्तकातील निबंधलेखन-लेखनकौशल्यांतर्गत आपण इयत्ता नववीसाठी प्रसंगलेखन, आत्मकथन, कल्पना प्रधान या निबंधप्रकारांचा अभ्यास करूया.

कल्पकता, तर्कसंगती, विचाराची सुसंगत व सुसंबद्ध मांडणी ही लेखनकलेची काही वैशिष्ट्ये आहेत. आपण निबंध लिहितो म्हणजे विषयाच्या अनुषंगाने असलेले आपले वाचन, चिंतन, निरीक्षण, विचार व भावना यांना शब्दबद्ध करतो. आपले अनुभव मुद्देसूदपणे मांडतो. त्यासाठी प्रत्येक अनुभवाकडे संवेदनशीलतेने पाहता यायला हवे. आपल्या शब्दांतील अनुभव इतरांच्या मनाला भिडेल असा मांडता यायला हवा. शब्दांतून भाषासौंदर्य व्यक्त व्हायला हवे.

वाचन, आकलन, निरीक्षण, विचार, भावना, कल्पना व अनुभव यांची प्रभावी शब्दांत अभिव्यक्ती हा लेखनकौशल्य विकासाचा गाभा आहे.

निबंधलेखनासाठी आवश्यक क्षमता, कौशल्ये, अभ्यास घटक हे सर्वच निबंधप्रकाराबाबत समान असले तरी प्रत्येक निबंध प्रकाराचे स्वत:चे वेगळेपण असते. निबंध प्रकार हाताळताना ती वैशिष्ट्ये लक्षात घेणे, ती अभ्यासणे, सुयोग्य उपयोग करणे आवश्यक ठरते.

### (१) प्रसंगलेखन–

आपण अनुभवलेली, ऐकलेली, एखादी घटना, एखादा प्रसंग, एखादा विचार, एखादी समस्या आपल्याला नेहमीच विचार करायला प्रवृत्त करीत असते. तो प्रसंग जर आपल्या बाबतीत घडला तर आपली प्रतिक्रिया काय असेल? असा विचार केल्यास आपण प्रसंगाचे विश्लेषण तटस्थपणे करू शकतो. अशा विचारांना, भावनांना, संवेदनशीलतेची, भावनिकतेची जोड देऊन शब्दबद्ध केले, तर तो प्रसंग वाचणाऱ्याच्या मनाला भिडतो त्या प्रसंगाचे शब्दचित्र डोळ्यांसमोर उभे राहू शकते. आपल्या भावना प्रभावीपणे मांडण्याचे कौशल्यही व्यक्त होऊन लेखनकौशल्याचा, अभिव्यक्ती क्षमतेचा विकास साध्य होऊ शकतो.

**प्रसंगलेखन करताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे :**

(१) प्रसंगाची, घटनेची कल्पना

(२) सूक्ष्म निरीक्षण

(३) भावनांची अभिव्यक्ती

(४) चित्रदर्शी संवेदनशील लेखन

## प्रसंगलेखन नमुना

- खालील बातमी वाचा.

### कारगिल दिन




अमर जवान मेजर रमाकांत
मातृभूमीच्या सेवेत शहीद.
अकोला शहराने सुपुत्र गमावला.
देशकार्यासाठी शहीद मेजर रमाकांत यांना
भावपूर्ण श्रद्धांजली

स्थळ : आदर्श विद्यालयाचे पटांगण. वेळ संध्या. ६ वा.

वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करा. त्या भावपूर्ण प्रसंगाचे लेखन करा.

### (२) आत्मकथन–

**आत्मलेखन करताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे :**

(१) सजीव आणि निर्जीव घटकांबाबत सर्वसमावेशक विचार.

(२) त्यांच्या भावना, सुखदु:ख, सवयी, उपयोगिता, कार्य यांचा शोध निरीक्षणशक्तीने घेणे.

(३) आपण स्वत: ती वस्तू आहोत अशी कल्पना करणे.

(४) कल्पनाशक्तीच्या माध्यमातून नाट्यपूर्ण रीतीने कल्पना मांडणे.

(५) संपूर्ण लेखन करताना भाषा प्रथमपुरुषी एकवचनी असावी.

## आत्मकथन नमुना


- वाहने हळू चालवा.
- पुढे एक किलोमीटरचा घाट आहे.
- गरज पडेल तेव्हा कर्णभोंगा वाजवा.
- गतिरोधकावर वाहनाची गती कमी करा.
- वाहन चालवतांना भ्रमणध्वनी बंद ठेवा.
- लक्षात ठेवा – ‘नाही पेक्षा उशीर बरा’.

वर दिलेला महामार्गावरील सूचनाफलक तुमच्याशी बोलतो आहे, अशी कल्पना करा व त्या घटकाचे आत्मकथन लिहा.

### (३) कल्पना प्रधान

**कल्पना प्रधान लेखन करताना लक्षात घ्यावयाचे मुद्दे**

(१) कल्पनाप्रधान लेखनकौशल्याचा उद्देशच कल्पना करता येणे हा आहे.
(२) मुख्य कल्पना निबंधाच्या शीर्षकातच दडलेली असते.
(३) एकातून दुसरी कल्पना अशी कल्पनांची साखळी लेखनकौशल्य वाढवते.
(४) कल्पना वास्तवाला धरून किंवा गमतीदार असावी.
(५) विषयासंबंधी सुचलेल्या कल्पनांचा विस्तार करावा.



## • हे शब्द असेच लिहा.

विद्यार्थ्यांनो, प्रत्येक शब्दाला स्वत:चा अर्थ असतो. वर्णाचा अर्थपूर्ण समूह म्हणजे शब्द. ही शब्दांची व्याख्या हेच दर्शवते. त्याचप्रमाणे शब्दाला संदर्भानुसारही अर्थ प्राप्त होतो.

उदा., (१) आज माझ्या आजीची पाठ खूप दुखत होती.

(२) आज मी 'वंद्य वन्दे मातरम्' कविता पाठ केली.

पाठ या एकाच शब्दाचे दोन्ही वाक्यांतील अर्थ भिन्न आहेत. याचप्रमाणे 'शब्द' जर चुकीचा लिहिला गेला तरी त्याचा अर्थ बदलू शकतो. अगदी वेगळ्याच अर्थाचा शब्द तयार होऊ शकतो.

उदा., (१) **कृतज्ञ**– उपकाराची जाण असलेला

**कृतघ्न**– उपकाराची जाण न ठेवणारा

(२) **पाणी**– पिण्याचे पाणी/जल

**पाणि**– हात

पाणी शब्द पाणि असा लिहिल्याने केवळ ऱ्हस्व (ईकार), दीर्घ (ईकार) लिहिल्याने शब्दाचा अर्थच बदलला.

यावरून लक्षात येते, की आपले म्हणणे अपेक्षित योग्य अर्थवाही होण्यासाठी शब्दांचे सुयोग्य म्हणजेच लेखननियमांनुसार लेखन होणे आवश्यक असते.

खाली काही असे शब्द दिलेले आहेत, की जे नेहमी तुमच्या वाचनात, लेखनात येतात; परंतु ते चुकण्याची शक्यताही असते. या शब्दांचा अभ्यास करा. त्यांचे उच्चारानुसार लेखन (योग्य लेखन नियमांनुसार) समजून घ्या. त्यांचा सराव करा व त्यांचे योग्य उपयोजन करा.

| | | | |
|---|---|---|---|
| अंत:करण | गरिबी | प्रीती | व्यक्तिमत्त्व |
| अनिर्णित | चमत्कृती | सत्कृत्य | गरीब |
| अर्थशास्त्रज्ञ | जीवितकार्य | महत्त्व | सामूहिक |
| अस्तित्व | ठरावीक | मूर्तिपूजा | सार्वजनिक |
| आशीर्वाद | तत्त्वज्ञान | मैत्रीण | सार्वत्रिक |
| उज्ज्वल | दातृत्व | मैत्रिणीला | साहित्यिक |
| उन्मेष | दीपप्रज्वलन | वक्तृत्व | सूचना |
| ओजस्वी | दृष्टिकोन | वाङ्मय | स्फूर्ती |
| औचित्य | निर्मिती | विषण्ण | सृजनशीलता |
| ऋणनिर्देश | निर्भर्त्सना | वैफल्य | स्मृतिदिन |
| कर्तृत्व | निष्क्रिय | वैशिष्ट्य | स्मृती |
| कीर्ती | परिस्थिती | हळूहळू | हार्दिक |
| कुत्सित | परीक्षा | क्रीडांगण | हृदय |

## • पारिभाषिक शब्द

ज्ञानप्रसाराच्या विविध माध्यमांत आणि जीवन व्यवहारात सतत बदल होत असतात. साहजिकच त्या त्या ज्ञानक्षेत्रात वा व्यवहारात प्रचलित शब्दांहून वेगळे शब्द वापरले जातात. विशिष्ट ज्ञानक्षेत्रातील माहिती, संकल्पना यांच्या प्रकटीकरणाला योग्य ठरतील असे शब्द वापरण्याची गरज असते. भाषिक व्यवहाराच्या या वेगळेपणातून ज्ञानक्षेत्रांची वा व्यवहारांची परिभाषा सिद्ध होते. अशा परिभाषेतून शास्त्रभाषेचा व ज्ञानभाषेचा विकास होत असतो. बदलते जीवनव्यवहार, वाढत्या गरजा आणि विस्तारणारी ज्ञानक्षेत्रे यांनुसार 'पारिभाषिक संज्ञा' निर्माण होतात.

पारिभाषिक पदनामांच्या वापरामुळे किंवा पारिभाषिक संज्ञांच्या वापरामुळे विचार, संकल्पना यांच्या प्रकटीकरणात विशिष्टता, निर्दोषता येते. पारिभाषिक संज्ञांचा मूळ उद्देश व्यवहारसापेक्ष भाषेचे उपयोजन हा आहे.

शिक्षण, विविध शास्त्रे, प्रशासन, आरोग्य, समाज, उद्योग, व्यापार, न्याय, आर्थिक व्यवहार, कला, संस्कृती इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये आवश्यकतेनुसार पारिभाषिक संज्ञा उपयोगात आणल्या जातात. या संज्ञांमुळे ज्ञानव्यवहार अधिक प्रभावी आणि सुस्पष्ट होतात. या दृष्टीने पारिभाषिक संज्ञांना अनन्यसाधारण महत्त्व असते.

| | | | |
|---|---|---|---|
| Calligraphy | सुलेखन | Secretary | सचिव, चिटणीस |
| Academic Qualification | शैक्षणिक अर्हता | Children's Theatre | बालरंगभूमी |
| Action | कार्यवाही/कृती | Comedy | सुखात्मिका |
| Census | जनगणना | Agent | अभिकर्ता/प्रतिनिधी |
| Casual Leave | नैमित्तिक रजा | Category | प्रवर्ग |
| Anniversary | वर्धापनदिन | Bio-data | स्व-परिचय |
| Corporation | महामंडळ, निगम | Bonafide Certificate | वास्तविकता प्रमाणपत्र |
| Daily Wages | दैनिक वेतन, रोजंदारी | Book Stall | पुस्तकविक्री केंद्र |
| Lyric | भावगीत | Dismiss | बडतर्फ |
| Magazine | मासिक-पत्रिका | Event | घटना |
| Medical Examination | वैद्यकीय तपासणी | Exchange | देवाण-घेवाण, विनिमय करणे |
| Express Highway | द्रुतगती महामार्ग | | |
| News Agency | वृत्तसंस्था | Official Record | कार्यालयीन अभिलेख |
| Exhibition | प्रदर्शन | Orientation | निदेशन, उद्बोधन |
| General Meeting | सर्वसाधारण सभा | Part Time | अंशकालीन, अर्धवेळ |
| Government Letter | शासकीय पत्र | Goodwill | सदिच्छा |
| Programme | कार्यक्रम | Handbill | हस्तपत्रक |
| Plumber | नळ-कारागीर | Honorable | माननीय |
| Pocket Money | हातखर्च | Humanism | मानवतावाद |
| Index | अनुक्रमणिका | Registered Letter | नोंदणीकृत पत्र |
| Junior Clerk | कनिष्ठ लिपिक | Receptionist | स्वागतिका |
| Refreshment | अल्पोपहार | Journalism | वृत्तपत्रकारिता |



## पूरक पुस्तके व संदर्भग्रंथ यांची यादी

(१) हाती ज्यांच्या शून्य होते– संपादन अरुण शेवते.
(२) मुसाफिर– अच्युत गोडबोले
(३) एक होता कार्व्हर– वीणा गवाणकर
(४) मन में है विश्वास– विश्वास नांगरे पाटील
(५) आय डेअर– किरण बेदी
(६) आकाशाशी जडले नाते– जयंत नारळीकर
(७) समिधा– साधनाताई आमटे
(८) खरेखुरे आयडॉल– सुधा मूर्ती
(९) संस्कृतीच्या पाऊलखुणा– द. ता. भोसले
(१०) व्यक्ती आणि वल्ली– पु. ल. देशपांडे
(११) झाडाझडती– विश्वास पाटील
(१२) स्वामी– रणजित देसाई
(१३) सुगम मराठी व्याकरण व लेखन – मो. रा. वाळंबे



## महत्त्वाच्या संकेतस्थळे व लिंक्सची यादी

https://en.wikipedia.org/wiki/Vasant_Purushottam_Kale
https://en.wikipedia.org/wiki/Prabodhankar_Thackeray
https://en.wikipedia.org/wiki/Kaziranga_National_Park
www.kaziranga-national-park.com/
https://en.wikipedia.org/wiki/Olympic_Games
https://en.wikipedia.org/wiki/Jayant_Narlikar
https://www.youtube.com/watch?v=_POUfe2zVe0
https://en.wikipedia.org/wiki/Shankar_Ramchandra_Kharat
https://en.wikipedia.org/wiki/Helen_Keller

शिक्षकांनी पाठ्यपुस्तकात दिलेली पूरक पुस्तके, संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे व लिंक्स यांचा वापर करून पाठ्यघटकाशी संबंधित अधिक माहिती मिळवावी. त्या माहितीचा अध्यापनात संदर्भ म्हणून वापर करावा.

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

मराठी अक्षरभारती इयत्ता ९ वी

₹ ४८.००